जागतिक आर्थिक परिषदेने दावोसमध्ये आयोजित केलेल्या राजकीय व उद्योग जगताच्या ऑनलाईन परिषदेच्या तोंडावर ऑक्सफॅमने भारतासह जगभरातील वेगवेगळ्या देशातील विषमतेचे भीषण चित्र मांडले आहे. किरकोळ कारणावरून एखादी व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीचा जीव घेते. तारूण्याच्या उंबरठ्यावर असलेले व्यक्ती अत्यंत गंभीर स्वरूपाचा गुन्हा करून आयुष्यभर जेलमध्ये सडते. या व अशा अनेक घटना घडण्याची जी विविध कारणे असतात त्यामध्ये समाजातील आर्थिक विषमता हेही तितकेच महत्त्वाचे कारण आहे हे नाकारता येत नाही. समाजातील मुठभर श्रीमंताकडे प्रचंड संपत्ती एकवटली असताना खुप मोठ्या वर्गाला दोन वेळच्या जेवणाची भ्रांत जाणवावी हे कटू सत्य आहे. त्यामुळेच अशा वर्गातील अनेकांना व विशेष करून भविष्यकाळ अंध:कारमय दिसत असलेल्या तरूणांना गुन्हेगारी कृत्य करण्यात गैर वाटत नाही. किंबहुना श्रीमंतांनी गोरगरीबांचे शोषण करून, बँकांना फसवून सर्व व्यवस्था आपली बटीक करून हा संपत्ती संचय केला असल्याने आपणही आपल्या गरजा भागविण्याकरीता ओरबडण्याची वृत्ती अंगिकारली तर त्यात गैर काय असा विचार अनेक जन करतात. मागील २०२० च्या वर्षात कोरोनामुळे जगभरातील आर्थिक विषमता झपाट्याने वाढली असून त्यामुळे अनेक धोके वाढणार आहेत. जगभरातील वेगवेगळ्या देशांनी ही विषमता कमी करण्यासाठी वेळीच प्रयत्न केले तर ठिक अन्यथा कोरोनाच्या संकटामुळे विषमतेचे वाढलेले गांभीर्य पुढील दहा वर्ष जगाच्या मानगुटीवर बसेल व अधिक गंभीर होत जाईल. जागतिक आर्थिक परिषदेने दावोसमध्ये आयोजित केलेल्या राजकीय व उद्योग जगताच्या ऑनलाईन परिषदेच्या तोंडावर ऑक्सफॅमने भारतासह जगभरातील वेगवेगळ्या देशातील विषमतेचे भिषण चित्र मांडले. जगभरातील ७९ देशामधील २९५ अर्थतज्ञांच्या मदतीने सर्वेक्षण करून हा अहवाल तयार केला आहे. कोरोनामुळे निर्माण झालेली विषमता पुढील कित्येक दशके जाणवेल असे आयएमएफ जागतिक बँक व ऑर्गनायझेशन यांनीही मान्य केले. जगभरातील अर्थतज्ञ व नागरिक यांच्यापैकी ८७% लोकांनी विषमता वाढली असल्याचे मान्य केले. कोरोना काळात बसलेल्या आर्थिक फटक्यामुळे जगभर वर्ण आणि लिंग या दोन्ही पातळीवर विषमता वाढल्याचे दोन तृतीयांश लोकांनी कबुल केले. मागील म्हणजे २००८ मध्ये आलेल्या आर्थिक संकटाच्या वेळी जगभरातील अब्जाधिशाच्या संपत्तीत झालेली घट भरून काढण्याकरीता पाच वर्षाचा कालावधी लागला होता. मात्र कोरोनामुळे आर्थिक फटका बसलेल्या जगभरातील आघाडीच्या एक हजार अब्जाधिशांनी केवळ नऊ महिन्यात आपले नुकसान भरून काढले. १८ मार्च ३१ डिसेंबर २०२० या काळात जगातील अब्जाधिशांची संपत्ती ३.९ ट्रिलियन डॉलरने वाढून ११.९५ ट्रिलियन डॉलर इतकी झाली. मात्र त्याचवेळी याच देशामधील गोरगरीबांना त्याच्या कोरोना संकटापूर्वीच्या उत्पन्नाचा आकडा गाठण्याकरीता किमान दशकभर संघर्ष करावा लागणार आहे. कोरोनामुळे निर्माण झालेल्या विषमतेचा परिणाम किती भीषण आहे हे स्पष्ट करताना अहवाल म्हणतो की, ब्राझीलमधील श्वेतवर्णीयांच्या तुलनेत आफिकन वंशाच्या लोकांचे मृत्यू अधिक झाले. जगभरातील ७०० कोटी लोकसंख्यापैकी ३०० कोटी लोकसंख्येला आरोग्याच्या सुविधा जवळपास उपलब्ध नसल्याचे अत्यंत गंभीर व धक्कादायक वास्तव कोरोना काळात उघड झाले आहे. केवळ २०२० या एका वर्षात कोरोना संकटामुळे जगभरातील २० ते ५० कोटी लोक

गरीबीच्या खाईत ढकलले गेले. यातील बहुतांशा लोक दिवसाकाठी केवळ १४६ ते ७३० रुपये खर्च करू शकतात. वेग देशाच्या सरकारने ही विषमता नियंत्रित करण्याचा प्रयत्न केला तर पुढील तीन वर्षात कोरोनापूर्व काळातील परिस्थितीच्य पोहचणे शक्य होईल. २०३० पर्यंत ८६ कोटी लोक गरीबी रेषेच्या खाली असतील. अन्यथा ही संख्या त्यापेक्षा कितीतरी राहील.

संदर्भ

१. दैनिक वृत्तपत्र पुण्यनगरी, २० मार्च २०२०.
२. दैनिक वृत्तपत्र सकाळ, २३ मार्च २०२०.
३. दैनिक वृत्तपत्र लोकमत, ९, १२ मे २०२०.
४. दैनिक वृत्तपत्र लोकशाही वार्ता, १४ मे २०२०.
५. दैनिक वृत्तपत्र लोकमत, ३० जाने. २०२१.

2021-22

Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

B.Aadhar


Peer Reviewed & Refereed Indexed

Multidisciplinary International Research Journal

August-2021

SPECIAL ISSUE - (CCCXIII) 313

Indian Tribes : Past,Present & Future



Chief Editor
Prof. Virag.S.Gawande
Director
Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.

Executive Editors
Dr. R. D. Sikchi,
Principal,
Dr. D. E. Umbarkar,
Professor & HOD Sociology,
Sitabai Arts, Commerce & Science College, Akola

Editors
Dr. Sunil P. Gaygol,
Associate Professor, Dept. of Sociology,
Prof. Dilip D. Kumare,
Assistant Professor,
Sitabai Arts, Commerce & Science College, Akola

This Journal is indexed in :
- **Scientific Journal Impact Factor (SJIF)**
- **Cosmos Impact Factor (CIF)**
- **International Impact Factor Services (IIFS)**

For Details Visit To : *www.aadharsocial.com*

Aadhar Publications

Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

B.Aadhar

Peer Reviewed & Refereed Indexed

Multidisciplinary International Research Journal

August-2021

SPECIAL ISSUE - (CCCXIII) 313

Indian Tribes :Past, Present & Future



Chief Editor
Prof. Virag.S.Gawande
Director
Aadhar Social
Research &, Development
Training Institute, Amravati.

Executive Editors
Dr. R. D. Sikchi,
Principal,
Dr. D. E. Umbarkar,
Professor & HOD Sociology,
Sitabai Arts, Commerce & Science
College, Akola

Editors
Dr. Sunil P. Gaygol,
Associate Professor, Dept. of Sociology,
Prof. Dilip D. Kumare,
Assistant Professor,
Sitabai Arts, Commerce & Science
College, Akola

The Journal is indexed in:

Scientific Journal Impact Factor (SJIF)
Cosmos Impact Factor (CIF)
International Impact Factor Services (IIFS)

Aadhar International Publication
For Details Visit To : www.aadharsocial.com

Impact Factor – 7.675

ISSN – 2278-9308

B.Aadhar

Peer-Reviewed & Refereed Indexed

Multidisciplinary International Research Journal

August-2021

ISSUE No- (CCCXIII) 313

Indian Tribes : Past, Present & Future

Chief Editor
Prof. Virag.S.Gawande
Director
Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.

Executive Editors
Dr. R. D. Sikchi,
Principal, Sitabai Arts, Commerce & Science College, Akola
Dr. D. E. Umbarkar,
Professor & HOD Sociology, Sitabai Arts, Commerce & Science College, Akola

Editors
.Dr. Sunil P. Gaygol,
Associate Professor, Dept. of Sociology, Sitabai Arts, Commerce & Science College, Akola
Prof. Dilip D. Kumare,
Assistant Professor, Sitabai Arts, Commerce & Science College, Akola

Aadhar International Publication
For Details Visit To : www.aadharsocial.com
© All rights reserved with the authors & publisher

42	आदिवासी व त्यांचे आर्थिक जीवन **सहा. प्रा. डॉ. रोहित पंजाबराव काळे**	186
43	जनजातीय समुदायों में स्वास्थ्य के प्रति जागरूकता : मुद्दे और चुनौतियां (महाराष्ट्र के वर्धा जिले के विशेष संदर्भ में) **माधवी बा. धुर्वे**	188
44	महाराष्ट्रातील आदिवासींच्या समस्या **डॉ. नितीन रमेश भिंगारे**	192
45	आदिवासी समुदायाच्या विकासात शासकीय योजनांचे योगदान **प्रा. डॉ. किशोर नामदेव वाहाणे**	195
46	आदिवासी समुदायाच्या विकासात शैक्षणिक योजनांचे योगदान **प्रा. डॉ. भारती कृष्णराव देशमुख**	199
47	घटनात्मक तरतूदी, कायदे व आदिवासी **प्रा. डॉ. डी. एस. नामूर्ते**	203
48	आदिवासी आर्थिक सहकार्य आणि स्त्रियांचा दर्जा **सहा. प्रा. जयश्री पंजाबराव काळे**	207
49	आदिवासी विकास : स्वरूप आणि दिशा **प्रा. नरेश आर. धुर्वे**	210
50	आदिवासींच्या विकासात शासकीय योजनांच्या योगदानाचे समाजशास्त्रीय अध्ययन **डॉ. संजय बबनराव चौधरी**	214
51	आदिवासी समाजातील स्त्रियांचा बदलता दर्जा रू एक समाजशास्त्रीय अध्ययन **डॉ. पदमानंद मनोहर तायडे**	218
52	आदिवासी स्त्रियांचा बदलतात दर्जा आणि भूमिका **प्रा.डॉ.आचार्य आर.डी.[**	225
53	आदिवासी स्त्रीयांचे प्रश्न एक समाजशास्त्रीय अध्ययन **प्रा.डॉ.शाम दुतोंडे**	228
54	मानवाधिकार आणि आदिवासी समुदाय **डॉ. प्रेमसिंग प्रल्हाद जाधव**	232
55	बिरसा मुंडा : स्वतंत्रता संग्राम सेनानी एवं आदिवासियो के महानायक **डॉ. सुनिता संजय धोपटे**	235
56	शिक्षण व आरोग्य विषयक समस्या आणि आदिवासी समुदाय **प्रा.जया जोशी सहस्त्रबुद्धे**	241
57	Protective Parenting of adolescents of Non-Tribal and Tribal Areas **Dr. Alka S.Yelane (Kolhe)**	246
58	Learning disabilities among tribals children: A Comparative Study **Dr. Vaishali Nandagawali Panhekar**	251

B.Aadhar International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 313 (CCCXIII)
ISSN : 2278-9308
August, 2021

घटनात्मक तरतूदी, कायदे व आदिवासी

प्रा. डॉ. डी. एस. नामूर्ते
सहयोगी प्राध्यापक समाजशास्त्र विभाग प्रमुख श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती. ,E-mail : dnyannamurte@gmail.com

सर्वसामान्य भारतीय लोक आदिवासी बद्दलची एक वेगळी धारणा बाळगून आहेत. भारतातील आदिवासी बद्दलची आपली धारणा मुळतः आपल्या विशाल भारतीय समाजापासून आदिवासींच्या भौगोलिक व सामाजिक स्तरावर पूर्णपणे वेगळी दिसून येते. यामध्ये आदिवासींच्या समाजरचनेतील टप्प्याचा विचार केला जात नाही. यामुळेच समाजरचनेच्या विविध पातळ्यांवर असलेले सर्व गट व जमातीना आदिवासी म्हणून स्तरीकृत करण्यात आले. भारतीय समाजापासून आदिवासी वेगळे राहत असल्यामुळे त्यांची वस्ती असलेल्या भागात स्वायत्तता दिसून येत नाही. जमीन, जंगल व अन्य नैसर्गिक साधनसंपत्तीवर त्यांचेच नियंत्रण होते आणि आपल्या स्वतंत्र कायदे, परंपरा व रीतीरिवाजानुसार त्यांनी स्वयंशासन केले. ब्रिटिश राजवट तसेच इतर अन्य परकियांच्या भारतातील वसाहतवादी राजवटीचे आगमन झाल्यावर युध्द, विजय व खालसा करण्याच्या साधनांनी आदिवासी व बिगर आदिवासी जातीजमातीना एकाच राजकीय व प्रशासकीय रचनेखाली एकत्रित आणले गेले. त्यानंतर नवीन व समान नागरी आणि फौजदारी कायदा अस्तित्वात आला. त्याचबरोबर आदिवासी परंपरा व संस्कृतीच्या गुणविशेषाबाबत उदासिन असलेली प्रशासकीय रचना स्थापन करण्यात आली. या सर्व प्रक्रियातून घडलेल्या घडामोडी, लबाडी, फसवणूकी व तारण यासारख्या साधनाद्वारे त्यांच्या जमिनीपासून मोठ्या प्रमाणावर वेगळे झाले.

संशोधन उद्दिष्टे :–

१.आदिवासी जमातीच्या विकासाचा परामर्श घेणे.

२.आदिवासी जमाती कल्याणासाठी असलेल्या विविध कायद्यांचे अध्ययन करणे.

३.आदिवासी जमातीकरीता संविधानात्मक तरतूदी कोणकोणत्या आहेत याबाबतचे अध्ययन करणे.

संशोधन पध्दतीशास्त्र :–

सदर शोधनिबंध लिहताना दुय्यम स्त्रोताचा वापर करण्यात आला आहे. त्याकरीता विविध ग्रंथ, पुस्तके, मासिके, साप्ताहिके, वृत्तपत्रे, लेख, वेबसाईट इत्यादी.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाचे संविधान तयार करण्यात आले. सर्व भारतीयांना समान अधिकार मिळावेत, सर्वांना स्वातंत्र्य भारतात विकासाची संधी मिळावी हा दृष्टीकोन भारतीय नेत्यांनी स्विकारला होता, भारतीय संविधानात समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय हे तत्व स्विकारून जातीवर आधारित विषमता दूर करणे व अनु.जाती तसेच अनु.जमातीचा विकास करण्याच्या विकास करण्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण तरतूदी करण्यात आल्यात. आदिवासींच्या विकासाच्या दृष्टीने भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानात अतिशय महत्वपूर्ण तरतूदी केल्यात. स्वतंत्र भारताचे नागरीक या नात्याने आदिवासींना इतरांच्या समान प्रमाणात नागरी, राजकीय व सामाजिक हक्क प्रदाण करण्यात आले. त्यांचे नागरी व राजकीय हक्क भारतीय घटनेतील मुलभूत हक्काच्या कार्यकक्षेत जतन करण्यात आले असून या सामाजिक हक्काची योजना भारतीय घटनेच्या मार्गदर्शक तत्वामध्ये सामाजिक हक्कांचा समावेश करण्यात आला.

वर दर्शविलेल्या हक्काशिवाय आदिवासींना भिन्न समाजाचे सदस्य असल्यामुळे त्यांना काही विशेष हक्कही देण्यात आले आहेत. अन्य बाबीबरोबरच अशा विशेष हक्कामध्ये वैधानिक मान्यता (परिच्छेद ३४२), संसद व राज्य–विधानसभांमध्ये योग्य प्रमाणात पतिनिधित्व (परिच्छेद ३३० व ३३२) विशिष्ट भागात अनिर्बंध संचार करण्याच्या किंवा स्थानिक होण्याच्या किंवा मालमत्ता खरेदी करण्याच्या सामान्य नागरिकांच्या अधिकारावर मर्यादा (परिच्छेद १९(५)), आदिवासींची भाषा, बोली व संस्कृतीचे जतन (परिच्छेद २९) यांचा समावेश आहे. घटनेत असे एक कलम आहे ज्यामुळे राज्यांना आदिवासीसाठी सर्वसाधारणपणे आरक्षण ठेवण्याची (परिच्छेद १४(४)) आणि विशेषत: नोकऱ्या व नियुक्त्यांमध्ये आदिवासी जमातीसाठी आरक्षणाची तरतूद करण्याचा अधिकार दिला आहे. आदिवासींसह समाजातील दुर्बल घटकांच्या शैक्षणिक व आर्थिक हिताला विशेषत्वाने प्रोत्साहन देण्यास अग्रक्रम देणारी मार्गदर्शक तत्वेही घटनेत आहेत. (परिच्छेद ४६) याशिवाय घटनेच्या ५ व्या व ६ व्या भागात अशाही तरतूदी आहेत ज्यामुळे राज्याना आदिवासींची वस्ती असलेल्या प्रदेशामध्ये प्रशासनाची विशेष व्यवस्था करण्याचा अधिकार दिला आहे. संसद व राज्य विधानसभामध्ये आदिवासींना प्रतिनिधित्व देण्यासाठी वर्गीकृत व आदिवासी मतदार संघ तयार करण्यापासून सरकारी नोकऱ्या व शैक्षणिक संस्थामध्ये विशिष्ट प्रमाणात राखीव जागा ठेवण्याच्या स्वरूपातील विशेषाअधिकारांपर्यंत या तरतूदीची व्याप्ती आहे. थोडक्यात आदिवासी लोकांच्या हितांचे संवर्धन व संरक्षण करण्याचा घटनेचा उद्देश आहे.

घटनेतील या सर्व तरतूदीमध्ये आदिवासींसाठी करण्यात आलेला संरक्षणात्मक भेद सर्वात महत्वाचा आहे. घटनेने आदिवासींना बहाल केलेले हक्क अमलांत आणण्याच्या दृष्टीने सरकारने विशिष्ट उपाय विकसित केलेले आहेत. अनु.जमातीच्या लोकांसाठी सरकारी व निमसरकारी आस्थापना तसेच शैक्षणिक संस्थामधील ७.५ टक्के जागा आरक्षित ठेवल्या आहेत. अनु.जमातीच्या उमेदवारांसाठी देण्यात आलेल्या सवलतीतूनही या गटासाठी केलेला संरक्षणात्मक भेद दिसतो. या सर्व तरतूदीनंतरही अनु.जातीपेक्षा जमातीबाबत परिणाम फारसा समाधानकारक नाही. तरी सुद्धा आदिवासींच्या जागा भरण्यातील राज्यांची असमर्थता ही घटनेने त्यांच्यासाठी जतन केलेल्या, हक्कांचा भंग आहे असे मानले जात नाही. याचे कारण म्हणजे प्रथमत: घटनेने दिलेल्या हक्कांचा पाठपुरावा करण्याचे आवश्यक उपाय योजले गेले नाहीत. दुसरे म्हणजे वर्गीकृत जमातींना देण्यात आलेले आरक्षणही आपोआप होणारी प्रकिया नाही. घटनेतच घालून दिलेल्या काही अटीवर ते अवलंबून आहे. उदा. घटनेच्या ३३५ कलमात अशी अट आहे की, प्रशासकीय सेवा पदावर नियुक्ती करताना कार्यक्षमता राखली जाईल, यानुसारच अनु.जाती व जमातींच्या आरक्षण हक्काचा विचार तेव्हाच केला जावू शकेल. आदिवासींना असे हक्क दिले गेले असले तरी ते आदिवासी समाजाचे सदस्य म्हणूनच हक्क प्राप्त करून घेवू शकतील. या हक्कापर्यंत पोहचण्याचा व्यक्तीचा अधिकार इतरांच्या बरोबरीनेच आहे. हा अधिकार वैयक्तिक या अर्थाने आहे की, व्यक्तीला तो मिळविण्याची तजवीज करण्यासाठी काही कृती करणे आवश्यक आहे. या स्वरूपाचे मुद्दे असल्यामुळे कायद्याच्या कसोटीवर सरकारचे दुर्लक्ष किंवा अनास्थेला आव्हान देण्यात मुलत: अडचणी आहेत. पक्षपात किंवा नकाराची काही विशिष्ट प्रकरणेच न्यायालयात नेली जावू शकतात पण त्यांचा प्रतिवाद करण्यासाठी घटनेच्या कलम ३३५ चा आसरा घेता येतोच. थोडक्यात या सरक्षणात्मक भेदाच्या तरतूदी या मुळातच पुरेशा नाहीत. सरक्षणात्मक तरतूदी पुरेशा कार्यक्षम बनण्यासाठी त्याला खऱ्याखुऱ्या समानतेची पुरक जोडणी असली पाहिजे. म्हणजे औपचारिक समानता अस्तित्वात आणण्यासाठी क्षमता, साधनसंपत्ती आणि प्रत्यक्ष संधी इत्यादी तयार करायला हवीत. याचा अर्थ हा की आदिवासींच्या सामाजिक, आर्थिक हक्कासाठी केवळ वैधानिक किंवा घटनात्मक तरतूदीच नव्हे तर परिणामकारक कायदेशीर प्रशासकीय, पायाभूत सुविधा आणि आर्थिक

पाठींबा यातूनही तरतूदी करण्याची गरज आहे. या तरतूदीच्या संदर्भात काही समर्थन प्रणाली उपलब्ध करून देण्यात आल्या असल्याने त्याची परिणीती अपुऱ्या का होईना पण काहीशा परिणामांमध्ये झाली होती. मात्र जेथे अशी साधने अस्तित्वात नव्हती किंवा ती मोठ्या प्रमाणावर निष्प्रभ ठरली तेथे घटनात्मक तरतूदीचा आदिवासींच्या दृष्टीने अनुकुल परिणाम फारच कमी प्रमाणात झाला आहे.

परिणामकारक सामाजिक आणि आर्थिक हक्क विकसित करून ते आदिवासींना पुरविण्यात आले नाहीत. एवढेच नाही तर आतापर्यंत ते उपभोग घेत असलेली जमीन व जंगलावरील हक्क त्यांच्यापासून प्रारंभी वसाहतवादी सरकारने व नंतर स्वातंत्र्योतर काळातील भारतीय सरकारने हिरावून घेतले. आदिवासी हे वन्यजमिनी व जंगलाच्या बाजुनेच राहतात. हे अगदी प्रस्थापित झालेले वास्तव आहे. तरीही आदिवासींना जमिनीपासून अलग करण्याची ब्रिटिश शासन काळात सुरू झालेली प्रक्रिया स्वातंत्र्योत्तर भारतात अथकपणे सुरू आहे. बिगर आदिवासींना जमिनीपासून अलग करण्याच्या प्रश्नाचा मुकाबला करण्यासाठी जेथे आदिवासींची लोकसंख्या आहे अशा जवळपास सर्व राज्यात कायदे करण्यात आले आहेत. छोटा नागपूर वहिवाट कायदा १९०८ आणि संथाल परगना वहिवाट कायदा १९४० यासारखे कायदे ब्रिटिश काळापासून अस्तित्वात आहेत. हे कायदे आदिवासींच्या विकासासाठी केले नव्हते. त्यात त्यांचा प्रशासकीय व राजकीय हेतू होता. आदिवासी त्यांच्या जमिनीपासून वेगळे होवू नयेत म्हणून संरक्षण व बिगर आदिवासींच्या आदिवासी भागातील हालचालीवर मर्यादा आणण्याच्या हेतूने ही उपाययोजना केली होती.

स्वातंत्र्यानंतर भारतात आदिवासी लोकसंख्या असलेल्या राज्यांनी आदिवासींच्या जमिनी बिगर आदिवासींकडे हस्तांतरीत होण्यापासून रोखण्याच्या दृष्टीने नव्हे तर त्यांचे हक्क प्रस्थापित होण्यासाठी कायदे बनले. काही राज्यांमध्ये बिगर आदिवासींच्या हक्कांच्या संरक्षणाच्या हेतूने काही कायदे करण्यात आले आहेत. बिगर आदिवासींच्या हिताला स्थान देण्याचा प्रयत्न म्हणून आंध्रप्रदेश जमिन हस्तांतरण नियमन कायदा १९५९ (निवडक क्षेत्रे) मध्ये १९७० साली सुधारणा करण्यात आली. केरळ अनु.जमाती (जमीन हस्तांतरण नियमन व हस्तांतरीत जमीन पुन्हा सोपवणे) कायदा १९७५ हा बिगर आदिवासींना दिलेल्या सवलतीना मूर्त स्वरूप देण्यासाठी (वर्मा १९९०, राव १९९६, बिजॉय १९९९) रद्द करण्यात आला. असे कायदे असूनही आदिवासींची जमीन ही बिगर आदिवासींकडे हस्तांतरीत होतच राहिली आहे.

आदिवासीच्या हक्कासाठी असलेल्या घटनात्मक तरतूदी पुन्हा अमलात आणण्यासाठी अगदी अलिकडच्या काळात दोन महत्वपूर्ण कायदे करण्यात आले आहेत. त्यातील एक पंचायत तरतूदी कायदा १९९६ (अनु.क्षेत्रापर्यंत विस्तार) हा होय. या कायद्याद्वारे अनु.जमातीना आपल्या परंपरा व रीतीरिवाज, सांस्कृतिक ओळख, साधनसंपत्तीचे संरक्षण व जतन करण्याचा तसेच तंटे सोडविण्यासाठी ग्रामसभेच्या माध्यमातून नेहमीची पध्दत वापरण्याचा अधिकर दिला आहे. विशेष म्हणजे पंचायत कायद्यातील तरतदूीचे तंतोतंत पालन फारच कमी प्रमाणात होते. उदा. विविध राज्यांनी केलेल्या कायद्यामध्ये तसेच सहाव्या अनुसूचीच्या आकृतीबंधातील तरतूदीमध्ये हे पाहायला मिळते. तसेच परिच्छेद ९अ (नगरपालिका क्षेत्र) अनुसूचित क्षेत्रात लागू करण्यासाठी कोणताही कायदा केलेला नसला तरी अनु.क्षेत्र असलेल्या राज्यामध्ये ते रेटून नेले जात आहेत. या दिशेने केलेला आणखी एक कायदा म्हणजे अनु.जमाती व अन्य पारंपारिक जंगल रहिवाशी कायदा २००६ हा होय. या कायद्याद्वारे पूर्वीपासून असलेल्या आदिवासींच्या हक्कांना मान्यता देवून ते पूर्नप्रस्थापित करून आदिवासींवर शतकानुशतके होत असलेला अन्याय दूर करण्याचे उद्दिष्ट आहे. मात्र या कायद्याची अंमलबजावणी फारच प्रतिकुल परिस्थितीतून केली जात आहे.

मार्गदर्शक तत्वांच्या घटनात्मक तरतूदीच्या अंतर्गत सरकारपुढे आदिवासींबाबत असलेला मुख्य मुद्दा म्हणजे आदिवासींचे कल्याण व विकास हाच होय. एकाच प्रकारच्या घटनात्मक तरतदूीनी आदिकासी विकासाचा पाठपुरावा करण्यात आला. ज्याचा तंतोतंत पुरावा पंचतत्वात मिळतो. ही तत्वे पं.नेहरूंनी 'व्हेरियर एल्वीन' यांच्या ''नेफाचे तत्वज्ञान'' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत सांगितली आहेत. तेव्हापासून स्वातंत्र्योत्तर भारतात ही तत्वे आदिवासी विकासासाठी गुणविशेष म्हणून गृहीत धरली जात आहेत. आदिवासींना त्यांच्या स्वत:च्या बुध्दीमत्तेनुसार विकास, जमीन व जंगलावरील त्यांच्या हक्कांचा आदर, आदिवासींना प्रशिक्षण व जेथे अनेक योजना चालू आहेत असे भाग वगळून व तेथील सामाजिक व सांस्कृतिक संस्थाशी वैर न करता प्रशासन व विकास कार्याकरीता स्वत:चे पथक उभारणे हे या तत्वामध्ये समाविष्ठ आहे.

तरीही आदिवासीबाबत घेण्यात आलेली भूमिका ही खूपच विसंगत आहे. हे मुख्यत: राष्ट्रीय विकासाच्या अनिवार्यतेतून घडले आहे. आदिवासी विकासाच्या मुद्याचा पाठपुरावा हा राष्ट्रीय विकासाच्या मुद्याच्या परिघाच्या बाहेर जावून करत्रा येणार नाही. राष्ट्रीय विकास झपाट्याने घडविण्यासाठी केलेल्या उपाययोजनेकडेही आदिवासी समाजाला एकात्मिक करता येवू शकेल. या दृष्टीने महत्वाची यंत्रणा म्हणून पाहिले गेले. भविष्यातील वाढ व साधनसंपत्ती जमविण्यासाठी उत्पादक रचना उभारण्याचे राष्ट्रीय उद्दिष्ट हे आदिवासींचे हित व त्यांच्या कल्याणच्या मुद्यांपेक्षा खूप अधिक महत्वाचे मानले गेले. म्हणून राष्ट्रीय विकासाच्या नावाखाली आदिवासींचे हित व कल्याणाचा बळी देण्यात आला.

निष्कर्ष :—

आदिवासी जमातीचे कल्याण आणि हिताचे संरक्षण व संवर्धन करण्याच्या उद्देशाने अनेक चांगल्या घटनात्मक तरतूदी आणि कायदे असूनही आदिवासींकडे दुर्लक्ष करण्याची प्रक्रिया अथकपणे चालूच आहे. आदिवासींच्या या दुर्लक्षित अवस्थेचे मुळ हे कायदेच आहेत. हा यातील विरोधाभास आहे. आदिवासीकडे लेखन आणि वाचनाची परंपरा नाही आणि त्यामुळे अशा कायद्याची नोंद ठेवून त्यांचा उपयोग करण्याचीही परंपरा नाही. न्यायालयाची भाषा व कामकाज त्यांच्यासाठी अनभिज्ञ आहे. अशा परंपरेच्या अभावामुळेच बिगर आदिवासी या कायद्यांचा गैरफायदा उठवित असून वेगवेगळे मार्ग आणि साधनांच्या मार्फत आदिवासींच्या जमिनी हडपत आहेत. आदिवासींकडून बिगर आदिवासींकडे जमिनीचे सुलभ हस्तांतरण होण्याच्या दृष्टीने बहुसंख्य बिगर आदिवासींचा समावेश असलेले स्थानिक प्रशासन आपल्या स्वजातीयांशी हातमिळवणी करून काम करत आहेत.

संदर्भ :—

१.आगलावे, प्रदिप (२००९) सामाजिक मानवशास्त्र, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
२.आकरे, बी.एन. (२००९) आदिवासी आणि सामुदायिक विकास योजना, पिंपळापुरे बुक डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर.
३.काळे, बी. आर. (२०१६) केंद्र व राज्यशासनाच्या आदिवासी विकास योजना, संदर्भ प्रकाशन, औरंगाबाद
४.http/tribal.nic.in
५.संगवे, विलास (१९७८) आदिवासींचे सामाजिक जीवन, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
६.गढवाल, ए.ए. (२०१२) आदिवासींचे समाजशास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर.

ISSN 2319 - 359X

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

IDEAL

Volume - IX Issue - II March - August - 2021

English / Marathi / Hindi Part - I

Peer Reviewed Refereed and UGC Listed
Journal No. 47026

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.601
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖

Assit. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Math's), M.B.A. (Mkt), M.B.A (H.R),
M.Drama (Acting), M.Drama (Prod & Dirt), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

The information and views expressed and the research content published in this journal, the sole responsibility lies entirely with the author(s) and does not reflect the official opinion of the Editorial Board, Advisory Committee and the Editor in Chief of the Journal **"IDEAL"**. Owner, printer & publisher Vinay S. Hatole has printed this journal at Ajanta Computer and Printers, Jaisingpura, University Gate, Aurangabad, also Published the same at Aurangabad.

Printed by

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

Printed by

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

Cell No. : 9579260877, 9822620877 Ph. No. : (0240) 2400877

E-mail : ajanta6060@gmail.com, www.ajantaprakashan.com

IDEAL - ISSN 2319 - 359X - Impact Factor - 6.601 (www.sjifactor.com)

EDITORIAL BOARD

Mehryar Adibpour
Faculty of Computing London
Metropolitan University,
Holloway Road, London.

Dr. Ashaf Fetoh Eata
College of Art's and Science,
Salmau Bin Adbul Aziz University. KAS

Dr. Altaf Husain Pandi
Dept. of Chemistry University
of Kashmir, Kashmir, India.

Dr. Ramdas S. Wanare
Associate Professor & Head Accounts & Applied Stat,
Vivekanand Art's Sardar Dalip Sing Commerce
& Science College Samarth Nagar, Aurangabad (M.S.)

Dr. Prashant M. Dolia
Dept. of Computer Science and Applications,
Bhavnagar University, India.

Dr. P. A. Koli
Professor & Head (Retd),
Dept. of Economics, Shivaji University,
Kolhapur - (M.S.) India.

Dr. Rana Pratap Singh
Professor & Dean School for Environment Science,
Dr. Babasaheb Bhimrao Ambedkar University
of Raebareily, Lucknow- India.

Dr. Joyanta Barbora
Head Dept. of Sociology University of
Dibrugarh- India.

Dr. Jagdish R. Baheti
H.O.D., SNJB College of Pharmacy,
Neminagar, Chandwad, Nashik (M.S.) - India.

Prof. P. N. Gajjar
Head, Dept. of Physics,
University of School of Sciences,
Gujarad University, Ahmedabad- India.

Dr. Memon Ubed Mohd Yusuf
Asst. Prof. Dept. of Commerce,
Sir Sayyed College Aurangabad (M.S.) - India.

PUBLISHED BY

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

CONTENTS OF ENGLISH PART - I

S. No.	Title & Author	Page No.
1	Discrimination against Dalit in India with Reference to Human Rights **Dr. Gobinda Chandra Sethi**	1-5
2	Correlation between Spatial Intelligence and Mathematics Attitude of Secondary Students **Ku. Nita Laxmanrao Choure** **Dr. Suhaskumar Ruprao Patil**	6-9
3	Efficacy of Benomyl against Wilt of *Coriandrum Sativum* Linn., Caused by *Fusarium Oxysporum* F. Sp. Coriandrii **R. S. Karpe** **T. R. Kavale**	10-14

CONTENTS OF MARATHI PART - I

अ.क्र.	लेख आणि लेखकाचे नाव	पृष्ठ क्र.
१	संयुक्त राष्ट्रसंघ व मानवाधिकार **डॉ. संगीता भुयार**	१-४
२	अपंगांच्या (दिव्यांग) शिक्षणाचे स्वरूप व सद्यास्थिती **प्रा. डॉ. किर्ती सदार** **प्रभावती चं. चव्हाण**	५-१०
३	'स्त्री पुरूष समानता' (वास्तवीकता आणि भ्रम) **रश्मी महाजन (वानोडे)** **प्रा. डॉ. किर्ती सदार**	११-१५
४	पोलिस कर्मचाऱ्यांचा सामाजिक व मानसिक स्थिती: शोध साहित्य सर्वेक्षण **श्री. तुषार कांबळे**	१६-२१
५	साहित्यकृतीचे माध्यमांतर: स्वरूप आणि प्रक्रिया **प्रा. डॉ. विवेक कमलाकर खरे**	२२-२७
६	औरंगाबाद शहरातील माध्यमिक स्तरावरील अनुदानित व विनाअनुदानित शाळेतील शिक्षकांच्या व्यावसायिक ताणाचा तुलनात्मक अभ्यास **डॉ. शेख सुभान हसन**	२८-३३

CONTENTS OF HINDI PART - I

अ.क्र.	लेख आणि लेखकाचे नाव	पृष्ठ क्र.
१	सुशासन व लोकतान्त्रिक सरकार में मीडिया की भूमिका : कोविड-१९ के सन्दर्भ में। **डॉ. शालिनी चतुर्वेदी**	१-६

VOLUME - IX, ISSUE - II - MARCH - AUGUST - 2021
IDEAL - ISSN - 2319 - 359X - IMPACT FACTOR - 6.601 (www.sjifactor.com)

१. संयुक्त राष्ट्रसंघ व मानवाधिकार

डॉ. संगीता भुयार
सहाय्यक प्राध्यापक, विभाग प्रमुख (राज्यशास्त्र), श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती.

मानवाधिकार म्हणजे असे अधिकार जे मनुष्याच्या जीवनाला प्रतिष्ठा देणे, त्याचा आदर करणे, त्याचा विकास करणे आणि त्याच्या सर्व स्वाभाविक अधिकारांचे जतन करणे होय. हे सर्व अधिकार मनुष्याला त्याच्या संस्कृती आणि श्रमातून प्राप्त होतात. मानवाधिकार आणि मूलभूत स्वातंत्र्य हे जन्मजात असून त्याचे संरक्षण आणि विकास करणे ही सरकारची जबाबदारी असते. मानवाधिकराच्या संरक्षण व संवर्धनाची जबाबदारी आंतरराष्ट्रीय स्तरावर संयुक्त राष्ट्र संघ पार पाडते आहे. त्या संदर्भातील शास्त्रशुद्ध मांडणी प्रस्तूत शोध पत्रातून केलेली आहे.

जून १९४५ ला सॅनफ्रान्सिस्को येथे संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना करताना अमेरिका, ब्रिटेन, फ्रान्स आणि रशियाचे शासन प्रमुख एकत्र आले असताना चाळीस निमशासकीय धार्मिक गटाचे प्रतिनिधी सभेला हजर असताना मनुष्याच्या मूलभूत अधिकारांच्याबाबतीत जास्तीत जास्त प्रभाव टाकून, स्त्रियांचे अधिकार, मजूर संघटना स्थापन करण्याचा अधिकार आणि धार्मिक समुदाय स्थापन करण्याचा अधिकार इत्यादी बाबतीत संयुक्त राष्ट्रसंघाच्या कलमामध्ये अंतर्भाव करण्यास प्रवृत्त केले. संयुक्त राष्ट्रसंघाच्या चार्टरमधील पहिल्या आणि इतर सहा कलमात मनुष्याच्या मूलभूत अधिकाराचे आणि मूलभूत स्वातंत्र्याचे विस्तृत वर्णन करण्यात आले आहे. जगातील सर्व स्त्री-पुरूषांना समान वागणूक देण्यात यावी तसेच राज्य लहान असो किंवा मोठे त्या सर्वांना समसमान अधिकार प्रदान करण्यात यावे. मानवाधिकाराला मान देणे आणि कोणत्याही प्रकारे जात, लिंग, भाषा, किंवा धर्म इत्यादीबाबतीत भेदभाव न करतासामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक याबाबतीत सर्वांना समान संधी उपलब्ध व्हावी असे नमूद करण्यात आले.

संयुक्त राष्ट्र संघाच्या घोषणेत एक विस्तृत प्रस्तावनेशिवाय ३० अनुच्छेद आहेत. संयुक्त राष्ट्रसंघाच्या निरनिराळ्या कलमांमध्ये मूलभूत अधिकाराचे दोन भाग पाडण्यात आले असून पहिल्या भागात सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक अधिकारांचा अंतर्भाव होतो. दुसऱ्या भागात नागरीक व राजकीय अधिकारांचा समावेश करण्यात आला असून या दोन्ही अधिकरांना "आंतरराष्ट्रीय बील ऑफ ह्यूमन राईटस" असे संबोधण्यात आले आहे. १९७६ मध्ये १४८ देशांच्या शासन प्रमुखांनी एका सभेत आंतरराष्ट्रीय पातळीवर सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक अधिकारांना पाठिंबा देऊन राष्ट्रीय पातळीवर या अधिकारांचे जतन, संवर्धन आणि अंमलबजावणी करण्याचे सर्वांनी मान्य केले. संयुक्त राष्ट्र संघाच्या चार्टरप्रमाणे सर्वांना काम करण्याची संधी उपलब्ध व्हावी, जीवन जगतांना सर्व मानवाचे संरक्षण व्हावे, राहणीमानाचा दर्जा कायम राहावा आणि शारीरिक व मानसिक स्वास्थ्य सर्वांना लाभावे तसेच सर्वांना शैक्षणिक अधिकारासह सांस्कृतिक स्वातंत्र्य तथा वैज्ञानिक प्रगती करण्याची संधी मिळावी असे ठरविण्यात आले कलम २२ ते २७ पर्यंत सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक अधिकारात खालीलप्रमाणे नमुद केलेले आहेत-

१) सामाजिक सुरक्षिततेचा अधिकार, २) काम करण्याचा अधिकार व समान कामाला समान वेतन मिळण्याचा अधिकार, ३) संस्था-संघटना स्थापन करून त्याचे सभासद होण्याचा अधिकार, ४) व्यापार-व्यवसाय करण्याचा अधिकार, ५) राहणीमानाचा दर्जा कायम ठेवण्याचा अधिकार म्हणजेच शारीरिक व मानसिक स्वास्थ्य चांगले ठेवण्याचा अधिकार, ६) शिक्षण घेण्याचा व शिक्षण देण्याचा अधिकार, ७) सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये भाग घेण्याचा अधिकार.

संयुक्त राष्ट्रसंघ ही संघटना जागतिक पातळीवर सामान्य लोकांची प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे सामाजिक, आर्थिक, राजकीय वैगेरे पातळीवर जोपासना आणि संरक्षण करते आणि म्हणूनच संयुक्त राष्ट्रसंघाला मानवतेचे संरक्षण करणारा रखवालदार म्हणावयास हरकत नाही. संयुक्तराष्ट्रसंघाने आपल्या विकास कार्यक्रमात मानवाच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण व जतन करण्यास अग्रक्रम दिला असून १९४६ मध्ये मानवाच्या सर्वांगिण विकास व प्रगतीसाठी एका आयोगाची स्थापना केली. त्यावर एका उच्च आयुक्तांची नेमणूक करण्यात आली. या उच्च आयुक्तांचा दर्जा सुरक्षा परिषदेच्या सेक्रेटरी जनरलच्या बरोबरीचा आहे. आमसभेने फेब्रुवारी २००४ ला कॅनडाच्या लूईस आरबोट यांना संयुक्तराष्ट्र संघाच्या आयोगाचे आयुक्त म्हणून मनुष्याच्या मूलभूत अधिकारांचा अहवाल आर्थिक व सामाजिक मंडळाला सादर करतात. त्याचप्रमाणे उच्च आयुक्त निरनिराळ्या शासनाच्या प्रतिनिधीशी मूलभूत अधिकारासंबंधी बोलणी करतात.

मानवाधिकारांच्या संरक्षणाची व त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाची भूमिका उत्तरोत्तर वाढतच आहे. संयुक्त राष्ट्रसंघाला मानव अधिकाराची यंत्रणा शक्तिशाली आणि परिणामकारक करण्यासाठी उच्च आयुक्त निरनिराळ्या देशाच्या शासनाशी प्रत्यक्ष संपर्क साधून बोलणी करतात. संयुक्तराष्ट्रसंघाच्या पहिल्या चार्ट प्रमाणे मूलभूत अधिकारासंबंधी असे म्हटले आहे की,'आम्ही संयुक्त राष्ट्रसंघाचे सभासद असा निर्धार करतो की मानवाच्या मूलभूत अधिकारांची आणि मूलभूत स्वातंत्र्याची हमी देऊन असा ठाम विश्वास व्यक्त करतो की, पुरूष किंवा स्त्री आणि राष्ट्र लहान असो व मोठे या सर्वांना समान अधिकार आणि समान विकासाची संधी उपलब्ध करून देण्याची हमी देतो'. १९५१ नंतर म्हणजे युद्धापूर्वी किंवा युद्धात किंवा युद्धानंतर हत्या करण्याला आंतरराष्ट्रीय गुन्हा समजण्यात येईल असे एका कलमान्वये नमूद करण्यात आले आहे. दुसऱ्या महायुद्धात हिटलरने लाखों 'ज्यू' लोकांची निर्घृण हत्या केली होती आणि यालाच इतिहासात 'न्युरेमबर्ग क्राईम' असे म्हणतात. युगोस्लाव्हियाच्या मार्गो शासकाविरूद्ध कार्यवाही करण्यासाठी इंटरनॅशनल क्रिमिनल ट्रिब्युनल फॉर युगोस्लाव्हियाची स्थापना करून कार्यवाही करण्यात आली. तसेच मध्य आफ्रिकेच्या रेवांडांच्या शासनाविरूद्ध कार्यवाही करण्यासाठी 'इटरनॅशनल क्रिमीनल ट्रिब्यूनल फॉर रेवांडीची स्थापना करून कार्यवाही करण्यात आली.

आणिबाणीच्या काळात म्हणजे युद्ध किंवा गृहयुद्धाच्या वेळी स्त्रिया आणि लहान मुले यांचे संरक्षण राज्याने करावे आणि याची संपूर्ण जबाबदारी राज्यावरच राहील असे संयुक्त राष्ट्र संघाच्या कलमामध्ये नमूद करण्यात आले आहे. पहिल्या दुसऱ्या व शीतयुद्धाच्या काळात लाखो स्त्रिया आणि लहान मुले मारली गेली म्हणून हा ठराव पारीत करावा लागला. १९९१ मध्ये ४३ देशाच्या सरकारांनी मृत्यूदंडाची शिक्षा बंद करण्यात यावी असा ठराव करून समितीपुढे स्वाक्षऱ्या केल्या. खून करणाऱ्या व्यक्तीला फाशी द्यावी किंवा देऊ नये हा वाद-विवादाचा मुद्दा असून यावर जागतिक पातळीवर राजकीय व बुद्धिवंत लोकांचे एकमत झालेले नाही तसेच निरनिराळ्या देशातील न्यायाधिशांचेही यावर एकमत झालेले आढळत नाही.

जगातील प्रत्येक व्यक्तिला उदरनिर्वाहाचा किंवा प्रवासाच्या निमित्ताने एका देशातून दुसऱ्या देशी जाण्याचा अधिकार देण्यात आला. या ठरावाची अंमलबजावणी डिसेंबर २००२ मध्ये करण्यात आली. प्रत्येकाच्या अधिकारांचे संरक्षण या ठरावाप्रमाणे करण्यात येईल असे गृहीत धरून निरनिराळ्या देशांच्या प्रतिनिधींनी स्वाक्षऱ्या केल्या यालाच 'प्रोटेक्शन ऑफ ऑल राईटस ऑफ मायग्रेशन' असे म्हणतात. २००४ मध्ये याकरीता कायदेशीर व बेकायदेशीरपणे राहणाऱ्या लोकांचे सर्वेक्षण करण्यासाठी एका समितीचे गठन करण्यात आले. व्हिएन्ना या शहरी १७१ देशाचे प्रतिनिधी तथा जागतिक पातळीवरील ७०० अशासकीय संघटनांचे प्रतिनिधी तथा संयुक्त राष्ट्रसंघाच्या विभागाचे आयुक्त आणि इतर अधिकारी या संमेलनात एकत्र आले असताना मानवाच्या मूलभूत अधिकारांचे जतन व पालन करण्याची हमी आणि मान्यता देण्यात आली.

शरणार्थींना आसरा देण्याचा अधिकार या ठरावाला मान्यता देऊन सदस्य देशांनी संधीवर स्वाक्षऱ्या केल्या. या अधिकाराची प्रत्येक देशाने अंमलबजावणी करावी असे ठरले. १४२ देशांनी या संधीला मान्यता दिली. संयुक्त राष्ट्र संघाने शरणार्थींच्या काही समस्या सोडविण्याकरीता एका वेगळ्या आयोगाची स्थापना करून त्यावर देखरेखीसाठी एका आयुक्तांची नेमणूक करण्यात आली आहे. या आयोगाकडे आंतरराष्ट्रीय जबाबदारी सोपविली आहे. इस्त्राईल आणि पॅलेस्टाईन या दोन देशांच्या भूप्रदेशाबाबतीत अनेक वर्षांपासून संघर्ष आहे. १९४८ आणि त्यानंतर लाखो पॅलेस्टाईन मुस्लिम बेघर झालेत. संयुक्त राष्ट्रसंघाने ७ लाख ५० हजार निराश्रीत लोकांकरीता मध्यपूर्वेकडील जॉर्डन, लेबनान, सिरिया, गाझा स्ट्रीप आणि वेस्ट बँक याठिकाणी कँम्पमध्ये राहण्याची, खाण्याची व शिक्षणाची व्यवस्था करण्यात आली. युनोच्या आमसभेत १९४९ मध्ये 'युनायटेड नेशन रिलीफ, अॅन्ड वर्कस एजंन्सी फॉर पॅलेस्टाईन रिफ्यूजी' ची स्थापना करण्यात आली. यात सुधारणा करण्यात येऊन एक मॅडेंटव्दारे याची मुदत ३० जून २००५ पर्यंत वाढविण्यात आली होती.

१९७४ च्या युनोच्या आमसभेत कोणतीही व्यक्ती उपाशी राहणार नाही आणि त्यामुळे तिचा मृत्यू होणार नाही याची काळजी सर्व राज्यांनी घ्यावी आणि सर्वांना सकस आहार मिळावा याची व्यवस्था करावी असे ठरविण्यात आले. दरवर्षी लाखो लहान मुले सकस आहाराच्या अभावी योग्य प्रकारे त्यांच्या आरोग्याची काळजी न घेतल्यामुळे दगावतात. त्याचप्रमाणे युद्ध किंवा गृह-युद्ध यामुळेही लहान मुलांचा मृत्यू होतो. त्यामुळे युद्धाला मानवी गुन्हा म्हणून आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्यता मिळाली यामुळे लहान मुलांचे सरंक्षण होण्यास जागतिक पातळीवर मदत होईल तसेच संयुक्त राष्ट्रसंघाच्या विकास कार्यक्रमांतर्गत 'युनायटेड नेशन्स चिल्ड्रेन्स फंड सुरू केला आहे. १९८९ च्या संधीप्रमाणे लहान मुलांशी कोणत्याही प्रकारचा अनैतिक व्यवहार, लैंगिक संबंध, मुला-मुलांची विक्री, शारीरिक व मानसिक छळ यातना दिल्यास, अवैधरीतीने लहान मुला-मुलींना दत्त घेतल्यास, युद्धाच्या वेळी, नंतर किंवा आधी हत्या केल्यास तो आंतरराष्ट्रीय गंभीर गुन्हा समजण्यात येऊन अशा प्रकारच्या गुन्हाविरूद्ध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय न्यायालयात खटला भरून त्या विरूद्ध किंवा राज्याच्या शासनकर्त्याविरूद्ध गंभीर कार्यवाही करण्यात येईल असे ठरविण्यात आले. निरनिराळ्या देशाच्या प्रतिनिधींना या संधीला मान्यता देऊन अंमलबजावणी करण्याचे ठरविले.'

सर्वसामान्य दृष्टिकोणातून विचार केल्यास मुलभूत अधिकाराचे जतन करणे हे देशाच्या शासकीय नीतीवर अवलंबून असते असे मत लुईस मेन किन यांनी मांडले आहे. ज्या देशात सांसदीय लोकतांत्रिक शासन पद्धती असते. त्या देशात

सामान्यत: व्यक्तीच्या मूलभूत अधिकाराची जोपासना केली जाते आणि मूलभूत अधिकारांवर अतिक्रमण किंवा हनन होण्याच्या समस्या किंवा तक्रारी फार कमी प्रमाणात आढळतात याऊलट साम्राज्यशाही किंवा भांडवलशाही किंवा राजेशाही शासनप्रणानली असते त्या देशात मूलभूत अधिकाराची दखल फार कमी प्रमाणात घेतली जाते. इराण, इराक, अफगाणिस्तान आणि सौदी अरेबिया या मुस्लिम राज्यात तथा मध्यपुर्वेकडील काही देशात अलीकडे मूलभूत अधिकारांचे वारंवार हनन होण्याच्या गंभीर तक्रारी युनोकडे येत असून युनो याबाबतीत परिषदा, सभा, संमेलने आणि अधिवेशन आयोजित करून मूलभूत अधिकारांवर चर्चा करीत आहे. कधी-कधी युनो त्या-त्या देशाच्या किंवा राज्याविरूद्ध कार्यवाही करते. सोमालिया, बुरंडी, रवांडा व फॉर्मर युगोस्लाव्हिया यांच्या विरूद्ध आंतरराष्ट्रीय न्यायालयामार्फत कार्यवाही करून शिक्षा करण्यात आली आहे. ज्या-ज्या वेळी मानवाधिकारावर अतिक्रमण झाले त्या-त्यावेळी संयुक्त राष्ट्रसंघाने आणि सुरक्षा परिषदेने त्या-त्या देशांच्या विरूद्ध सैनिकी कार्यवाही करून, व्यापारावर बंदी घालून किंवा शस्त्रास्त्रावर बंदी घालून आंतरराष्ट्रीय नियमाप्रमाणे वेळोवेळी कार्यवाही करण्यात आली. जसे इराक, युगोस्लाव्हिया, लिडिया, रेवांड, सोमालिया, सुदान, अंगोला, सिरिया, अफगाणिस्तान इत्यादी.

निष्कर्ष

एकूणच मानवी हक्कांचे संरक्षण व संवर्धन अपेक्षेप्रमाणे नसल्याच्या काही घटनादेखील समोर येतच राहतात, मानवाधिकारांवर गदा आणणाऱ्या सर्व समस्यांवर उपाययोजना संयुक्त राष्ट्र संघटना करीत असते व प्रत्येक देशातील प्रत्येक व्यक्तीच्या अधिकारांची हमी व त्यांना सुरक्षित करण्याचा विश्वास व जबाबदारी पार पाडतांना दिसून येते. तरी सुद्धा आजच्या आधुनिक जगात मानवाधिकाराचे संरक्षण व संवर्धन करण्याकरिता आंतरराष्ट्रीय पातळीवर संयुक्त राष्ट्रसंघाद्वारे केले जाणारे प्रयत्न नाकारण्यासारखे नाही. आज संयुक्त राष्ट्रसंघाद्वारे मानवाधिकारांच्या संरक्षण व संवर्धनाकरिता विविध प्रकारे प्रयत्न करण्यात येत आहेत. संयुक्त राष्ट्रसंघाद्वारे नियमित परिषदा, चर्चासत्र इत्यादींद्वारे प्रयत्न केल्या जात आहे. जगातील प्रत्येक व्यक्तीला मानव या नात्याने प्राप्त झालेले अधिकार मिळावे, कळावे यासाठी प्रयत्न केल्या जात आहे. आजच्या युगात याचे चांगले परिणामसुद्धा दिसून येत आहेत. जागतिक स्तरावर मानवाधिकारांचे संवर्धन, संरक्षण व प्रसार करण्याकरिता संयुक्त राष्ट्रसंघाद्वारे जे प्रयत्न केले जात आहेत ते वाखाणण्याजोगे आहे आणि त्याचे श्रेय हे निश्चितपणे संयुक्त राष्ट्रसंघाला जाते.

संदर्भसूची

१. गाबा ओमप्रकाश - 'समकालिन राजनिती सिद्धांत', मयुर पेपरबैक्स, नोएडा, २००६
२. फडिया बी. एल. - 'आंतरराष्ट्रीय राजनिती', साहित्य भवन पब्लिकेशन, आगरा, २००५
३. पंजवाणी करीम इब्राहीम - 'संयुक्त राष्ट्रसंघ व अशासकीय संघटना', अव्दैत प्रकाशन अकोला, २००७
४. अग्रवाल, डॉ. एच. ओ. - मानव अधिकार, सेंट्रल लॉ पब्लिकेशन्स, इलाहाबाद, २००८
५. बाबेल, डॉ. बसन्ती लाल - मानवाधिकार, सेंट्रल लॉ पब्लिकेशन्स, इलाहाबाद, २०००
६. बिसवास, तपन - मानवाधिकार जेन्डर एवम् पर्यावरण, विवा बुक प्रा. लि. नई दिल्ली, २००८
७. देवळाणकर, डॉ. शैलेंद्र - संयुक्त राष्ट्रे : आंतरराष्ट्रीय राजकारणाची बदलती समीकरणे आणि संयुक्त राष्ट्राची भूमिका, प्रतिमा प्रकाशन, २००८.

यशवंतराव चव्हाण आणि पंचायतराज व्यवस्था

संपादक
डॉ. राजेश करपे । डॉ. गणेश मोहिते



ISSN: 2455-6211
Volume 10, Issue 3
March 2022
Impact Factor : 7.429

IJARESM

IJARESM

International Journal of All Research Education & Scientific Methods

An ISO Certified Peer-Reviewed Journal
ISSN: 2455-6211

IMPACT FACTOR: 7.429

One Day National Conference on Yashwantrao Chavan and Panchayat Raj System," held on 26th March, 2022 was organized by LokSanwad Foundation Aurangabad, Maharashtra.

तुका म्हणे भेदा। करुनि करितो संवादा ॥

लोकसंवाद फाउंडेशन

International Journal of All Research Education and Scientific Methods (IJARESM), ISSN: 2455-6211
Volume 10, Issue 3, March- 2022, Impact Factor : 7.429, Available online at : www.ijaresm.com

... अनुक्रम...

१)	डॉ. आर. के. काळे	१२
२)	डॉ. सायवण्णा घोडके	१७
३)	प्रा. डॉ. अरुण बाबा	२०
४)	डॉ. मधुकर गुलाबराव शिंदे	२३
५)	प्रा. डॉ. बाय. ई. भालेराव	२७
६)	प्रा. डॉ. सुनिता अविनाश शिंदे	३१
७)	किरण रामकृष्ण राऊत, डॉ. रमाकांत तिडके	३५
८)	डॉ. प्रा. शेख एजाज एम, शेख इस्माईल महेबुब	३७
९)	अशोक रामचंद्र गोरे	४०
१०)	प्रा. संतोष मारकवाड	४३
११)	प्रा. डॉ. गिऱ्हे डी. पी.	४८
१२)	राजरत्न शं. गवई	५१
१३)	डॉ. विनोदकुमार विलासराव वायचळ 'वेदार्थ'	
१४)	प्रा. डॉ. संजय बाबुराव बाकळे	५७
१५)	प्रा. डॉ. अंबादास पांडुरंग बर्वे	६२
16)	**Dr. Ajay Sahebrao Deshmukh, Dr. Ravikiran Jaydeo Swant**	**66**
१७)	डॉ. उमाकांत राठोड, संभाजी अंकूश तांबे	७०
१८)	डॉ. गंगणे अमोल उत्तमराव	७४
१९)	प्रा. दीक्षित साहेबराव ज्ञानोबा	७८
२०)	प्रा. जोगदंड मकरंद बळीराम	८२
२१)	डॉ. महेश विनायक रोटे	८६
२२)	डॉ. मनिषा सुरासे	८९
२३)	डॉ. नीता र. तोरणे	९२
२४)	प्राचार्य डॉ. दीपक गोविंद देशपांडे	९६
२५)	प्रा. डॉ. गजानन पांडुरंग जाधव	९९
२६)	प्रा. मुलाणी एस. पी.	१०३
२७)	प्रा. परसराम एकनाथ शेळके	१०७
28)	**Mr. Sachin N. Sanap**	**110**
२९)	डॉ. दीपक भुसारे	११३
३०)	डॉ. जनार्दन श्रीकांत जाधव	११६
31)	**Dr. Yogesh A. Patil**	**122**
३२)	प्रा. माधवी सुरेंद्र पवार	१२४
३३)	डॉ. मधुकर विठोबा जाधव	१३०
३४)	स्वाती चेके	१३३
३५)	छाया श्रीमंत साळवे	१३७
३६)	डॉ. रमाकांत शिवाजीराव शातलवार	१४१
३७)	श्री. विश्वास शहाजीराव यादव	१४५
३८)	प्रा. राठोड ईश्वर लक्ष्मण, प्राचार्य डॉ. एस. पी. गायकवाड	१४८
३९)	डॉ. खाडप संजय बाबुराव	१५३
४०)	सखाराम शहादेव शिंदे	१५६
४१)	प्रा. डॉ. गितांजली सदाशिवराव मोटे, श्री. विष्णू कडूबा देवरे	१५९
४२)	भोरे किरण मोही	१६३
४३)	डॉ. साहेब राठोड, गणेश मारोती कचरे	१६७
४४)	डॉ. नामानंद गौतम साठे	१७०
४५)	प्रा. डॉ. रमाकांत तिडके, श्रीमती संजीवनी दिगंबर डावकर	१७१
४६)	डॉ. जयश्री आसाराम तळेकर	१७७
४७)	उजमा ऐनोद्दीन सिद्दीकी	१८०
४८)	प्रा. डॉ. सदाशिव हरिभाऊ सरकटे, उर्मिला नारायण क्षीरसागर	१८२
४९)	डॉ. किरण नामदेव गायकवाड	१८६
५०)	प्रा. डॉ. सोनकांबळे चेतना प्रल्हाद, डॉ. सांजुरे दिपक प्रल्हाद	१९०
५१)	डॉ. ऊर्जित जनार्दन करवंदे	१९५
५२)	प्रा. डॉ. सदाशिव हरिभाऊ सरकटे, अनिता मदनराव शिंदे	१९८
53)	**Dr. Nirmal E. S.**	**202**
५४)	लोंढे अभिजीत शंकरराव	२०६
५५)	प्रा. डॉ. कृष्णा भवारी	२११
५६)	लेफ्ट. डॉ. पावडे खोब्राजी वामनराव	२१५
57)	**Vinyak Nikas**	**218**
५७)	घायतडके सचिन सहादू	२२१
58)	**Rakhonde M. K.**	**226**
५९)	प्रा. डॉ. कालिदास दिनकर फड	२३१
६०)	डॉ. प्रतिभा चिकमठ	२३३
६१)	शिंदे सखाराम बाबूराव	२३८
६२)	प्रा. डॉ. सदाशिव हरिभाऊ सरकटे, मिनाक्षी मोतीराम इंगळे	२४३
६३)	कु. सोनाली लक्ष्मणराव इंगळे	२४६
६४)	पवार रागिणी व्यंकटराव	२४९
६५)	प्रा. दत्तात्रय दादासो जाधव	२५३
६६)	अभिनिता लक्ष्मण वनकर	२५८
६७)	प्रिती किशोर ढेपे	२६२

International Journal of All Research Education and Scientific Methods (IJARESM), ISSN: 2455-6211
Volume 10, Issue 3, March- 2022, Impact Factor : 7.429, Available online at : www.ijaresm.com

... अनुक्रम...

२०१) डॉ. कैलास इंगळे ७९८
२०२) डॉ. रमेश बलभीम जाधवर ८०२
२०३) प्रा. डॉ. संतोष तुकाराम कदम ८०६
२०४) डॉ. राखी सिद्राम सलगर ८११
२०५) डॉ. प्रमोद राजेंद्र ८१६
२०६) प्रा. डॉ. रमाकांत तिडके ८२४
२०७) श्रीमती सय्यद एस. एस. ८२७
२०८) संदीप संपतराव घाळक ८३१
२०९) प्रा. डॉ. विनायक पवार, प्रा. कृष्णा उ. नागरे ८३५
२१०) प्रा. डॉ. गिरी डी. व्ही. ८४०
२११) प्रा. डॉ. पवार अविनाश विलासराव ८४३
२१२) प्रा. बालाजी रावसाहेब वोडके ८४८
२१३) प्रा. डॉ. जाधवर वी. डी. ८५४
२१४) प्रा. डॉ. डी. एम. पंदिलवाड ८५७
२१५) प्रा. डॉ. नितिन चांगोले ८६०
२१६) खंडेराव हरिभाऊ काळे ८६३
२१७) अमोल आदिनाथ अवचार ८६६
२१८) प्रा. श्रीमती सुनिता किसन भोसले, प्रा. महेश न. गायकवाड ८७०
२१९) प्रा. अक्षयकुमार बाळासाहेब हारेपाटील ८७३
२२०) संतोष रामराव डवरे ८७७
221) Dr. Milind Y. Mane **880**
२२२) आसो. प्रो. डॉ. गंगणे आर. व्ही. ८८३
२२३) डॉ. सुखनंदन उत्तमराव ढाले, रुपाली वसंतराव देशमुख ८८७
२२४) कु. सुशीला असाराम शेजवळ, कु. छाया अनिल वाकोडे, प्रा. डॉ. सय्यदा रुकसाना तव्वस्सुम ८९२
२२५) डॉ. वैशाली शेषराव पेरके ८९६
२२६) डॉ. मथुरा मेवाड ९०३
२२७) डॉ. आर. वी. काळे ९०७
२२८) डॉ. शेखर मगर ९११
२२९) प्रा. डॉ. गणेश मोहिते ९१६
२३०) स. प्रा. मोरे तुकाराम सुर्यभानराव ९२०
२३१) डॉ. गोपाल गांगर्डे ९२४
२३२) अहिरे भगवान विठ्ठल, प्रो. डॉ. सदाशिव सरकटे ९३१
२३३) प्रा. डॉ. शत्रुघ्न फड ९३६
२३४) प्रो. डॉ. मनोहर सिरसाट ९४२
२३५) प्रा. सतीश रावसाहेब कदम, श्री. सिडास प्रेमदीप मारोतराव ९४६
२३६) प्रा. वनसोडे सुवर्णा ९५०
२३७) प्रा. डॉ. प्रिया भा. बोचे ९५४
२३८) डॉ. सतीश मस्के ९५९
२३९) ज्ञानेश्वर उद्धवराव अवचार, प्रा. डॉ. कैलास अर्जुनराव ठोंबरे ९६३
२४०) सुजाता गिरधारी चव्हाण, डॉ. दिलीप मिसाळ ९६७
२४१) श्रीमती संगीता फकिरा भोसले ९७२
२४२) डॉ. सुवर्णा भाऊसाहेब पाटील, डॉ. हंसराज दामोदर जाधव ९७७
२४३) प्रा. डॉ. काळे अर्चना भगवानराव, प्रा. डॉ. काळे मनीषा भगवानराव ९८२
२४४) प्रा. डॉ. मोघा शरदचंद्र पाठक ९८७
२४५) प्रा. डॉ. पांडुरंग माणिक नवल ९९०
246) Dr. Shirish Pawar **994**
२४७) प्रा. डॉ. राजेंद्र नामदेव मोरे ९९८
२४८) डॉ. रेणुका दशरथराव वडवणे १००४
२४९) आशा सुभाष पाटील १००७
२५०) प्रा. डॉ. हरिप्रसाद विडवे १०११
२५१) प्रा. डॉ. शिंदे सचिंद्र कल्याणराव १०१५
२५२) सुजाता गिरधारी चव्हाण, डॉ. दिलीप मिसाळ १०१८
२५३) ज्ञानेश्वर उद्धवराव आवचार, प्रा. डॉ. कैलास अर्जुनराव ठोंबरे १०२३
२५४) प्रा. डॉ. मनीषा भगवानराव काळे, लता नारायणराव जाधव १०२७
२५५) प्रा. डॉ. एस. यु. गावंडे, प्रा. अमोल विश्वासराव तायडे १०३४
२५६) सोनाली अनिल घोलप, डॉ. सतीश अर्जुन भोसले १०४१
२५७) गायत्री अविनाश रवंदळे, डॉ. विशाल शिवाजीराव करपे १०५०
२५८) सौ. वैशाली विजयकुमार जवराळ, डॉ. विशाल शिवाजीराव करपे १०५७
२५९) प्रा. डॉ. एस. यु. गावंडे, प्रा. अमोल विश्वासराव तायडे १०६३
२६०) प्रा. डॉ. ललिता नामदेव राठोड १०७०
२६१) डॉ. विद्यादेवी मनोहर कांबळे १०७४
२६२) फुके दिपीका बाबुराव १०७८
२६३) डॉ. आघाव एन. वी, किशोर कैलास बांवर्डे १०८२
२६४) प्रा. डॉ. जायभाये भगवान नाना १०८६
२६५) प्रा. डॉ. सदाशिव हरिभाऊ सरकटे, करांडे सारिका सांदिपान १०९०
२६६) डॉ. संजय कांबळे १०९४
२६७) प्रा. माने उषा यशवंतराव १०९७
२६८) कुवेर भरत पांडुरंग ११०२
२६९) श्रीमती मिराबाई सिदाजी माने ११०६
२७०) मीरा नारायण गायके ११०९
२७१) स्वाती वसंत सुर्यवंशी ११११४

International Journal of All Research Education and Scientific Methods (IJARESM), ISSN: 2455-6211
Volume 10, Issue 3, March- 2022, Impact Factor : 7.429, Available online at : www.ijaresm.com

यशवंतराव चव्हाण यांचे राजकीय कार्य

प्रा. डॉ. नितिन चांगोले

शिवाजी कला व वाणिज्य् महाविदयालय, अमरावती

प्रस्तावना

महाराष्ट्राच्या लोकप्रिय सुपुत्राचा परिचय, त्यांनी केलेल्या राजकिय क्षेत्रातील योगदानाची माहिती आजच्या पिढीला विशेषत: तरुण वर्गाला व्हावी या दृष्टीने हा शोधनिबंध लेखनाचा माझा उददेश. राजकारण, समाजकारण, साहित्य्, कला, सहकार, कृषि, उदयोग आणि प्रशासन अशा सर्वच क्षेत्रात यशवंतरावांनी भरीव कार्य केलेले आहे. सर जदूनाथ सरकार यांनी १९१९ च्या दरम्यान लिहिलेल्या शिवचरित्रात, भारतात महाराष्ट्र प्रांत अग्रेसर असून मराठी लोकांनी आणखी काही गुणांची जोपासना केल्यास महाराष्ट्र शंभर वर्षात संपूर्ण जगात अग्रेसर ठरेल असे विधान केले होते. जदूनाथ सरकारने केलेल्या अपेक्षा यशवंतराव चव्हाण यांनी पूर्ण केल्या असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वामुळे महाराष्ट्र निश्चितच सर्व बाबतीत अग्रेसर बनला. आधुनिक महाराष्ट्राच्या व भारताच्या इतिहासात यशवंतराव चव्हाण यांनी खुप महत्वाची भूमिका बजावली आहे. यशवंतराव चव्हाण यांच्या राजकीय कारकिर्दिचे तीन भागात विभाजन करता येईल.

पहिल्या भागात यशवंतराव चव्हाण यांची राजकीय जडणघडण्. दुसऱ्या व तिसऱ्या भागात त्यांच्या महाराष्ट्रातील व राष्ट्रीय राजकारणातील कार्याचा समावेश करता येईल. १९४६ मध्ये तत्कालीन मुंबई प्रांताच्या सरकारमध्ये गृहमंत्री असलेले मोरारजी देसाई यांचे संसदिय सचिव म्हणून यशवंतराव चव्हाण नियुक्त् झाले. १९८० साली ते देशाचे उपपंतप्रधान म्हणून निवृत्त् झले. या काळात त्यांनी राज्यात व केंद्रात अनेक क्षेत्रात मुलगामी बदल घडवून आणले. यशवंतराव एक अभ्यासू आणि परिस्थितीचे खोलवर विश्लेषन करणारे राजकीय नेते होते, म्हणूनच पंडीत नेहरुंच्या 'सामुदायिक शेती' च्या कल्पनेऐवजी यशवंतरावांनी 'सहकारी शेती' च्या तत्वांचा पुरस्कार केला. यशवंतराव चव्हाण मध्यममार्गाचा अवलंब करणारे नेते होते. त्यांना अभिप्रेत असणारे सामाजिक बदल प्रत्यक्षात आणण्यासाठी ते स्वत: प्रयत्नरत होते. यशवंतरावांचा पहिला कालखंड राजकिय सर्जनशीलतेचा होता. याकाळात त्यांनी लोकशाही मार्गाने महाराष्ट्र शेती, शिक्षण, सिंचन व सहकार यात बदल घडवून आणले. कृषिमालावर प्रक्रिया करुन सहकार, पंचायतराज व ग्रामविकास यांच्या साहयाने महाराष्ट्रात कृषी व औदयोगिक समाज स्थापन करण्याचे त्यांचे स्वप्न् होते. ओबीसी साठी त्यांनी ११ टक्के जागा राखीव केल्या. त्यामुळेच महाराष्ट्रात काँग्रेसला बळकट असा सामाजिक

पाया प्राप्त् झाला. तिसऱ्या भागात राष्ट्रीय राजकारण आणि आणीबाणीनंतरचे राजकारण यावर यशवंतराव यांनी बरीच चर्चा केली आहे. १९६२ ला चीनने भारतावर आक्रमण केले, त्यामध्ये भारतीय सैन्याला माघार घ्यावी लागली त्यामुळे संरक्षणमंत्री व्ही.के. मेनन यांना राजीनामा दयावा लागला. त्यांच्याजागी पंडित नेहरुंनी यशवंतराव चव्हाण यांची नियुक्ती केली. संरक्षण मंत्रालयात सेनाधिकाऱ्यात व सनदी अधिकाऱ्यात मतभेद, संघर्ष होता मात्र यशवंतरावांनी सर्वांशी बोलून परिस्थिती नियंत्रणात आणली. सैन्यदलात आत्म्विश्वास निर्माण केला. त्यानंतर १९६५ ला झालेल्या भारत-पाकिस्तान युध्दात भारतीय सैन्याने सर्वश्रेष्ठ

कामगिरी केली. संरक्षणमंत्री म्हणून जेव्हा यशवंतराव शस्त्रास्त्र खरेदीसाठी अमेरिका व इंग्लंडला गेले, तेव्हा त्यांच्या लक्षात आले की, हे देश भारताला शस्त्रास्त्र पुरवठा करण्यासाठी तयार नाहीत. अमेरिकेकडे त्यांनी आधुनिक विमानांची मागणी केली, मात्र अमेरिकेने विमाने पुरवठा केला नाही. इंग्लंडने देखील पाणबुडीची मागणी पूर्ण केली नाही. अमेरिका व इंग्लंडने शस्त्रास्त्र पुरवठा का नाकारला यासाठी यशवंतरावांनी सांगितले की, चीनला भारताचा विकास राखायचा आहे. तसेच आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताचा जो दबदबा तयार झाला आहे तो नष्ट करावयाचा आहे. यशवंतरावांनी केंद्रीय मंत्रीमंडळात संरक्षण खात्याचे मंत्री म्हणून यशस्वीरित्या जबाबदारी पार पाडली. जवळजवळ पंधरा वर्षे त्यांनी केंद्रीय मंत्रिमंडळाचे सदस्य् म्हणून काम केले. या काळात त्यांनी संरक्षणमंत्री, गृहमंत्री, अर्थमंत्री इत्यादी महत्वाच्या खात्यांची जबाबदारी समर्थपणे सांभाळली. १९७७ मध्ये केंद्रात जनतापक्ष अधिकारावर आल्यावर यशवंतरावांची संसदेतील विरोधी पक्षनेते म्हणून निवड झली. इ.स. १९७९ मध्ये चौधरी चरणसिंग यांच्या नेतृत्वात केंद्रात मंत्रिमंडळ अस्तित्वात आले. या मंत्रिमंडळात यशवंतराव चव्हाणांनी उपपंतप्रधानपद भूषविले. भारताच्या आठव्या वित्तआयोगाचे अध्यक्ष म्हणूनही त्यांची नियुक्ती झली.

चलनवाढीला आळा घालण्याचे कडक उपाययोजना धोरणाचा प्रारंभही यशवंतरावांच्या कारकिर्दित झाला. कार्यक्षममंत्री, यशस्वी संसदपटू आणि जनसामान्यातील ज्यांची मुळे रुजली आहेत असा उदारमतवादी नेता असे यशवंतरावांचे थोडक्यात वर्णन करता येईल. चाळीस वर्षापेक्षा जास्त् काळ ते राजकारणात होते आणि पंचवीस वर्षापेक्षा जास्त् काळ अधिकार पदावर त्यांनी काढला. ते उत्तम वक्ते व लेखक देखील होते. महाराष्ट्रराज्य् स्थापन झाल्यानंतर त्यांनी निरनिराळ्या क्षेत्रात अनेक नव्या उपक्रमांना चालना दिली. हे उपक्रम जसे सहकारी क्षेत्रातील होते तसेच जिल्हा परिषद, भाषा संचालनालय, साहित्य्, संस्कृती मंडळ वगैरेही होते. १९६९ साली काँग्रेसमध्ये फुट पडली तेव्हा ती सावरण्याचा आटोकाट प्रयत्न् यशवंतरावांनी केला. देशात यादवीचे वातावरण न ठेवता ते समन्वयाचे असावे असे मत यशवतंरावाचे होते. भारतासारख्या प्रचंड भिन्न् जातीधर्माच्या देशात त्याखेरीज आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक प्रगती होणार नाही ही यशवंतरावांची धारणा होती. ते पुरोगामी विचारसरणीचे राजकिय नेते होते. नीतीमूल्यांचा पुरस्कार व्यवहारात व्हावा अशी त्यांची मनोमन

इच्छा होती. झगमगाटापेक्षा सातत्य् व संस्थापना हे त्यांच्या नेतृत्वाचे वैशिष्ट होते तेच त्यांचे शक्तिस्थान होते. महाराष्ट्रात झालेल्या राजकिय, आर्थिक, सांस्कृतिक विकासाची मुळे ही यशवंतरावांच्या कार्यात आहे. त्यांनी असंख्य् महत्वाचे निर्णय घेतले. काही ठळक निर्णय पुढीलप्रमाणे

1) पंचायतराज या त्रिस्तरीय (जिल्हापरिषद, पंचायतसमिती, ग्रामपंचायत) व्यवस्थेची सुरुवात
2) राज्य् पंचवार्षिक योजनांचा प्रारंभ (आर्थिक विकास)
3) कोल्हापूर बंधाऱ्यांचा प्रसार, कोयना व उजनी या प्रमुख प्रकल्पांच्या उभारणीला गती. (मुलभुत सोई सुविधांचा विकास)
4) १८ सहकारी साखर कारखान्यांची स्थापना (सहकाराला चालना)
5) शिवाजी विदयापिठ व मराठवाडा विदयापिठाची स्थापना (शैक्षणिक विकास)
6) राज्यातील कृषी विदयापिठांच्या स्थापनेतही संकल्पनात्म्क सहभाग (कृषी विकास)
7) मराठी साहित्य् संस्कृती महामंडळ व विश्वकोष मंडळाची स्थापना (सांस्कृतिक विकास)

लोकशाहिचे विकेंद्रिकरण आणि पंचायतराज :-

यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राला दिलेली अमूल्य् देणगी म्हणजे पंचायतराज पध्दती. ग्रामिणभागाला केंद्रस्थानी मानून गावागावापर्यंत लोकशाही नेण्यासाठी, स्थानिक पातळीवर निर्णयाचे अधिकार देण्यासाठी पंचायतपध्दती आणण्यावर पंडित नेहरुंचा भर होता बलवंतराय समितीने केलेल्या शिफारशीनुसार काही राज्यात प्रत्यक्ष अंमलबजावणीलाही सुरुवात झाली. मात्र यशवंतराव चव्हाण यांनी त्यातील त्रुटी वसंतराव

नाईक यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून दुरुस्ती करुन यशवंतरावांनी स्वत:च पंचायतराज विधेयक महाराष्ट्रात लागू केले. त्यानुसार महाराष्ट्रात जिल्हापरिष्द, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत अशी त्रिस्तरीय रचना अस्तित्वात आली. महाराष्ट्रातही व्यवस्था यशस्वी ठरली. केंद्रसत्ता त्यामुळे गावपातळीपर्यंत विभागली गेली. या रचनेने महाराष्ट्राला मोठी देणगी दिली ती म्हणजे स्थानिक नेतृत्वाचा उदय.

सारांश :-

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य उभारणीत मराठा, कुणबी, मुस्लीम, ब्राम्हण, कायस्थ, धोबी, माळी, कोळी, भंडारी, न्हावी, साळी, वडार, धनगर, कुंभार, सोनार, लोहार, भोई, याशिवाय ज्यांना गावकुसात प्रवेश मिळत नव्हता अशा महार, मांग व चांभार जातीच्या लोकांना सुद्धा सामावून घेतले होते. या जातीच्या कष्टकऱ्यांनी स्वराज्यासाठी मृत्युला कवटाळत बलिदान दिले. यशस्वी राज्यकर्ता हा धर्मांध असून चालत नाही, हा संदेशच जणू छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या चरित्रात दिलेला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा लढा हा इस्लाम धर्म वा सर्व सामान्य मुसलमान यांचे विरोधात नव्हताच. त्यांचा लढा धर्मनिरपेक्ष स्वराज्याचा म्हणजे स्वधर्मरक्षणाचाही नव्हता. त्यांचा लढा स्वराज्याच्या आड येणाऱ्या विरूध्द होता. संत तुकारामाप्रमाणेच केळशी येथील मुस्लीम संत बाबा याकुत, मौनीबुवा हे शिवाजी महाराजांचे प्रेरणास्थान होते." धर्मांबाबत छत्रपती शिवाजी महाराजांचा दृष्टिकोन हा सर्वधर्मसमभावाचाच होता, ही बाब त्यांच्या चिरित्रातील अनेक प्रसंगावरुनही स्पष्ट होते. हिंदू बरोबरच अन्य धर्मियांमधील वैरागी, साधू, अवलियांचा ते आदर करीत. त्यांच्या उदर निर्वाहाची व्यवथा करीत. मुसलमानांचे पीर, मस्जिद यांची दिवाबत्ती व नेवैद्य व्यवस्था स्थान पाहून चालविले, इतकेच नव्हे तर मुस्लिम संत आणि मुस्लीम देवस्थानांना जमिनी इनाम देऊन यांच्या निर्वाहाची व्यवस्था शासकीय खर्चातून केली जात असे. छत्रपती शिवाजी महाराजांनी मुसलमान, ख्रिश्चन यांच्या धर्माचा आदरच केला. त्यांना वेळप्रसंगी मदत केली. याचा अर्थ असा नव्हे की, त्यांनी कट्टर धर्मात असलेल्यांना खपवून घेतले. 1669 मधील घटना आहे. औरंगजेबाने जेव्हा काशी विश्वेश्वराच्या मंदिराला उध्वस्त करुन तेथे मशीद बांधण्याचा प्रयत्न केला तेव्हा महाराजांना फार वाईट वाटले. त्यांनी औरंगजेबाला पत्र पाठवून आपला तीव्र निषेध नोंदविला. गोव्यातही तेथील ख्रिस्ती लोकांनी जेव्हा हिंदूचे जबरदस्तीने धर्मांतर करण्याचा प्रयत्न केला तेव्हा शिवरायांनी कुडाळच्या सावंताना वठणीवर आणण्याचे निमित्त करुन गोव्यावर स्वारी केली. जबरदस्तीने धर्मांतर करविणाऱ्यांना देहदंडाची शिक्षा फर्माबली. छत्रपती शिवाजी महाराजांचा धर्माकडे बघण्याचा दृष्टिकोन धर्मवादी वा धर्मांध नव्हता तर तो सर्वधर्मसमभावाचा होता, धर्मनिरपेक्ष होता. केवळ स्वराज्य स्थापन करुनच छत्रपती शिवाजी महाराज स्वस्थ बसले नाही तर ते सुराज्य कसे होईल याची त्यांनी पूर्ण काळजी घेतली. जुलुम-जबरदस्ती, वेठबिगार, गुलामी, अस्पृश्यता ह्या गोष्टींना स्वराज्यात थारा नव्हता. साधुसंतांना पूर्ण मोकळीक होती. शेतकरी व्यापारी निर्भय होते. स्त्रीयांचा पूर्ण आदर होता. धार्मिक स्थळांना, ग्रथांना हात लावण्याची कोणाचीही प्राज्ञा नव्हती. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य पूर्ण न्यायाचे होते. स्वराज्यात सर्वांना पूर्ण धार्मिक स्वातंत्र्य होते. इतर धर्मियांना छत्रपती शिवाजी महाराज अतिशय आदराने वागवित होते. इतर धर्माची धर्मस्थाने कोणीही नष्ट करु नयेत याची ते विषेश काळजी घेत असे. स्वारीवर मराठा सैनिकांनी धर्मस्थळांचा विध्वंस करु नये आणि धर्मग्रथांचा अवमान करु नये अशा सक्त सुचना मराठा सैनिकांना देण्यात येत असे. मशिदीची आणि मुसलमान साधुसंतांना देण्यात आलेली इनामे छत्रपती शिवाजी महाराजांनी चालू ठेवण्याची अनेक उदाहरणे आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी कोणत्याही

एका जातीचे नेतृत्व केल्याचे दिसून येत नाही. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांनी सैन्य निर्मिती करतांना सर्व जाती जमातींना समाविष्ट करुन घेतले होते. त्यात मराठे, ब्राम्हण, हेटकरी, प्रभू, रामोशी, महार, मुसलमान या सर्वांचा समावेश होता.

या सर्व वर्णनातून क्रमाणे एक चित्र साकार होते. वतनदाराच्या जुलमातून जनतेचे रक्षण करणारे छत्रपती शिवाजी महाराज, सर्वांचा धर्म, अब्रु आणि प्रतिष्ठा संरक्षण करणारे छत्रपती शिवाजी महाराज, परधर्माला आदरपूर्वक वागवणारे छत्रपती शिवाजी महाराज, आपल्या प्रजेच्या निष्ठा चारित्र्याच्या जोरावर संपादन करणारे छत्रपती शिवाजी महाराज असे हे जनतेच्या नेत्याचे चित्र आहे. या चित्राचा आकार मध्ययुगाप्रमाणे राजेशाहीचा आहे. त्याचा आशेय आपल्या काळाच्या कक्षा छेदून बाहेर पडणारा, लोकशाहीचा, धर्मनिरपेक्षतेचा व लोककल्याणाचा आहे. म्हणूनच त्यांचे चरित्र, त्यांचा लोककल्याणकारी कारभार आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्यांचा धर्मनिरपेक्ष स्वराज्य दृष्टीकोन या विषयाच्या अनुषंगाने शोधनिबंध सादर केला आहे.

निष्कर्ष

छत्रपती शिवाजी महाराजांना कर्तृत्ववान माणसांची कदर होती आणि अशी माणसे आपल्या भोवती जमवून राजांनी त्यांना प्रेरणा दिली. राजांचे सैन्याधिकारी, मुलकी कारभारी, सुभेदार आणि किल्लेदार, सेनापती आणि आणि आरमार प्रमुख ह्यांच्यात अनेक जातींचे आणि धर्माचे लोक होते. यावरुन धर्मनिष्ठेपलिकडे जाऊन एकीचे वातावरण निर्माण करण्याचे प्रयत्न छत्रपती शिवाजी महाराजांनी केल्याचे दिसून येते. छत्रपती शिवाजी महाराजांनी धर्मनिरपेक्ष स्वराज्य उभारणीत मराठा, कुणबी, ब्राम्हण, कायस्थ, धोबी, माळी, कोळी, भंडारी, न्हावी, साळी, वडार, धनगर, कुंभार, सोनार, लोहार, भोई, याशिवाय ज्यांना गावकुसात प्रवेश मिळत नव्हता अशा महार, मांग व चांभार जातीच्या लोकांना सुद्धा सामावून घेतले होते. या जातीच्या कष्टकऱ्यांनी स्वराज्यासाठी मृत्यूला कवटाळत बलिदान दिल्याचे दिसून येते. मुस्लिम धर्माबाबत शिवाजी महाराजांची धार्मिक सहिष्णुता अनेक रीतीने इतिहासात दिसून येते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्यात फक्त हिंदूच नव्हते, तर मुसलमान सुध्दा होते. शिवाजी महाराजांच्या कागदपत्रात शत्रूच्या धर्माविषयी उल्लेख आढळत नाही. मुसलमान हा शब्द पत्रात आढळत नाही. त्यांच्या पत्रात शब्द असतात. मुगल, तुर्क, पठाण, सिद्दी पण मुस्लीम केव्हाही नाही. यावरुन त्यांचा मुस्लीम धर्माविषयीचा धर्मनिरपेक्ष दृष्टिकोन दिसून येतो.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्यात अनेक मुस्लिमांनी योगदान दिले. दौलतखान, नुरखान बेग, शमाखान, काझी हैदर, इब्राहिम खान, सिद्दी इब्राहिम, रुस्तुमेजमान, मदारी मेहतर, सिद्दी हिलाल इत्यादी याशिवाय केळशीचे याकुतबाबा यांचा शिवाजी महाराज आदर करीत होते. यावरुन त्यांचा मुस्लीम धर्माविषयीचा धर्मनिरपेक्ष दृष्टिकोन समजून येतो. सर्वांनाच आपआपल्या धर्माप्रमाणे आचरण करण्याची स्वराज्यामध्ये मुभा होती. छत्रपती शिवाजी महाराजांनी तसे धार्मिक स्वातंत्र्यच बहाल केले होते. स्वराज्यात बहुतांश नागरिक हिंदूधर्मीय असले तरी इस्लाम वा अन्य धर्मियांना त्रास होणार नाही वा त्यांचेवर अन्याय होणार नाही, याची दक्षता छत्रपती शिवाजी महाराजांनी घेतली होती. धर्मव्देष वाढीस लागून तो आपल्या स्वराज्य स्थापनेच्या आड येणार नाही, याची पुरेपूर दक्षता त्यांनी घेतली होती. वा. सि. बेंद्रे आपल्या 'शिवचरित्र' या ग्रंथामध्ये लिहितात, 'स्थानिक मुसलमानांना आपल्या व्यक्तिगत धर्माचरणास स्वातंत्र्य दिले असल्यामुळे खेडोपाडी अल्पसंख्य असलेला मुस्लिम समाज आपला आयुष्यक्रम विनासायास घालवित होता.

हिंदूंच्या देवदेवतांना, मंदिरांना वतने, अनुदाने मिळत तशी मुस्लिमांच्या पीर, फकीर, दर्गा आणि मस्जिदीनांही अनुदाने आणि वतने दिली जात होती. त्यांच्या दिवाबत्तीची सोय सरकारी तिजोरीतून करण्यात येत असे. तसेच ज्याप्रमाणे महाराजांनी मंदिरे बांधली. त्याचप्रमाणे त्यांनी आपल्या मुस्लीम प्रजेसाठी रायगडावर मस्जिदही बांधली. स्वातंत्र्योत्तर काळात भारताने जे संविधान स्वीकारले आहे. त्यात मूलभूत हक्कामध्ये समावेश करीत धर्मस्वातंत्र्याचा हक्क बहाल केला आहे. म्हणूनच असे म्हणता येईल की, आधुनिक काळातील भारतीय राजकीय व्यवस्थेच्या धर्मनिरपेक्ष विचारांचे मुळ प्रेरणास्थान छत्रपती शिवाजी महाराज होते आणि तसेच ते आधुनिक राज्यव्यवस्थेतील धर्मनिरपेक्ष विचारांचे उद्गाते ठरतात. छत्रपती शिवाजी महाराजांचा धर्मविषयक दृष्टिकोन हा राजकारणातून नव्हताच तर तो सामाजिकतेमधूनच होता. त्यांनी धर्माचा उपयोग राजकारणासाठी केला नाही. याउलट इस्लाम राजवटी विरोधात राजसत्तेसाठी संघर्ष करीत असताना सुद्धा त्यांनी इस्लाम धर्म, इस्लामचे धर्मगुरु, इस्लामचा धर्मग्रंथ आणि सामान्य मुसलमान यांना सर्वधर्म समभावातूनच वागणूक दिली. म्हणूनच शिवाजी महाराजांचे स्वराज्य हे धर्मनिरपेक्ष होते असे म्हणता येईल.

स्वराज्य स्थापनेत छत्रपती शिवाजी महाराजांचे धोरण धर्मनिपपेक्षतेचे होते. हे प्रस्तुत शोधनिबंध तून सिध्द होते.

संदर्भसूची

1. कुलकर्णी, अ. रा.-अशी होती शिवशाही, राजहंस प्रकाशन, पुणे, 2012, पृ.क्र. 11
2. गॉर्डन, स्टुअर्ट; कुलकर्णी, र. कृ. (अनुवाद),-द मराठाज, डायमंड पब्लिकेशन, मुंबई-2016, पृ.क्र. 10
3. सोनवनी, संजय-जातीसंस्थेचा इतिहास, प्राजक्त प्रकाशन, पुणे, 2016, पृ.क्र. 121
4. कित्ता, पृ.क्र. 132
5. कित्ता, पृ.क्र. 133
6. केळूसकर, अर्जुन कृष्णराव-छत्रपती शिवाजी महाराज, साकेत प्रकाशन, पुणे, 2021, पृ.क्र. 313
7. पगडी, सेतुमाधवराव-छत्रपती शिवाजी, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, नवी दिल्ली, 2016, पृ.क्र. 11
8. बेंद्रे, वा. सी. – छत्रपती शिवाजी महाराज पूर्वार्ध, पार्श्व पब्लिकेशन, कोल्हापूर, 2013, पृ.क्र. 50
9. पगडी, सेतुमाधवराव-छत्रपती शिवाजी, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, नवी दिल्ली, 2016, पृ.क्र. 16
10. परिशिष्ट क्र. 1, चंद्रराव मोरे यांच्या संबंधीचे पत्र
11. सामंत, श्रीनिवास-वेध महामानवाचा, देशमुख आणि कंपनी (पब्लिशर्स) प्रा. लि. , पुणे, 2012 पृ.क्र. 97
12. पगडी, सेतुमाधवराव-छत्रपती शिवाजी, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, नवी दिल्ली, 2016, पृ.क्र. 35
13. सामंत, श्रीनिवास-वेध महामानवाचा, देशमुख आणि कंपनी (पब्लिशर्स) प्रा. लि. , पुणे, 2012 पृ.क्र. 101
14. नलावडे, दत्ताजी लक्ष्मण-छत्रपती शिवरायांचे कष्टकरी मावळे, मावळा प्रकाशन, पुणे, 2013 पृ.क्र. 75
15. केळूसकर, अर्जुन कृष्णराव-छत्रपती शिवाजी महाराज, साकेत प्रकाशन, पुणे, 2021, पृ.क्र. 148
16. भगत, दत्ता (संपा.)-कृष्णाजी अनंत सभासदकृत श्री शिव छत्रपतींचे चरित्र, प्रतिमा प्रकाशन, पुणे, 2010 पृ.क्र. 66
17. कठारे, अनिल; घोडके, जयश्री-शिवकालीन महाराष्ट्र, अल्का पब्लिकेशन, नांदेड, 2008, पृ.क्र. 26

18. गायकवाड, हेमंतराजे-शिवाजी महाराज द ग्रेटेस्ट, स्नेहल प्रकाशन, पुणे, 2014, पृ.क्र. 65
19. सामंत, श्रीनिवास-वेध महामानवाचा, देशमुख आणि कंपनी (पब्लिशर्स) प्रा. लि. , पुणे, 2012 पृ.क्र. 129
20. गायकवाड, हेमंतराजे-शिवाजी महाराज द ग्रेटेस्ट, स्नेहल प्रकाशन, पुणे, 2014, पृ.क्र. 65
21. बेडेकर, निनाद-छत्रपती शिवाजी, कर्नाटक प्रकाशन संस्था, पुणे, 2014, पृ.क्र. 46
22. सामंत, श्रीनिवास-वेध महामानवाचा, देशमुख आणि कंपनी (पब्लिशर्स) प्रा. लि. , पुणे, 2012 पृ.क्र. 175
23. कठारे, अनिल; घोडके, जयश्री-शिवकालीन महाराष्ट्र, अल्का पब्लिकेशन, नांदेड, 2008,
24. कठारे, अनिल; घोडके, जयश्री-शिवकालिन महाराष्ट्र, अल्का पब्लिकेशन, नांदेड, 2008
25. सोनवनी, संजय-जातीसंस्थेचा इतिहास, प्राजक्त प्रकाशन, पुणे, 2016, पृ.क्र. 141
26. केळूसकर, अर्जुन कृष्णराव-छत्रपती शिवाजी महाराज, साकेत प्रकाशन, पुणे, 2021, पृ.क्र. 314
27. कित्ता, पृ.क्र. 242
28. भगत, दत्ता (संपा.)-कृष्णाजी अनंत सभासदकृत श्री शिव छत्रपतींचे चरित्र, प्रतिमा प्रकाशन, पुणे, 2010 पृ.क्र. 218

वर्तमानपत्रे, मासिके :-

1. लोकसत्ता
2. मराठा
3. लोकमत
4. देशोन्नती
5. सकाळ
6. मातृभूमी
7. दिव्य मराठी
8. लोकराज्य

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.9 No.5 May – June 2022

छत्रपती शिवाजी महाराजांचे आर्थिक विचार

सुभाष ज्ञानेश्वरराव गोटफोडे[1] प्रा. डॉ. किशोर वि. साबळे[2]
1संशोधक विद्यार्थी, संशोधन केंद्र, श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती
2सहा. प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग प्रमुख श्री शिवाजी कला व वाणिज्य, महाविद्यालय, अमरावती
Corresponding Author- **सुभाष ज्ञानेश्वरराव गोटफोडे**
Email- subhashgotphode@gmail.Com

सारांश :

महाराष्ट्रातील घनदाट जंगले, दुर्गम डोंगर कड्यांत येण्याचे धाडस महमंद गझनीने केले नाही. मात्र पुढे 1347 मध्ये संपूर्ण महाराष्ट्रावर परकीय मुसलमानांची राजवट सुरु झाली. मावळ्यांचे प्रमुख मराठे सरदार परकीय मुसलमानांची भाकरी मिळवण्यासाठी चाकरी करु लागले. त्यांना वतने, जहागिरी मिळू लागली. शिरळीकर, कोंढाळकर, मोरे, जाधव, मोहिते, शिर्के, पासलकर, ढमाले, मारणे, जेधे, शिरळीकर, कोंढाळकर, मोरे, जाधव, मोहिते, महाडिक आदि मराठ्यांना बारा मावळ खोऱ्यात देशमुखी, पाटीलकी, वतने, इनामे देऊन परकीय मुसलमान खुश करीत होते. त्यामुळे मावळ खोऱ्यात सर्वत्र मुसलमानी सत्तेचा उन्मत कारभार सुरु होता. शिवपूर्वकाळात महाराष्ट्रातील गावांची वतने देशमुख किंवा पाटील यांच्याकडे होती. उपजीविकेचे प्रमुख साधन शेती व्यवसाय होता. अर्थव्यवस्था ही शेतीवर आधारित होती.गावचा महसूल हा गावातीलच ज्याच्याकडे वतने आहेत तेच गोळा करीत. कोणताही राजा सत्तेवर आला तरीही सामान्य जनतेला फारसा फरक पडत नसे. कारण राज्य कोणाचेही असो तरीही त्यागावची व्यवस्था पूर्वीसारखीच (आर्थिक स्थित) असे सहाजिकच जनतेला राज्याबद्दल कोणतीही आस्था किंवा जिव्हाळा नव्हता. मराठा सत्तेच्या उदयाच्या वेळी महाराष्ट्रातील समाजात जातिव्यवस्था प्रचलित होती. समाजात अनेक जाती, जमाती आणि उपजाती होत्या. या प्रत्येक जाती-जमाती आपल्या धर्माचे पालन करीत असत. समाजात विविध जाती अस्तित्वात होत्या. प्रत्येक जाती, उपजाती व जमातीचे स्वतंत्र रीतिरिवाज असत जाती उपजाती नुसार उदरनिर्वाहाचे साधन ठरलेले होती त्यामुळे ठरलेला व्यवसाय करणे बंधनकारक होते तो व्यवसाय सोडून दुसरा व्यवसाय केला तर पाप लागेल व त्यामुळे पुढील सात जन्म नरकात जावे लागेल म्हणून जातीनुसार लोक व्यवसाय करीत असे इत्यादी निमाचे पालन करण्यावर त्यांचा कटाक्ष असे. त्यामुळे त्याकाळातील लोकांमध्ये फार कौशल्य विकसित झाल्याचे दिसत नव्हते. शिवकाळ शेतकरी कल्याणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीवर स्वराज्याचे अर्थव्यवस्था अवलंबून होती. शेतकरी सुखी तर राजा सुखी अशी त्याकाळी छत्रपती शिवरायांनी अर्थनिती असल्याचे दिसून येते, त्याचप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रशासकीय दृष्टिकोनामुळे व अमलात आणले आणलेल्या सुधारणामुळे त्यांना मानवी इतिहासात होऊन गेलेल्या श्रेष्ठ योग्यतेच्या प्रशासकामध्ये गणल्या गेले.

Key-words : छत्रपती शिवाजी महाराजांचेआर्थिक विचार, महाराजांनी सैन्याला वेतन पद्धती सुरू करणे, आर्थिक हिशोब ठेवणे. शिवकालीन शेती, शिवकालीन व्यापार, महाराजांचा प्रशासकीय दृष्टीकोण.

प्रस्तावना :

महाराष्ट्राच्या इतिहासात त्याच्या भौगोलिक स्थितीचे महत्त्व अनन्यसाधारण असल्याचे तसेच भौगोलिक रचनेमुळे अर्थव्यवस्थेला महाराष्ट्राच्या इतिहासाला कलाटणी मिळालेली दिसून येते. भौगोलिक परिस्थितीचा मानवी जीवनावर

होणारा परिणाम हा सातत्याने राजकीय आणि आर्थिक-समाज जीवनावर विशेष प्रभाव टाकत असतो. महाराष्ट्राच्या हवामानाचा महाराष्ट्रीयन संस्कृतीवरही विशेष प्रभाव पडलेला आढळून येता. महाराष्ट्रातील जंगलांनी राज्याच्या अर्थव्यवस्थेत व शिवकालीन राज्य स्थापनेत महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. मराठ्यांना सह्याद्रीचे वरदान लाभले होते. सह्याद्रीच्या उंचउंच शिखरांवर असलेले किल्ले ही मराठ्यांची शक्तीस्थाने होती. घनदाट अरण्ये मुसळधार पाऊस, भयंकर दऱ्या, नदीनाल्यांचे पूर व जंगली जनावरे या निर्सगाच्या रुपाशी मराठे परिचित होते. कारण सह्याद्राची भूमी ही त्यांची जन्मभूमी होती. याउलट मैदानी प्रदेशात कोरड्या हवेत राहणाऱ्या मोगलांना महाराष्ट्रातील निसर्गाचे स्वरुप रौद्र व भयानक वाटत होते. सह्याद्रीविषयी उदगार काढतांना ग्रँट डफ म्हणतात. "शत्रूचा मार्ग अडविणारा सर्वात मोठा नैसर्गिक अडथळा म्हणजे उंच व रुंद सह्याद्रीची रांग होय." मावळ व घाटमाथा या नावांनी ओळखल्या जाणाऱ्या या प्रदेशातील घनदाट जंगलांनी वेढलेले तसेच तीव्र उतारामुळे दुर्गम असलेले अनेक नैसर्गिक डोंगरी किल्ल्याचे शत्रूच्या स्वारीच्या वेळी रयतेचे संरक्षण करीत असे. महाराष्ट्रातील अशा डोंगराळ, जंगली दऱ्याखोऱ्यांच्या प्रदेशांचा मराठ्यांना सदैव फायदा झालेला होता. यामुळे ते गनिमी काव्याच्या पद्धतीत निपुण झाले होते.

धर्मनिरपेक्ष स्वराज्याच्या प्रशासनासाठी त्यांनी निर्माण केलेले दंडक आजही लोकशाहीच्या युगात प्रेरणादायी व आदर्शभूत ठरावेत असे आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे धर्मनिरपेक्ष स्वराज्य लोकशाही राज्य होय. भारताच्या इतिहासात समतेला महत्त्व देऊन 'मराठा' या वृत्तीबाचक समुहातील कायस्थ प्रभू, कुणबी, माळी, कुंभार, न्हावी, मराठे, लोहार, धनगर, रामोशी, कोळी, मातंग, महार, मुसलमान, या सर्वांना स्वराज्य घडविण्यासाठी सैन्यात घेतले. त्यांच्या बकुबाप्रमाणे त्यांना अधिकार व पदे दिली. समता व एकतेच्या महान तत्त्वाचा स्वराज्य स्थापनेत खरा उपयोग करुन घेतला. स्वराज्य स्थापनेबरोबर कडक असे निर्बंध घातले होते. "दौडीत बाया-बापड्यांवर हात टाकू नये, हात टाकले तर कलम केले जातील अशा शिक्षा देणे. मोहिमेत बाई, बटकीण, बायको बरोबर असू नये अन्यथा गर्दन मारली जाईल. छावणी टाकताना गावाच्या बाहेर टाकावी. पाणवठ्यावरील पाण्याचा गरजेपेक्षा जास्त वापर करु नये. अन्यथा जनतेला पाणी पुरणार नाही. अशा प्रकारच्या सूचना व नियम सैनिकांना दिले होते.

अर्थव्यवस्था पाहण्याकरिता प्रशासनात सरनोबत, मुजुमदार व कारकून यांना सक्त आदेश होते. शत्रूंच्या बायका-मुलांना हात लावू नये. देवालयांची नासधूस करु नये. सक्तीचे धर्मांतर व शेतकऱ्यांचे बैल लुटू नयेत. नाईलाज म्हणून ओझे वाहण्याकरिताच त्यांचा वापर करावा व त्यासाठी लोक त्यांना मदत करीत होते. यावरुन शत्रूपक्षातील जनता त्यांना विरोध करीत नव्हती. शत्रूपक्षातील जनतेची काळजी स्वत:च्या स्वराज्यातील रयतेची काळजी व आपल्या सैन्याची काळजी हे सैनिकी व्यवस्थेची वैशिष्ट्ये होती. प्रशासनात विविध जातीमधील गुण ओळखून त्या पद्धतीचे काम त्यांच्यावर सोपविले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या शासन व्यवस्थेतील किल्ल्यांच्या सहाय्याने स्वराज्याचे रक्षण करणे, नोकरांना वतनाऐवजी पगार देणे, सरकारी नोकरीत गुणवंताना स्थान देणे, जमीन महसुलाचा लिलाव न करणे, वसूल सरकारमार्फत करणे, जात, धर्म व भेदाभेद न मानता सैन्यात भरती करणे इत्यादी आधारभूत तत्त्वे होती व ती तंतोतंत पाळली जात असत. पण हे करताना जाती-जातीतला भेदभाव संपविला. सैन्यप्रमुख वेगळा, दारुगोळ्याचा प्रमुख वेगळा, हिशेब ठेवणारा वेगळा, सबनीस, कारखानीस, हवालदार असे जरी अधिकारी होते, परंतु सर्वांचा दर्जा एकच. सर्वांना

नियम एकच. फक्त त्यांच्या बकुबाप्रमाणे कामे वाटून दिली होती.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या वेळी राज्यकारभारात व न्यायदानात सर्वत्र फारसी भाषा वापरली जाई. परंतु त्यांनी राज्यव्यवहारकोश तयार करुन घेतला व मराठी भाषेचा वापर चालू केला. म्हणूनच शिवाजी महाराजांना 'फारसीचा पहिला कोशकार' म्हणून संबोधले आहे. त्या काळातील ही एक क्रांतिकारी कृती होती असे दिसून येते वरील प्रमाणे अनेक उपाय व्यवस्था अर्थव्यवस्था भरभराटीस येण्याकरिता छत्रपती शिवाजी महाराजांनी केल्याचे अनेक दाखले आपल्याला इतिहासात पहावयास मिळते.

उद्दिष्ट्ये :

1. प्रस्तुत संशोधन हे पुढील उद्दिष्टांना विचारात घेऊन पूर्ण करण्यात आले आहे.
2. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेपूर्वीच्या सामाजिक, राजकीय, धार्मिक आर्थिक व सांस्कृतिक स्थितीचे अध्ययन करणे.
3. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेमागील भूमिकांचे अध्ययन करणे.
4. छत्रपती शिवाजी महाराजांच्या शासन व प्रशासन व्यवस्थेचे अध्ययन करणे.

गृहितके :

1. छत्रपती शिवाजी महाराज यांनी सैन्याला व प्रशासकीय अधिकारी यांना आर्थिक शिस्त लावली आहे.
2. छत्रपती शिवाजी महाराजांनी धर्मनिरपेक्ष हिंदवी स्वराज्य निर्मिती करीत असताना अर्थव्यवस्थेला आर्थिक शिस्त लावली आहे.
3. उपरोक्त गृहितके समोर ठेऊन शोध निबंध तयार केले आहे.

संशोधन पद्धती :

ऐतिहासिक संशोधन पध्दती उपलब्ध मुळ व दुय्यम साधनांची क्रमवार व संगतवार मांडणी करून शोधनिबंधाच तयार करण्यात आला आहे. उपलब्ध साधनांचे तत्कालीन, सामाजिक धोरणाच्या संदर्भात विश्लेषण करून अनुमान पध्दतीने निष्कर्ष काढण्यात आले आहेत. ऐतिहासिक पुराव्याची छाननी करून त्यातील घटकांची ऐतिहासिक पध्दतीने निश्चिती करून त्यांचा स्वीकार करून व स्विकृत घटनांची क्रमवारीता ठरविण्यात आली आहे. सर्व निष्कर्ष वस्तुनिष्ठ पध्दतीने काढण्यात आले आहे

संदर्भ साधनांची उपलब्धता :

संशोधन विषयाच्या संबधीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याच्या अनुषंगाने स्वराज्याच्या कालावधीतील अधिकृत व मान्य बखर, आज्ञापत्र, राजपत्रे, व सर्व लिखीत, प्रकाशित, अप्रकाशित ग्रंथसंपदा, टिपणे, परिपत्रके, अहवाल, इत्यादीचा आधार घेतला आहे. व विषयासंबधी सर्व पैलूंचे ऐतिहासिक साधनांचे परिशिलन करून निष्कर्ष काढण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा 19 फेब्रुवारी 1630 रोजी जन्म झाला. तीनशे वर्षाच्या काळोखानंतर महाराष्ट्रात सुर्योदय झाला. मातोश्री जिजाबाईने आपल्या पुत्रास शिवाजी हे सार्थ नाव दिले. मध्ययुगीन भारताच्या इतिहासात 13 व्या शतकापासून ते 17 व्या शतकापर्यंत जवळपास 500 वर्षापर्यंत सतत दहशत, पराधिनता, जुलुम आणि संकटे यांना तोंड देत देत येथिल प्रजा या आशेवर होती की, कधीना कधी स्वराज्य येईल आणि आपले दु:ख दूर होईल, भारतीय समाजाचे हे सामुहीक स्वप्न प्रत्यक्षात साकारणारे छत्रपती शिवाजी महाराज एक युगपुरूष ठरले.

उत्तरेला नर्मदा, दक्षिणेला पंचगंगा, पश्चिमेस अरबी समुद्र आणि पुर्वेस वैनगंगा ह्यामधील त्रिकोणात्मक प्रदेश महाराष्ट्र मानला जात होता. या प्रदेशातील उत्तर सिमेवर सातपुडा व विंध्य पर्वताच्या रांगा तर त्याखाली दक्षिणोत्तर 500 मैल पसरलेल्या पश्चिम घाट व सह्याद्री ह्यामुळे महाराष्ट्र मुख्यत: पहाडी प्रदेश बनला. कोकण, सह्याद्रीचा पहाडी भाग आणि मैदानी प्रदेश

हे महाराष्ट्राचे मुख्य भाग होते. या पहाडी प्रदेशात मराठ्यांचा उदय झाला. मराठ्यांच्या उदयास महाराष्ट्राची भौगोलिक परीस्थिती, सामाजिक परिस्थिती, आर्थिक परिस्थिती महाराष्ट्रातील ज्ञानेश्वर, एकनाथ, नामदेव, मावतामाळी, चोखामोळा इत्यादी विविध जाती धर्मातील संतांचे कार्य, मराठी एकच बोली भाषा, विजयनगरच्या हिंदू राज्याचे पतन, मोगल शासकाची महत्वाकांक्षा, बहामणी राज्याचे खच्चीकरण, 'महाराष्ट्र धर्म' कल्पनेचा प्रभाव, गनिमी काव्याची परंपरा व छत्रपती शिवाजी महाराजांचे व्यक्तिमत्व इत्यादी बाबी कारणीभूत ठरल्या.

हिंदवी धर्मनिरपेक्ष स्वराज्य स्थापनेपूर्वी महाराष्ट्राची भौगोलिक स्थिती :

महाराष्ट्राच्या इतिहासात त्याच्या भौगोलिक स्थितीचे महत्त्व अनन्यसाधारण असून; भौगोलिक रचनेमुळे महाराष्ट्राच्या इतिहासाला कलाटणी मिळालेली दिसून येते. भौगोलिक परिस्थितीचा मानवी जीवनावर होणारा परिणाम हा सातत्याने राजकीय आणि आर्थिक-समाज जीवनावर विशेष प्रभाव टाकत असतो. महाराष्ट्राच्या हवामानाचा महाराष्ट्रीयन संस्कृतीवरही विशेष प्रभाव पडलेला आढळून येतो.

महाराष्ट्राची भू-रचना :

महाराष्ट्राचा पश्चिम भू-भाग हा अरबी समुद्रापासून पूर्वघाटापर्यंत पसरलेला असून दक्षिणेचा काही भाग कृष्णा नदीच्या हद्दीपर्यंत पोहोचलेला आहे. महाराष्ट्राच्या उत्तरेला तापी नदी वाहत असून तिला लागूनच सातपुडा पर्वताच्या रांगा उभ्या आहेत.'महाराष्ट्राचा भूभाग 161/2 उ. ते 22 उ. अक्षांशावर आणि 721/2 पू. ते 81 पू. रेखांशावर असून त्याने एकूण 1.18 लाख चौरस मैल प्रदेश व्यापलेला आहे.'[1] महाराष्ट्राच्या उत्तरेला सातपुडा आणि विंध्य हे दोन पर्वत एकमेकास समांतर असून; ते पूर्व-पश्चिम दिशेला पसरलेले आहेत. या पर्वताच्या मध्य नर्मदेचे खोरे असून सातपुड्याला समांतर अशा तापी आणि नर्मदा यासारख्या नद्या वाहत असतात.

धर्मनिरपेक्ष हिंदवी स्वराज्य स्थापनेपूर्वीची आर्थिक स्थिती :

शिवपूर्वकाळात महाराष्ट्र हा एक भौगोलिक दृष्ट्या डोंगराळ, खडकाळ, अरण्य प्रदेश असून इथे एतद्देशिय असे नाग, भिल्ल, कोळी, मावळे इत्यादी लोक राहत असत. महाराष्ट्राच्या व मराठी भाषेच्या जडणघडणीला खरी सुरुवात प्रामुख्याने यादवकाळातच झाली असे म्हणावयास काही हरकत नाही.

शिवपूर्वकाळात महाराष्ट्रातील गावांची वतने देशमूख किंवा पाटील यांच्याकडे होती. उपजीविकेचे प्रमुख साधन शेती व्यवसाय असल्यामुळे सर्वस्वी त्यांचे जीवन त्यावरच अवलंबून होते. गावातील व्यवस्था, व्यापार किंवा त्यांची देवाण घेवाण गावातील उद्योगावर विसंबून होती. गावचा महसूल हा गावातीलच ज्याच्याकडे वतने आहेत तेच गोळा करीत. कोणताही राजा सत्तेवर आला तरीही सामान्य जनतेला फारसा फरक पडत नसे. कारण राज्य कोणाचेही असो तरीही त्या गावची व्यवस्था पूर्वीसारखीच असे महाजिकच जनतेला राज्याबद्दल कोणतीही आस्था किंवा जिव्हाळा नव्हता.

शेती :

"महाराष्ट्राचा प्रदेश दख्खनच्या पठारात मोडत असून त्यातील शेतीची सुरुवात ताम्रपाषान युगात झाली."[2] महाराष्ट्रात शेतीची अर्थव्यवस्था सामान्यपणे शतकानुशतके जशी होती तशीच शिवपूर्वकाळातही होती. शेती मालाचे उत्पादन हे मुख्यत: वेगवेगळ्या पिकांना लागवडीस योग्य अशी उपलब्ध जमीन, जमिनीचा कस व तीचे घटक, जमिनीचा मगदूर, प्रदेशांचा उंचसखलपणा, हवामान, पावसाचे प्रमाण, सिंचित क्षेत्र, दुष्काळ, उपलब्ध अवजारांचे उत्पादन, पिके, पिक घेण्याच्या पध्दती, खते, सैन्यांच्या किंवा चोरांच्या धाडी इत्यादीवर अवलंबून होते. यातील कोणत्याच

घटकात पूर्वीपेक्षा फारसा फरक पडलेला दिसत नाही.' 'कोकणात भात व देशावर जोधंळा व बाजरी ही मुख्य पारंपारिक पिके होती. कापूस, निळ, तंबाखू, भुईमूग अशा एक किंवा अधिक नगदी पिकांच्या उत्पादनाला व्यवसाय योग्य प्रमाणात नव्याने कुठे सुरवात झाली असेही घडले नाही."[3] शेतांची खरेदी-विक्री व इतर हस्तांतर रुढ पध्दतीने चालू होते. अर्थात हे व्यवहार गावकऱ्यांच्या संमतीनेच होत शेतीची खरेदी होई किंवा एखाद्या वाणी-सावकाराकडे किंवा नगरवांसीयाकडे शेतीची मालकी येई. परंतु शेतीत भांडवली पध्दतीने पैसा घातला असे झाले नाही. तसे होण्यासारखी आर्थिक परिस्थितीही नव्हती.

शिवपूर्वकाळात शेतीचे 'पांढरी' व 'काळी' असे दोन भाग पडले होते. गावाची वसाहत पांढऱ्या मातीच्या जमीनीवर केली जात असे. ज्या जमिनिमध्ये पीक घेतले जात असे त्या जमिनीस काळी असे म्हटल्या जाई. काळया जमिनीचे प्रत्यक्ष दोन भाग पडतात. प्रत्यक्ष लागवडीखाली असणारी लागवडीखालील जमीन आणि नापीक पडीत जमीन. अशा पडीत जमिनीचा वापर गावकरी गुराढोरांना चाराऊ रान म्हणून वापरत. अशा रानास 'गायरान' असे म्हणत. एकूण सर्व जमिनेचे मालक सरकार असले तरी, प्रत्यक्ष सरकार जमीन कसू शकत नाही. त्याकरिता सरकारला मोबदला 'खंड' म्हणून भरत असे. म्हणजे रयत सारा सरकारला भरत असे. शासन काही जमीन धार्मिक संस्थांना इनाम म्हणून देत असे. त्या जमीनी सारामुक्त असे. गावाच्या जमीनीपैकी 20 टक्के जमीन अशा पध्दतीने काही धार्मिक संस्थांना इनाम म्हणून दिली जात असे. सरकारच्या धोरणानुसार कसण्याची जबाबदारी त्या शेतकऱ्यावर असे. सरकारच्या विरोधात वर्तन केल्यास ती इनामी जमीन काढून घेतली जात असे. शेती व्यवसाय हा समाजातील प्रमुख व महत्त्वाचा मानला जात असे. कारण शेतीचे उत्पन्न हेच खरे राज्याचे उत्पन्न होते. म्हणून सरकारसुध्दा शेतीच्या प्रश्नाविषयी जागृत होते. पाणी पुरवठ्याच्या दृष्टीने जमिनीचे 'बागायत' व 'जिरायत' असे दोन प्रकार केले जात असे. छोट्या छोट्या ओढ्या-नाल्यावर किंवा नद्यांवर लहान लहान बंधारे बांधून त्यातील पाणी पाटांनी शेतीत पुरविले जाई. अशा जमिनीस 'मोटस्थल' जमिन असे म्हणत.[4] काही जमिनींना छोट्या ओढ्यांना बंधारा घालून जमिनीच्या उंचीचा फायदा घेऊन पाणी पुरविले जात असे. अशा जमिनीस फुरयाखालील जमिन असे म्हणत.

शिवपूर्वकाळात शेतीची मोजनी हा महत्त्वाचा घटक होता. जमीन मोजनीसाठी काठीचा वापर केला जात असे. ही काठी पाच हात व पाच मुठी इतक्या लांबीची असे. एक हात सात मुठीचा व एक मूठ दोन तसूंची असे. याप्रमाणे प्रमाण मानले जाई. एक मूठ म्हणजे अंगठ्या जवळचे बोट व करंगळी मधील अंतर व एक तसू म्हणजे दोन बोटांच्या सांध्यातील अंतर मानले जाई. अशा प्रकारे पाच हात व पाच मुठी यांनी बनविलेल्या बीस पौरस काठ्यांना मिळून एक 'पांड' तयार होई. अशा बीस पांडांचा मिळून एक 'विघा' होई. 120 चौरस विघे मिळून एक 'चावर' होई. कोकणात बिस औरस-चौरस पांडाएवजी तेवीस औरस-चौरस पांडांचा एक विघा मानला जाई. सरकारी अधिकाऱ्यांबरोबर जमिनी मोजणीचे काम वतनदार तराळ करीत असे. त्याच्या हाती ही काठी असे व तो जमीन मोजत असता काठी उडवित असे. त्यामुळे या काठीस त्या काळी 'चलती काठी' असे म्हणत. अशा प्रकारे काठी उडी घेत असल्यामुळे विघ्यातील काठ्यांची संख्या सर्वत्र सारखीच राहते असे नाही. तेव्हा लांब दोर धरुन अंतर सारखे केले जाम असे. शेतीची मोजनी अधिकात अधिक बरोबर राम्त केली जात असे. सतनच्या युध्दजन्य परिस्थितीमुळे शेतकऱ्यांना शेतीमधून फारसे उत्पादन करणे शक्य होत नसे. गावेच्या गावे जाळपोळ करुन उजाड केली जात होती. शेतीची नासधूस, पाण्याचे स्त्रोत खराब करणे, वस्ती करण्याजोगे स्थानांचा नाश होत

असल्याने उपासमार आणि दारिद्रय हे ठरलेलेच होते. याही स्थितीमध्ये जे उत्पादन हाताशी येईल त्यामधूनच महसूल द्यायचा यामुळे या कष्टकरी शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती हलाखीची होऊन जात होती.

व्यापार :

तेराव्या शतकातील उत्तरकालीन यादवांचा काळ सोडल्यास सतराव्या शतकापर्यंत हा प्रदेश मुख्यत्वे आंध्र, कन्नड, आणि तुर्क पठाणादी मुसलमान अशा राज्यकर्त्यांच्या अधिपत्याखालीच होता. परकीय साजबटीखाली बावरताना तत्कालीन मराठी समाजाची आर्थिक परीस्थिती एकंदरीने वेताच्याच उंचीची राहिली असावी.[5] "इ.स. 760 ते 973 पर्यंत महाराष्ट्रावर कन्नड राष्ट्रकुटांनी राज्य केले; त्यामुळे त्याकाळची वजने, मापे, नाणी यांची नावेही कन्नड भाषेतीलच होती. एतद्देशीय मराठा, नाग, कोळी, भिल्ल इत्यादी डोंगरी मराठी लोक त्यांच्या बलुत-सांस्कृतिप्रधान अलग, स्वयंशासित खेड्यातून बव्हंशी त्याकाळी वास्तव्य करून राहत असावेत. बलुत्यातील बलुतेदाराप्रमाणे जवळ जवळ एतद्देशीय मराठी, वाणी आपल्या व्यवसाय वृत्तीची कामे करीत असावेत असे दिसते. यादवकाळातसुध्दा देशावरील मोठ्या प्रमाणावरचा व अंतर्गत व्यापार कन्नड, वैश्य व लिंगायत वाण्यांच्या हातात, तर कोकण समुद्र किनाऱ्यावरील परदेशांशी व्यापार बव्हंशी गुजराती, अरब इत्यादींच्या हातात होता असे दिसते."[6] इ.स. 1294 मध्ये अल्लाउद्दीन खिलजीने महाराष्ट्रावर केलेल्या आक्रमणानंतर मात्र पुढे चारशे वर्ष महाराष्ट्राच्या बहुतांश भागात मुसलमानांचे आर्थिक वर्चस्व होते असे दिसून येते. बहामनी सुलतानाच्या काळात चौल, दाभोळ, जुन्नर, दौलताबाद, पैठण ही महाराष्ट्रातील महत्त्वाची व्यापारी केंद्रे परकीय मुसलमानी व्यापाराच्या हातात होती. पंधराव्या शतकाच्या अखेरीस नागोठणे, चौलसह कोकणचा समुद्रकिनारा गुजरातचा मुसलमान राजा महमुद बेगडा ह्याच्या ताब्यात होता; आणि शेवटी इ.स. 1509 मध्ये चौलसह कोकणचा समुद्रकिनारा पोर्तुगीजांच्या ताब्यात गेला.

कोकण किनाऱ्यावरील व्यापारामध्ये प्रामुख्याने अरब, तुर्की, इराणी, हिंदी, मुसलमान, गुजराती, पोर्तुगीज होते आणि त्यांचा व्यापारावर अंमल होता. मात्र इथल्या भुमिपुत्रांना केवळ व्यापारी गलबतावर माल चढविणे आणि उतरविणे असे हमालीचे काम किंवा फार छोट्या प्रमाणावर किनाऱ्यालगतचा व्यापार एवढ्यापुरतेच ते मर्यादित होते असे दिसून येते. भारताच्या पश्चिम किनाऱ्यापरील युरोपिय व्यापार व त्याद्वारे होणारी भांडवली गुंतवणूक देशाच्या अर्थकारणात प्रभावी ठरू लागली व या नव्या आर्थिक घडामोडीचा गुजराती व अन्य व्यापारी फायदा घेऊ लागले होते.[7] मात्र मराठी माणसे ह्या युरोपिय घडामोडीपासून अलिप्त होती असे दिसते.

वतने व वतनदार :

महाराष्ट्राच्या नागरी व ग्रामीण भागात लहान प्रमाणावर व्यापार करणारे लोक होते. एखादी विशिष्ट वस्तू किंवा सेवा गावात किंवा संबधित प्रदेशात विकणे अशासाठी व्यावसायिक वतने असत. वतनदार विक्रेत्याला किंवा कारागिराला त्याच्या वतनापत्रात उल्लेखितप्रमाणे गावातील इतर वतनदारांना व गावअधिकाऱ्यांना आपल्या वस्तू व सेवा नेमून दिलेल्या प्रमाणात विनामूल्य द्याव्या लागत. व्यापारासाठी काही मर्यादेपर्यंत या वतनसंस्थेचा उपयोग होई. पण त्यातील संकुचित कार्यक्षेत्र, चढाओढीचा अभाव, मालाच्या किंवा सेवेच्या गुणवत्तेला गौणस्थान इत्यादी मर्यादेमुळे संबंधित व्यवसायाचा मोठ्या प्रमाणावर विस्तार होऊ शकला नाही. गावं जवळ जवळ स्वयंपूर्ण होती त्यांची स्वयंपूर्ण यंत्रणा होती. पाटील, कुलकर्णी, बारा बलुते गाव चालवत होती. सत्ता बदलली तरीही गाड्याला फारसा फरक पडत नव्हता. वतनदार हे भरमसाठ वसुली करीत होते. जनतेवर अन्याय करीत होते. त्यांच्या विरुध्द दाद

मिळत नव्हती आणि कोणी मागतही नव्हते. राजे बदलले तरीही कुलकर्णी, पाटील, वतनदार, देशमुख, जहागीरदार तेच असत. वतनदार स्वत:ची वतने शाबूत राखण्यासाठी राजांशी एकनिष्ठ असत.[8]

दुष्काळ :

शिवपूर्वकाळात महाराष्ट्रात पडलेल्या दुष्काळामुळे सुध्दा महाराष्ट्रातील जनतेची आर्थिक स्थिती हलाखीची बनत गेली. महाराष्ट्रात इ.स. 1396 ते 1408 पर्यंत बारा वर्ष दुर्गादेवीचा दुष्काळ पडून सर्वत्र अवर्षण निर्माण झाले होते.[9] यामध्ये महाराष्ट्रात शिरवळ व खटाव प्रदेशाचा अंतर्भाव असल्याचे दिसून येते. इ.स. 1422 ते 1423 या वर्षी संपूर्ण दख्खनच्या प्रदेशात पावसाअभावी तीव्र दुष्काळ पडला. त्यामुळे कित्तेक जनावरे मृत्युमुखी पडली. बहामनी सुलतान अहमदशहाने आपल्या लष्करातील शिपायांच्या पगारात वाढ केली. तसेच गरिबांसाठी धान्याची कोठारे खुली केली होती. इ.स. 1422 ते 1423 ह्या वर्षी संपूर्ण दख्खनच्या प्रदेशात अतिशय तीव्र स्वरुपाचा दुष्काळ पडला होता त्यामुळे तीन वर्ष धान्याचा दुष्काळ होता. तर इ.स. 1589, 1623, 1624, मध्ये सुध्दा महाराष्ट्राच्या काही भागात दुष्काळ पडल्याचे दिसून येते. इ.स. 1629 ते 1630 मध्ये संपूर्ण दख्खनच्या भागत मान्सूनचा पाऊस पडला नाही त्यामुळे या दुष्काळाचे परिणाम संपूर्ण मुलुखाला भोगावे लागले. त्यामुळे कित्तेकांना स्थलांतर करावे लागले.[10] कवी परमानंद लिहितात "देशात (निजामशाही) पाऊस न पडल्याने धान्य खूप महाग झाले ..... खाण्यास काही न मिळाल्याने सर्वत्र हाहा:कार उडून पशुपशूस व माणसे माणसास खाऊ लागली."[11] दुष्काळाचा प्रभाव एवढा जबरदस्त होता की त्यामुळे धान्याची टंचाई निर्माण होऊन रयतेवर उपासमारीची पाळी आली. अनेकांनी स्थलांतर केले व कित्तेक मरण पावले. या सतनच्या पडणाऱ्या दुष्काळामुळे दख्खनचा प्रदेश निर्जन बनला होता. विनकरी, धोबी, रंगारी यासारखे कारागीर लोक पिडित होऊन अन्नासाठी इतरत्र भटकत होते. दख्खनच्या बहुतांशी भागातील लोक अन्नासाठी इतरत्र हिंडत होते. गुजरात, महाराष्ट्र आणि गोवळकोंडा इत्यादी प्रदेश जवळपास बेचिराख झाला होता. एवढी भयानकता व भिषणता या दुष्काळाने निर्माण केली होती.

छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य लोकशाही राज्य होय. भारताच्या इतिहासात समतेला महत्त्व देऊन 'मराठा' या वृत्तीवाचक समूहातील कायस्थ प्रभू, कुणबी, माळी, कुंभार, न्हावी, मराठे, लोहार, धनगर, रामोशी, कोळी, मातंग, महार, मुसलमान, या सर्वांना स्वराज्य घडविण्यासाठी सैन्यात घेतले. त्यांच्या वकुबाप्रमाणे त्यांना अधिकार व पदे दिली. समता व एकतेच्या महान तत्त्वाचा स्वराज्य स्थापनेत खरा उपयोग करुन घेतला. स्वराज्य स्थापनेवरोवर कडक असे निर्बंध घातले होते. "दौडीत बाया-बापड्यांवर हात टाकू नये, हात टाकले तर कलम केले जातील अशा शिक्षा देणे. मोहिमेत बाई, बटकीण, बायको बरोबर असू नये अन्यथा गर्दन मारली जाईल. छावणी टाकतांना गावाच्या बाहेर टाकावी. पाणवठ्यावरील पाण्याचा गरजेपेक्षा जास्त वापर करु नये. अन्यथा जनतेला पाणी पुरणार नाही. अशा प्रकारच्या सूचना व नियम सैनिकांना दिले होते.

प्रशासनात सरनोवत, मुजुमदार व कारकून यांना सक्त आदेश होते. शत्रूंच्या बायका-मुलांना हात लावू नये. देवालयांची नासधूस करु नये. सक्तीचे धर्मांतर व शेतकऱ्यांचे बैल लुटू नयेत. नाईलाज म्हणून ओझे वाहण्याकरिताच त्यांचा वापर करावा व त्यासाठी लोक त्यांना मदत करीत होते. याबरुन शत्रूपक्षातील जनता त्यांना विरोध करीत नव्हती. शत्रूपक्षातील जनतेची काळजी स्वत:च्या स्वराज्यातील रयतेची काळजी व आपल्या सैन्याची काळजी हे सैनिकी व्यवस्थेची वैशिष्ट्ये होती.

अर्थव्यवस्था बळकट करण्यासाठी खंडणी, चौथाई, रयतेची पिळवणूक करतील त्यांच्याकडून वसूली, शत्रूपक्षातील जनतेचे आर्थिक शोषण करणाऱ्या श्रीमंताची लूट केली. स्वत:च्या स्वराज्यात शेती हेच रयतेचे मुख्य साधन होते. त्यातून येणारा महसूल सैन्यांचा खर्च व त्यांचा दाणागोटा यासाठीच वापरला. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्या सैनिकांना घालून दिलेले नियम व आदेश हे पहिल्या आदर्श लोकशाहीची तत्त्वे होती. त्यांनी नियम फक्त केले नाहीत तर प्रत्यक्षात अमलात आणले. परमुलुखातील लुटीसंबंधी नियम केले. लुटीत जमा झालेली संपत्ती स्वराज्याच्या खजिन्यातच जमा केली. तसेच त्याची नोंदही ठेवली जाई. त्यावेळचे इतर राजे लोक लुटलेला पैसा सैनिकांना वाटत. परंतू ती रीत चूकीची मानून सैनिकांना पगार दिला. त्यामुळे गैरमार्गाने जास्तीत जास्त लूट करणाऱ्यांवर पायबंद बसला. सैनिकांना तसे आदेश होते की, लूट कमी किंवा जास्त मिळो तुमचे पगार मात्र वेळेवर मिळतील. लुटीचा खजिना हा स्वराज्यातच जमा झाला पाहिजे व स्वराज्याच्या कामीच वापरला गेला पाहिजे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या शासन व्यवस्थेतील किल्ल्यांच्या साहाय्याने स्वराज्याचे रक्षण करणे, नोकरांना वतनाऐवजी पगार देणे, सरकारी नोकरीत गुणवंतांना स्थान देणे, जमीन महसुलाचा लिलाव न करणे, वसूल सरकारमार्फत करणे, जात, धर्म व भेदाभेद न मानता सैन्यात भरती करणे इत्यादी आधारभूत तत्त्वे होती व ती तंतोतंत पाळली जात असत.

प्रशासनात विविध जातीमधील गुण ओळखून त्या पद्धतीचे काम त्यांच्यावर सोपविले. पण हे करतांना जाती-जातीतला भेदभाव संपविला. सैन्यप्रमुख वेगळा, दारुगोळ्याचा प्रमुख वेगळा, हिशेब ठेवणारा वेगळा, सबनीस, कारखानीस, हवालदार असे जरी अधिकारी होते, परंतू सर्वांचा दर्जा एकच. सर्वांना नियम एकच. फक्त त्यांच्या वकुबाप्रमाणे कामे वाटून दिली होती. छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेस त्रास न देण्याविषयी आपल्या सैन्यांना कडक सूचना केलेल्या होत्या. सैन्यरचना अत्यंत कुशलतेने हाताळली. रयतेच्या त्रास कमी केला. या धोरणाविषयी दत्ता भगत लिहितात. 'सरनोबत, मुजुमदार, कारकून यांना जहागिऱ्या देण्याऐवजी शिवाजी महाराजांनी वेगळे वेतन द्यायला सुरुवात केली आणि त्यांच्या मालकीची परंपरागत जमिन असलीच तर सामान्य रयतेप्रमाणे मानली जाऊन दरवर्षी झालझाडा घेतलाजाईल, असा आदेश काढला. कुणालाही एखादे गाव इनाम अथवा मोकासा देऊ नये. त्याऐवजी रोख ऐवज द्यावा, असा निर्णय घेतला. लष्कराला जे हवे ते त्यांनी कारकुनामार्फत घ्यावे. जनतेकडून परस्पर मिळवू नये. यामुळे स्थानिक पातळीवर सैन्याच्या बळावर पुंडाई निर्माण होणे यास पायबंद बसला. जनतेचा संबंध फक्त मुलकी अधिकाऱ्यांशी येऊ लागला. लष्कराचा जनतेशी संबंध तुटला. लष्कराची नाळ प्रत्यक्ष छत्रपतींशी जोडली गेली."

सतराव्या शतकामध्ये महाराष्ट्रातील समाज हा जाती आणि पोटजातीमध्ये विभागला होता. या काळात जातीव्यवस्था कडक होती आणि त्यामुळे आर्थिक विषमताही मोठ्याप्रमाणात होती. समाजात जहागीरदार आणि वतनदार यांचे प्रभुत्व होते. तसेच धर्मांतरीत मुसलमांनाचे वर्चस्व समाजावर होते. अशा विषम समाजात राहूनच छत्रपती शिवाजी महाराजांनी राष्ट्रनिर्मितीचे कार्य केले. छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रशासनाच्या सोईसाठी अष्टप्रधान मंडळाची निर्मिती केली. पेशवा, मुजुमदार किंवा अमात्य, सेनापती, सुरनिस किंवा सचिव, वाकनिस किंवा मंत्री, पंडीतराव, डबीर किंवा सुमंत, न्यायाधिश हे अष्टप्रधान मंडळाची निवड करतांना छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांच्या कार्यक्षमतेवर भर दिलेला दिसतो.

केवळ स्वराज्य स्थापन करुनच छत्रपती शिवाजी महाराज स्वस्थ बसले नाही तर ते सुराज्य

कसे होईल याची त्यांनी पूर्ण काळजी घेतली. जुलुम-जबरदस्ती, वेठबिगार, गुलामी, अस्पृश्यता ह्या गोष्टींना स्वराज्यात थारा नव्हता. साधुसंतांना पूर्ण मोकळीक होती. शेतकरी व्यापारी निर्भय होते. स्त्रीयांचा पूर्ण आदर होता. धार्मिक स्थळांना, ग्रथांना हात लावण्याची कोणाचीही प्राज्ञा नव्हती. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य पूर्ण न्यायाचे होते. स्वराज्यात सर्वांना पूर्ण धार्मिक स्वातंत्र्य होते. इतर धर्मियांना छत्रपती शिवाजी महाराज अतिशय आदराने वागवित होते. इतर धर्माची धर्मस्थाने कोणीही नष्ट करु नयेत याची ते विषेश काळजी घेत असे. स्वारीवर मराठा सैनिकांनी धर्मस्थळांचा विध्वंस करु नये आणि धर्मग्रथांचा अवमान करु नये अशा सक्त सुचना मराठा सैनिकांना देण्यात येत असे. मशिदीची आणि मुसलमान साधुसंतांना देण्यात आलेली इनामे छत्रपती शिवाजी महाराजांनी चालू ठेवण्याची अनेक उदाहरणे आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी कोणत्याही एका जातीचे नेतृत्व केल्याचे दिसून येत नाही. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांनी सैन्य निर्मिती करतांना सर्व जाती जमातींना समाविष्ट करुन घेतले होते. त्यात मराठे, ब्राम्हण, हेटकरी, प्रभू, रामोशी, महार, मुसलमान या सर्वांचा समावेश होता.

निष्कर्ष :

मोगल सत्तेच्या जुलमाखाली स्वातंत्र्य कधीच उध्वस्त झाले होते. गुलामीत जन्मणे अत्याचार, अन्वित छळ सहन करीत मरणे एवढेच मराठी जनतेच्या नशिबी होते. सरदार, वतनदार गुलामगीरीतच मोगलांना मुजरे करत होते. अशा जुलमी गुलामगीरीत बलाढ्य मोगल, निजाम, आदिलशाही सत्तेविरुध्द लढा देण्याचे धारिष्ट्य शिवाजी महाराजांनी केले असे दिसून येते.

ऐतिहासिक शिवपूर्वकाळात महाराष्ट्रातील गावांची वतने देशमुख किंवा पाटील यांच्याकडे होती. शेती आधारित अर्थव्यवस्था होती उपजीविकेचे प्रमुख साधन शेती व्यवसाय होता. गावचा महसूल हा गावातीलच ज्याच्याकडे वतने आहेत तेच गोळा करीत. कोणताही राजा सत्तेवर आला तरीही सामान्य जनतेला फारसा फरक पडत नसे. कारण राज्य कोणाचेही असो तरीही त्यागावची आर्थिक व्यवस्था पूर्वीसारखीच असे सहाजिकच जनतेला राज्याबद्दल कोणतीही आस्था किंवा जिव्हाळा नव्हता. छत्रपती शिवाजी महाराजांना कर्तृत्ववान माणसांची कदर होती आणि अशी माणसे आपल्या भोवती जमवून राजांनी त्यांना प्रेरणा दिली. राजांचे सैन्याधिकारी, मुलकी कारभारी, सुभेदार आणि किल्लेदार, सेनापती आणि आणि आरमार प्रमुख ह्यांच्यात अनेक जातींचे आणि धर्माचे लोक होते. यावरुन धर्मनिरपेक्षतेकडे जाऊन एकीचे वातावरण निर्माण करण्याचे प्रयत्न छत्रपती शिवाजी महाराजांनी केल्याचे दिसून येते. शिवाजी महाराजांच्या प्रशासन व्यवस्थेतील किल्ल्यांच्या साहाय्याने स्वराज्याचे रक्षण करणे, नोकरांना वतनाऐवजी पगार देणे, सरकारी नोकरीत गुणवंताना स्थान देणे, जमीन महसुलाचा लिलाव न करणे, वसूल सरकारमार्फत करणे, जात, धर्म व भेदाभेद न मानता सैन्यात भरती करणे इत्यादी आधारभूत तत्त्वे होती. छत्रपती शिवाजी महाराजांनी हेर खात्याला स्वराज्य कार्यात अग्रस्थान दिले होते. त्यांची प्रत्येक योजना हेरांकडून मिळालेल्या अचूक बातम्या नुसारच आखली जाई, अर्थातच शिवाजी महाराजांच्या यशाचे रहस्य लक्षात घेताना त्यांच्या हेर खात्याचा शिवाजी महाराजांच्या यशात फार मोठा वाटा होता असे दिसून येते. छत्रपती शिवाजी महाराज फक्त देवळे किंवा धर्मकार्ये याकरिता इनामी जमिनी देत असे. अशी इनामे ही सार्वजनिक निधीसारखी असत. इनामी जमिनी देत असताना जात, धर्म हा विचार त्यांनी कधीही मनात आणल्याचे दिसून येत नाही. छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्यकारभारात आणि न्यायव्यवस्थेत धर्माची किंवा धर्मकारणयांची ढवळाढवळ होऊ दिली नाही. आपला धर्म हा त्यांनी राज्याचा

मानला नाही. शिवाजी महाराजांनी त्यांच्या धर्मनिरपेक्ष स्वराज्यात सर्वांसांठी समान न्यायाचे तत्वे स्विकारली.

संदर्भ सूची :

1. पाटील, सुभाष; वैसाणे, अनिल; कठारे, अनिल-शिवकाळ व पेशवाईतील दुष्काळाचा इतिहास, पुनम प्रकाशन, कंधार- 2008, पृ. क्र. 9
2. पाटील, सुभाष; वैसाणे, अनिल; कठारे, अनिल-शिवकाळ व पेशवाईतील दुष्काळाचा इतिहास, पुनम प्रकाशन, कंधार- 2008, पृ. क्र. 35
3. कुलकर्णी, अ. रा; खरे ग. ह. (संपा.)- मराठ्यांचा इतिहास खंड दुसरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयनगर, पुणे, 1985, पृ. क्र. 335
4. कठारे, अनिल; घोडके जयश्री-शिवकालीन महाराष्ट्र, अल्का पब्लिकेशन, नांदेड, 2008, पृ. क्र. 172
5. कुलकर्णी, अ. रा; खरे ग. ह. (संपा.)- मराठ्यांचा इतिहास खंड दुसरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयनगर, पुणे, 1985, पृ. क्र. 342
6. किता, पृ. क्र. 343
7. किता, पृ. क्र. 344
8. पानसरे, गोविंद-शिवाजी कोण होता?, लोकवाङ्मय गृह भूपेश गुप्ता भवन 85, सयानी रोड, प्रभादेवी मुंबई, 2013, पृ. क्र. 7
9. पाटील, सुभाष; वैसाणे, अनिल; कठारे, अनिल-शिवकाळ व पेशवाईतील दुष्काळाचा इतिहास, पुनम प्रकाशन, कंधार- 2008, पृ. क्र. 35
10. किता, पृ. क्र. 37
11. किता 38
12. कठारे, अनिल; घोडके जयश्री-शिवकालीन महाराष्ट्र, अल्का पब्लिकेशन, नांदेड, 2008

वर्तमानपत्रे, मासिके :-

1. लोकसत्ता
2. मराठा
3. लोकमत
4. देशोन्नती
5. सकाळ
6. मातृभूमी
7. दिव्य मराठी
8. लोकराज्य

Azadi Ka Amrit Mahotsav

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

ऋते ज्ञानान्न मुक्तिः

Srujan Prabhat

A Biannual Research Journal

ISSN : 2249-1171 | Volume - II | October 2022 | Issue - II

SPECIAL EDITION

Government Vidarbha Institute of Science And Humanities (Autonomous), Amravati

NAAC Re-accredited 'A' Grade with CGPA 3.32

64	शाश्वत विकासाची उद्दिष्टे आणि भारतातील ग्रामीण विकास	डॉ. विशाल विष्णू रोटे	283-284
65	सौरऊर्जा : ग्रामीण भागाकरिता शाश्वत ऊर्जा	सुभाष ज्ञानेश्वरराव गोटफोडे प्रा. डॉ. किशोर वि. साबळे	285-293
66	ग्राम स्वराज्य व रोजगार हक्क	प्रा.डॉ. अशोक ना. भोरजार प्रा. डॉ. वनिता चोरे	294-296
67	पंचायत राज व्यवस्थेमुळे बदललेला ग्रामीण विकास	डॉ. देवलाल सुखदेवराव आठवले	297-301
68	स्थानिक स्वराज्य संस्था व महिलांचे राजकीय सक्षमीकरण	कौस्तुभ श्यामशिल भोपळे	302-304
69	महात्मा गांधीजींच्या स्वप्नातील पंचायतराज	डॉ. भालेराव सुधाकर नारायण	305-308
70	ग्रामीण समुदाय व नेतृत्व विकास	प्रा.मनिषा किर्तने	309-311
71	भारतातील पंचायतींचे संघटन आणि अधिकार	सविता सु. घरजारे विक्रम भ. ठाकरे	312-319
72	शाश्वत विकासाची उद्दिष्ये आणि भारतातील ग्रामीण विकास	डॉ. ममता विजयराव पाथ्रीकर	320-324
73	ग्रामीण आर्थिक विकासाचे एक अध्ययन	ओंकार नागोराव ढोले	325-330
74	नागपूर जिल्हा परिषदेतील महिला प्रतिनिधित्वाचे पक्ष व प्रवर्ग निहाय विश्लेषण १९९२-२०१२	डॉ. असिम खापरे डॉ. राहुल बावगे	331-334
75	स्थानिक स्वराज्य संस्था व महिला नेतृत्व पंचायतराज मधील पंचकन्या - शोध व बोध	मयुरी लाड	335-340
76	स्थानिक स्वशासनाच्या निर्णय प्रक्रियेत महिला प्रतिनिधीचा सहभाग	लिमंत्रिका भगवान नवघडे प्रा. डॉ. एल. एच. नंदेश्वर	341-343
77	पंचायत राज व्यवस्था का इतिहास और गांधीवादी विचारो की प्रासंगिकता	डॉ. ए. डी. जाधव	344-350
78	पंचायत राज व्यवस्था में महिला नेतृत्व	सायत्रा दिगंबर मकेश्वर	351-353
79	अचलपूर नगरपालिका का विकास एवं महिलाओं की सहभागिता	डॉ. माया एस. वाटाणे	354-357

Srujan Prabhat
A biannual Research Journal
ISSN : 2249-1171

सौरऊर्जा : ग्रामीण भागाकरिता शाश्वत ऊर्जा

सुभाष ज्ञानेश्वरराव गोटफोडे
संशोधक विद्यार्थी
संशोधन केंद्र : श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती

प्रा. डॉ. किशोर वि. साबळे
सहा. प्राध्यापक अर्थशास्त्र विभाग प्रमुख
श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती.

सारांश :

सूर्य लाखो वर्षांपासून प्रखर सूर्यप्रकाश देत आहे. यापुढेही लाखो वर्षेप्रखर सूर्यप्रकाश देत राहील. त्यामुळे या ऊर्जा साधनाचा पुरेपूर वापर करण्याचे ठरविले तर पुढ हजारो वर्षेदेशाला वीज कमी पडायची नाही. वीज टंचाई जाणवणार नाही. सौरऊर्जा जोखीमविरहीत आहे. अणु ऊर्जा जोखमीची आहे. औष्णिक ऊर्जा प्रदुषणकारी आहे. असे कोणते नुकसान करण्याचा प्रकार या सौरऊर्जेने होणार नाही. अलिकडच्या काळात सरकारने याचे महत्त्व लक्षात घेऊन या क्षेत्रात वेगाने पावले टाकण्याचा निर्णय घेतला आहे.

भारताला जगातील अन्य देशाच्या तुलनेत सूर्यप्रकाश प्रचंड प्रमाणात मिळत आहे. तरीही आपण त्याचा वापर करण्याचा अट्टाहास धरला नाही. त्यादृष्टिने संशोधन पूढे सरकले नाही. अर्थात राज्यकर्त्यांनी काळाची पावले ओळखण्यात चूक केली. अन्य प्रगत देशांनी मात्र पुरेसा सूर्यप्रकाश उपलब्ध नसतानाही या क्षेत्रात कमालीची प्रगती केली आहे. आपल्याजवळ प्रखर सूर्यप्रकाश असूनही त्याचा वापर करता आला नाही. जिथं पिकतं, तिथं त्याची किंमत कळत नाही, हेच खरं! अन्य देशात सौरशक्तिकेंद्र उभारून मोठ्या प्रमाणात सौरऊर्जा विद्युत ऊर्जेत रूपांतरित करण्याचे प्रयोग यशस्वी झाले आहेत.

सध्या प्रत्येक राष्ट्राची विजेची गरज ही फारच वाढली आहे. आणि पारंपारिक ऊर्जा पदार्थांची मुबलकता कमी झाली आहे. त्यामुळे सौरऊर्जेच्या पर्यायावर सर्व राष्ट्रांचा भर आहे. सौरऊर्जेच्या उपयोगाची आधुनिक उपकरणे पुढीलप्रमाणे आहेत.

पेटीचा कूकर, सौरभट्टी, पाणी गरम करण्याचा प्लँट, प्लेट कलेक्टर, गरम हवेचा कलेक्टर, शेतीचे पदार्थ वाळविण्यासाठी इनयर, खाऱ्यापाण्यापासून गोडेपाणी करणारा सोलर स्टील, उबदार राहणारे सौरघट, हिट पंप, शेती करिता सौरऊर्जा पंप, अशा अनेक प्रकारची सोर ऊर्जा उपकरणे विकसित झाली आहेत.

आपल्या जीवनामध्ये ऊर्जेचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. ऊर्जा वापराच्या प्रमाणावर उत्पादन, क्षेत्रीय विकास व पर्यायाने जीवनमान अवलंबून आहे. ऊर्जेच्या पारंपरिक आणि अपारंपरिक साधानांचा समन्वयीत, यथोचित व काळजीपुर्वक वापर केल्यास आजच्या ऊर्जा संकटावर बऱ्यापैकी मात केली जाऊ शकते. ऊर्जेचे योग्य व्यवस्थापन, संयोजन, संवर्धन व नियमन केल्यास शेतकऱ्यांचे राहणीमान सुद्धा वाढेल. आजकाल अपारंपरिक सौरदिवे, सौरफवारणी संच, सौरसिंचन व्यवस्था, सौरगृह प्रकाश प्रणाली, विजेरी प्रभारण (कुंपन), संयत्र, कृषी अवशेषापासून विद्युत निर्मिती प्रकल्प इ. वापरत.

घौवी : सूर्य, सौरऊर्जा, ग्रामीण भागातील ऊर्जा, सोलर पॅनल, ऊर्जा. सौर कृषी पंप.

प्रस्तावना :

मनुष्याने स्वत:ला व समाजाला लागणाऱ्या गरजा पूर्ण करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वस्तूंचे उत्पादन सुरूवात केली. भारताच्या १ अब्ज ४० करोड लोकांच्या सर्व गरजा पूर्ण करण्यासाठी उत्पादन कार्यात वाढ करण्यास सुरूवात केली. यांत्रिकीकरण म्हणजे औद्योगिकीकरण. आज औद्योगिकीकरणाचा प्रचंड वेग असून मानवजात औद्योगिकीरणाने व्यापून टाकली आहे. औद्योगिकीकरण व मानवाच्या दैनंदिन जीवनात सतत वाढत ऊर्जेचा वापर यामुळे ऊर्जेची गरज ही दिवसेंदिवस वाढत आहे. वीज, ऊर्जा ही मानवाची मुलभूत गरज परंतु ज्या गतीने ऊर्जेची मागणी वाढत आहे. त्याच गतीने ऊर्जेचे उत्पादन करण्याचे प्रयत्न होतानी दिसत तरीपण ऊर्जेची मागणी पूर्ण होत नाही.सौरघट हा सौर फोटोवोल्टिक यंत्रणासाठी एक प्राथमिक उपकरण सौरकिरणांना विजेत रूपांतरित करते. सौरघट हे अतितरल सिलिकॉनपासून बनविलेले पत्रे असतात आवश्यकतेनुसार कापलेला असतो. अशा अनेक एसपीव्ही घटांना जोडून आवश्यक क्षमतेचे एक बनवले जातात. अशी मोड्यूल्स पुढे एकमेकांना जोडून एसपीव्ही पत्रे तयार केले जातात जेणेकरून उपकरणांना चालविण्यासाठी आवश्यक ऊर्जेचे उत्पादन होऊ शकते.

सौरऊर्जेचा प्राथमिक खर्च बराच असतो पण ऊर्जा मिळविण्यासाठी पैसे मोजावे लागत बरेच तास सौरऊर्जा आपल्या बरोबरच असते. रात्री आपण सौरऊर्जेची विजेरीत (बॅटरीत) साठवण पाहिजे तेव्हा उपयोगात आणू शकतो. यासाठी खर्च सुद्धा जास्त होत नाही. सूर्यापासून मिळणारी सौरऊर्जा व वेळ बदलवित नाही. म्हणून बदलत्या काळानुसार आपण जास्तीतजास्त प्रमाणात सौरऊर्जेचा वापर सौरऊर्जेवर चालणाऱ्या उपकरणांचा वापर करण्यास शिकले पाहिजे. सौरवीज निर्मितीमध्ये अनेक ३० वर्ष असे प्रदीर्घ आयुष्य, ही यत्रंणा पूर्णपणे देखभाल विरहित असून यात अव्याहत पणे फुकट सुरूवातीला यंत्रनेचा खर्च रू. ७०,०००/- प्रती किलो वॅट एवढा येतो. साधारणपणे नऊ ते दहा स्के. उघड्या जागेत एक किलो वॅटचा सौरऊर्जा पैनल बसवत येतो. १ मेगावॅट थिनफिल्म प्रकल्पास १२ एका पॅनलमधून ९२.५ व्होल्ट ऊर्जा संकलित केली जाते. त्याद्वारे १.१७ ॲम्पीअर करंट उत्पादीत होते. वीज निर्माण होते. यावरून १ मेगावॅटचा हिशोब करता येतो. १ मेगावॅटचा सौरप्रकल्प कार्यान्वित कोटी रूपये खर्च येतो. १ चौ.कि. जागेमध्ये ५५ मेगावॅट सौरविद्युत प्रकल्प सुरू करता येतो. सौरऊर्जा प्राप्त होते. इन्व्हर्टरच्या माध्यमातून डिसीचे एसीमध्ये रूपांतर केले जाते व त्यानंतर ती वापरण्यासाठी

भारताचे ऊर्जा क्षेत्रातील यश वाखाणण्याजोगे आहे, त्यात तक्रारीला जागा नाही. भारताची ऊर्जा कोळसा आणि पुरेशा प्रमाणातील सूर्यप्रकाश. आपल्याला पाण्याची टंचाई जाणवू शकते. आपल्या वेग पाहता, आपल्याकडे आणखी जलस्रोत हवे आहेत. यासाठी समुद्र आपल्याला मदतीसाठी आपली दळणवळण व्यवस्था ही पूर्णत: कच्च्या तेलावर, जीवाश्म इंधनावर आधारीत आहे. सध्या, कच्च्या तेलाची आयात करतो, हे प्रमाण २०४० पर्यंत ९० टक्क्यांपर्यंत पोहचणार आहे. भारत लोकसंख्येच्या १८% लोक आहेत. मात्र जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था असूनही आपण केवळ ६% ऊर्जा खर्च करतो. जवळपास २००० पासून ऊर्जा वापर जवळपास दुप्पट झाला आहे.

सरासरीच्या एक तृतीयांश आहे आणि सुमारे २ कोटी ४० लाख लोक अजूनही ऊर्जेपासून वंचित आहेत. असे अनुमान आहे की, ८ कोटी ४० लाख लोक अद्याप प्राथमिक इंधन वापरतात. ८१% लोकांकडे वीज आहे आणि स्वयंपाकासाठी स्वच्छ इंधन वापरण्याचे प्रमाण ३३% आहे. जागतिक तुलनेत कार्बनउत्सर्जनाचे प्रमाण ६% आहे, तर दरडोई कार्बन उत्सर्जनाचे प्रमाण जागतिक सरासरीच्या ३०% आहे आणि जीवाश्म इंधनाचे प्रमाण ५% आहे.२ ग्रामीण भागातील शेतीकरिता कृषी पंपाचे हजारो अर्ज महावितरण कंपनीकडे प्रलंबित आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांकडे जगण्याकरिता निश्चित उत्पादनाचे साधन नसल्यामुळे आत्महत्या सारखा पर्याय निवडत आहे. यावर उपाय म्हणून प्रत्येक शेतीला पाणी आणि वीज मिळणे आवश्यक आहे. शेती करिता वीज मिळाल्यास शेतकऱ्यांच्या निश्चित उत्पादनात वाढ होईल. पर्यायाने त्यांचे जीवनमान सुधारेल. व आत्महत्या सारख्या घातककृत्याकडून आनंददायी जीवनाचा मार्ग स्वीकारेल.

उद्दिष्टे :-

१) सौरऊर्जा प्रकल्प सुरू करण्यासाठी लागणाऱ्या भांडवली खर्चाचा अभ्यास करणे.

२) ग्रामीण भागातील ऊर्जा साधनांचा अभ्यास करणे.

गृहीतके :

१) सौरऊर्जा साठी सुरुवातीला करावी लागणारी गुंतवणूक अतिशय जास्त असते.

२) ग्रामीण भागात शेतीकरिता मिळणाऱ्या विजेवर १६ तास लोड शेडिंग आहे.

संशोधन पद्धती :

ह्या शोध निबंधात वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर केला आहे. तसेच दुय्यम साधन सामुग्रीचा वापर केला आहे. संशोधन विषयाच्या संबंधी सर्व प्रकाशित-अप्रकाशित साधने प्राप्त करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे संबंधित विषयाच्या संदर्भातील वर्तमानपत्रे, मासिके, शासकीय रेकॉर्ड इत्यादी मूळ साधनाचा अभ्यासाकरिता उपयोग केला आहे. त्या अनुषंगाने निष्कर्ष काढले आहे व त्यावर उपाययोजना सुचविल्या आहे.३

विजेची मागणी व गरज यात ११% तफावत आहे. कोळशावर आधारित वीज निर्मितीत मोठ्या प्रमाणावर कार्बन, मिथेन, गंधक, प्रदूषण करणाऱ्या व आरोग्यास घातक वायूंचे उत्सर्जन होते. १ मेगावॅट वीज निर्मितीतून वर्षाला १०२२ टन कार्बनडाय ऑक्साइड हवेत सोडला जातो. कोळसा व खनिज तेलापासून तयार होणाऱ्या विजेमुळे होणारे प्रदूषण, खनिज तेलावर चालणारी वाहने यामुळे होणारे प्रदूषण, हरित गृह वायूचे होणारे उत्सर्जन हा सर्व जगाला भेडसावणारा प्रश्न आहे. १९८७ पासून ह्या उत्सर्जनाचे पृथ्वीवरील जीवन मान, शेती, निसर्ग चक्र यावर होणारे परिणाम या विषयावर आंतरराष्ट्रीय चर्चासत्रे होत आहेत. नुकत्याच पॅरिसमध्ये झालेल्या परिषदेत पारित केलेल्या ठरावानुसार पृथ्वीचे तापमान १९९५ च्या तापमान पेक्षा १.५ डिग्री जास्तपर्यंत राखण्याचे आव्हान सर्व देशांपुढे आहे. यासाठी सार्वजनिक वाहतूक सक्षम करणे, युरो-६ चे इंधन वापरात आणणे याबरोबरच अपारंपरिक ऊर्जेचा वापर वाढवणे हे उपाय योजण्यात येत आहेत.

केंद्र सरकारने स्वच्छ ऊर्जा निर्मिती व पर्यावरण रक्षणाचे आव्हान पेलण्यासाठी अपारंपरिक ऊर्जा निर्मिती चा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम तयार केला आहे या द्वारे १७५ गिगावॅट इतकी ऊर्जा २०२२ पर्यत तयार करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे यापैकी १०० गिगावॅट वीज ही सौरऊर्जेपासून बनवण्यात येणार आहे. आपल्या देशातील बहुतांश भागात ३०० दिवस प्रखर सूर्यप्रकाश असतो व या ऊर्जेचा वापर वीज तयार करण्यात येऊ शकतो. यासाठी आवश्यक ते तंत्रज्ञान

व तंत्रज्ञान व मनुष्यबळही भारतात आहे.४

आज राज्य वीज मंडळे जमिनीवर उभारण्यात येणाऱ्या सौरऊर्जा प्रकल्पांशी वीज [illegible] राजस्थान, तेलंगणा, आंध्र प्रदेश महाराष्ट्र ही राज्ये यात अग्रेसर आहेत. सौरऊर्जेचा वापर व [illegible] नागरिकांचा सहभाग वाढविण्यासाठी केंद्र व राज्य सरकारने दोन योजना जाहीर केल्या आहेत. [illegible] रहिवासी आस्थापना, विद्यालये, महाविद्यालयाच्या छतावर सौरवीज प्रकल्प बसवून [illegible] आस्थापनेतच वापरली जाते. रविवार, सुट्टीच्या दिवसात निर्माण होणारी वीज, रोजच्या वापरातून [illegible] ही आस्थापना वीज मंडळाला निर्यात करता येते. आयात व निर्यात मधील फरकाएवढे वीज [illegible] नेट मीटरिंग असे म्हणतात. सर्व राज्य वीज मंडळाने या पध्दतीला मान्यता दिली आहे.

सर्व औद्योगिक व वाणिज्य आस्थापना ज्यांची विजेची मागणी १ मेगावॅट पेक्षा जास्त [illegible] योजनेअंतर्गत महामंडळाच्या विजेशिवाय खासगी वीज ही घेण्याची परवानगी आहे. या वीज [illegible] प्रकल्पातून विजेची आंशिक मागणी पूर्ण करता येते. भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा [illegible] पिकविणारा देश आहे. पण दर वर्षी अंदाजे १३, ३०० कोटी रूपयाची फळे व भाजीपाला हे [illegible] नसल्याने सडतो व टाकून द्यावा लागतो. ग्रामीण भागात विजेचा दाब, विजेच वितरण [illegible] शीतगृहे उभारणे ग्रामीण भागात शक्य होत नव्हते. सरकारने शीतगृहांची गरज लक्षात [illegible] शीतगृहांना २५ लाख रूपयापर्यंत अनुदान जाहीर केले आहे जेणे करून शीतगृहांची उभारणी [illegible] भागातील अर्थ व्यवस्थेला चालना मिळावी औद्योगिक आस्थापना, दूध प्रक्रिया प्रकल्प, [illegible] गृहे, देवालये, वस्तिगृहे – जिथे जिथे उच्च तापनानाच्या पाण्याची वा वाफेची गरज असते [illegible] प्रकल्प हा फायदेशीर ठरतो.

सध्या या प्रक्रियेसाठी लाकूड, भट्टी तेलाचा व विजेचा वापर केला जातो. [illegible] अंतर्गोल तबकडीवर आरसे लावून सौरऊर्जा एकाच जागी परावर्तीत केली जाते व त्याचा [illegible] गरम केले जाऊ शकते वा त्याची वाफ केली जाते. औद्योगिक आस्थापनेमध्ये जेथे मोठे [illegible] ठिकाणी लक्ष केंद्रित सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यात येतो. २०११ च्या जनगणनेनुसार देशातील [illegible] पाड्यामध्ये योग्य दाबाच्या विजेची कमतरता आहे. शेती करिता मिळणाऱ्या विजेवर [illegible] लोडशेडिंग कमी करण्याच्या दृष्टीकोनातून प्रयत्न होणे गरजेचे आहे. शेतीला गरजेनुसार वीज [illegible] परिणाम शेती उत्पादनात घट होण्यावर होतो. परिणामी भाजीपाला फळे इ. गोष्टींच्या [illegible] महागाईला रोखण्याकरिता शेती उत्पादनात पर्याप्त प्रमाणात वाढ करणे गरजेचे आहे. त्याकरीता [illegible] शेतकऱ्यांना मिळाला पाहिजे. दीनदयाळ ग्रामीण विद्युतीकरण योजनेअंतर्गत दुर्गम भागात वीज [illegible] सुरू आहे तरीही काही खेडी इतकी दूर आहेत की तिथे वीज पोहोचेपर्यंत वहनातील गळतीमुळे [illegible] शेतातील पंप जळणे, विद्युत जनित्र खराब होणे, असे प्रकार घडतात. व अशा भागातील [illegible] अव्यवहार्य ठरते. यावर स्थानिक छोटे सौरऊर्जा प्रकल्प हा अतिशय व्यवहारी ठरतो. विजेची [illegible] पंपाचे नुकसान यातून टाळता येते. सौरऊर्जेवर आधारित पंप शेतकऱ्याला वरदान ठरले आहेत [illegible] नागरिकांनाही योग्य दाबाची वीज, रात्री अभ्यास करायला प्रकाश मिळतो व त्यांचे जीवनमान [illegible]

दशाची वीज गळतीही कमी होते. देशभरात सुरळीत २४÷७÷३६५ वीजपुरवठा होण्यासाठी दुर्गम भागात स्थानिक सौरऊर्जा प्रकल्प हा देशाच्या वीज वितरणासाठी एक चांगला विकल्प आहे.५

सध्या औद्योगिक व वाणिज्य वापरासाठी वीज वापरावर अधिभार लावून क्रॉस सबसिडी अंतर्गत निवासी व शेतीसाठी लागणाऱ्या विजेवर अनुदान देण्यात येते. पण जर औद्योगिक व वाणिज्य ग्राहकांनी सौरऊर्जेवरील वापर वाढविल्यास वीज मंडळाकडून घेण्यात येणाऱ्या विजेच्या मागणीत घट होईल. त्याचा परिणाम शेती व निवासी वीज ग्राहकांना देण्यात येणाऱ्या अनुदानावर होईल. त्याचा ताण वीज मंडळाच्या आर्थिक ताळेबंदावर येईल यासाठी निवासी व शेती वरील अनुदान टप्प्याटप्प्याने कमी करण्याचा व त्यांचे वीज दर वीज निर्मिती, पारेषणाच्या खर्चाशी निगडित ठेवण्यात यावेत. मंडळाला तोटा सहन करावा लागणार नाही. याशिवाय निवासी ग्राहकांना नेट मीटरिंग च्या माध्यमातून सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यास उत्तेजन देण्यात यावे. शेतातील सर्व पंप हे सौरऊर्जेवर चालविण्यात यावे.

पेट्रोलियम उत्पादनाच्या मूल्यात सतत होत असलेली वाढ व पेट्रोलियम पदार्थ, कोळसा, नैसर्गिक वायू इ. यांच्या साठ्यात दिवसेंदिवस होत असलेली कमी यामुळे संपूर्ण जगाचे लक्ष हे ऊर्जाचे संरक्षण आणि ऊर्जेचा उत्कृष्ट वापर यावर गेले. त्याचबरोबर पर्यावरणाचा समतोल मागणी आणि पुरवठ्याचा समतोल राखायचा असेल तर अक्षय ऊर्जा साधने हे वापरावेच लागेल. या विषयी कोणत्याच ऊर्जा तज्ज्ञांमध्ये दोन मते राहिलेली नाही. अक्षयऊर्जा मध्ये सौरऊर्जा हे साधन अनंत काळासाठी नि:शुल्क राहणार आहे. तसेच ते कधीही न संपणारे आहे. सूर्यापासून ऊर्जा बनविताना कोणत्याही प्रकारचे प्रदुषण होत नाही. सौरऊर्जेची निर्मिती ही व्यक्तिगत आणि सामुहिकरित्या (मोठ्या प्रमाणावर) सुद्धा करता येते.

भारत हा देश उष्ण कटीबंधाचा आहे. कर्कवृत्तावर पूर्वेकडील देशापेक्षा पश्चिमेकडील देशात उष्णता जास्त आहे. भारत हा देश पूर्वेकडे येतो. कटीबंधात वर्षभर सुर्याची किरणे लंब रूपाने पडतात. साधारणत: सूर्यकिरणाचा कोन ४३ डिग्री से.ग्रे. ते ९० डिग्री से.ग्रे. च्या दरम्यान असतो त्यामुळे तापमान जास्त असते.६ देशाच्या ज्या भागात सूर्यप्रकाशाची तीव्रता, वर्षभरात मिळणारे प्रकाशाचे दिवस, मोठ्या प्रमाणावर सलग जागेची उपलब्धता पाहून सौरऊर्जा प्रकल्प कार्यान्वित केले जातात. सौरऊर्जा प्रकल्प हे खासगी व्यावसायिक उभारत असले तरी तयार झालेली वीज वाहून नेणे, त्यासाठी लागणाऱ्या पायाभूत सुविधा जसे वाहिन्या, उपकेंद्रे, अतिउच्च दाबाची वीज केंद्रे, वीज देशाच्या एका राज्यातून दुसऱ्या राज्यात जाण्यासाठी आवश्यक असणाऱ्या वीज वाहिन्या ही कामे अजून राज्य वीज मंडळे, व केंद्र सरकारच्या अखत्यारीतील संस्थांच्या कडे आहेत. यात खासगी संस्थांचा सहभाग वाढविणे गरजेचे आहे. बहुतेक सर्व राज्य वीज मंडळे अनुदान, वीज गळती, चोरीमुळे तोट्यात आहेत, त्यांना सक्षम करणे, वीज चोरी, वीज गळती कमी करणे, यासाठी कठोर उपाय योजना व राजकीय इच्छाशक्तीची गरज आहे. केंद्र सरकारने उदय (उज्वल डीस्काम शुरन्स योजना) यानावाने एक योजना सर्व राज्य मंडळासाठी सुरू केली आहे. या योजनेचे परिणाम राज्य वीज मंडळे पुढील ३-४ वर्षात तोट्यातून बाहेर यायला मदत होईल. त्या शिवाय, सौरऊर्जा प्रकल्पधारकांना वीज वाहिन्या, उपकेंद्रे बांधा, वापरा, हस्तांतर, या योजनेखाली बांधावयास उत्तेजन द्यावयास हवे सौरऊर्जा प्रकल्पापासून मिळणारी वीज फक्त दिवसाचे काही तासच मिळते व ती साठवून ठेवता येत नाही. ती लगेच वापरावी लागते. निवासी आस्थापना, छोटी इस्पितळे, व कार्यालये यात छोट्या प्रमाणावर काही तासांसाठी सौरऊर्जेवर बॅटरी चार्ज करता येते व ती साठवलेली वीज रात्री वापरता येते. पण हे अतिशय खर्चिक आहे. बॅटरीचे आयुष्य ४-५ वर्षेच आहे. वीज साठवणीचे उच्च तंत्रज्ञान अजून उपलब्ध

नाही. यावर संशोधन व त्याचा सक्षम वापर होणे गरजेचे आहे. केंद्र व राज्य सरकारने सौरऊर्जेचा वापर
ठोस पावले उचलली आहेत. आता गरज आहे नागरिकांनी जागृत होऊन पर्यावरण पूरक ऊर्जेचा वापर
वर चालणाऱ्या जनित्राचा वापर थांबविण्याची. पृथ्वी सुजलाम्-सुफलाम् होण्यासाठी आपण नागरिक
उचलू शकतो.७

पर्यायी ऊर्जा स्रोतांपासून निर्माण होणाऱ्या विजेचे प्रमाण पारंपारिक वीज निर्मितीच्या तुलनेत
राज्य शासनाद्वारे अपरंपारिक ऊर्जा निर्मिती बाबतचा १९९५ पासून धोरण निश्चित करण्यात येत आहे
दिनांक ३१ मार्च २०२० अखेर ९३०५ मेगावॅट क्षमतेचे अपारंपारिक ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित
एकूण २१२३ मेगावॅट विषमतेचे अपरंपारिक ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित होण्याकरिता प्रगती पथावर
शासनाद्वारे दिनांक ३१ डिसेंबर २०२० च्या शासन निर्णयन्वये अपारंपारिक ऊर्जा निर्मितीचे धोरण २०
आहे. या धोरणाअंतर्गत १७३६० मेगावॅट क्षमतेचे अपारंपारिक ऊर्जा निर्मिती प्रकल्प दिनांक ३१
राज्यात विकसित करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. यामध्ये १२९३० मेगावॅट क्षमतेचे
उद्दिष्ट अंतर्भूत आहे.८

उपलब्ध साहित्याचा आढावा :

१) फ्रेडमॉ यांनी 'ऊर्जा आणि स्वावलंबन' हे पुस्तक लिहलेले असून या पुस्तकाचे मराठी अनुवाद
यांनी केले आहे. या पुस्तकात ऊर्जा म्हणजे काय, ऊर्जेची निर्मिती आणि तिचा वापर, ऊर्जेचे स्रोत,
ऊर्जास्रोत, मनुष्य ऊर्जा कशी वापरतो, यंत्रामुळे ऊर्जेची उपयुक्तता वाढते, ऊर्जा स्रोतांचे व्यवस्थापन,
निर्मिती आणि वापर, सौरऊर्जेवर स्वयंपाक, पवनऊर्जा तुमच्या सेवेत, हवेकडून काम करून
लागणारी ऊर्जा मिळवा, इंधन बचत करणारी चूल, अशी प्रकरणे आहे. लेखक ऊर्जेच्या स्रोता
निसर्गात विविध मार्गाने ऊर्जा मिळते. काही प्रकारची ऊर्जा पुन्हा पुन्हा तर काही प्रकारची ऊर्जा
जाणारी म्हणजे ती अनवीकरणीय असते. ऊर्जेचा नीट वापर करायचा असेल, तर तिचे रूप बदलून
काही रूपे अत्यंत स्वस्त दरात आपल्याला बदलून घेता येतात. यंत्राच्या मदतीने ऊर्जेचे रूप
वापरासाठी सुयोग्य बनवता येते. ऊर्जेचे उत्पादन, वाटप, वापर आणि पुनर्निर्मिती, या सर्व गोष्टी
ते जर नीट केले, तर भविष्यात ऊर्जेची टंचाई जाणवणार नाही. इत्यादी मते, त्यांनी व्यक्त केली. आहे.९

२) बॅनर्जी एस यांनी लिहलेल्या लेखात भविष्यातील ऊर्जा आवश्यकता, ऊर्जासुरक्षा व
त्रिसूत्रावर डोळ्यासमोर ठेवून ऊर्जा क्रार्यक्रमाची आखणी करीत असताना त्यांनी सौरऊर्जा या
आहे. 'अणुऊर्जा : धारणा आणि प्रमुख आव्हाने' या लेखात त्यांनी सौरऊर्जाला अनुऊर्जेच्या
आहे. कोणत्याही देशाचे ऊर्जा सुरक्षा संबंधीचे धोरण हे तेथे उपलब्ध व सहज प्राप्त होणाऱ्या ऊर्जा
अवलंबून असते. सुदैवाने भारत अशा भौगोलिक स्थानावर आहे की ज्या प्रदेशाला निसर्गाचे
देशाच्या सर्व भागात वर्षभर भरपूर प्रमाणात सहज सूर्यप्रकाश प्राप्त होतो. जो सर्वोत्तम अशा सौरऊर्जेचा
सौरऊर्जेचा न संपणारा असा प्रचंड मोठा उपलब्ध साठा देशाच्या जवळपास सर्वच भागात आहे.
देशाच्या भविष्यकालीन ऊर्जासमस्येवर विचार करताना सौरशक्तीचा किती कार्यक्षमतेने वापर
खूप महत्त्व आहे असे त्यांनी म्हटले आहे.१०

३) डॉ. माथूर रितू यांनी 'शाश्वत विकास : ऊर्जा क्षेत्रातल्या संधी आणि आव्हाने' या लेखात म्हटले आहे की, अजैविक इंधनावर आधारीत वीज उत्पादनाला धडाडीने प्रोत्साहन द्यायला हवे, पुनर्विकरणीय स्त्रोतांचा वाटा जो सन २००६ मध्यल्या ६ टक्क्यांवरून २०३१पर्यंत ३०% व्हायला हवा. भारताच्या वीज उत्पादन यंत्रणेत २०३० सालापर्यंत मोठ्या प्रमाणावर परिवर्तन होणे गरजेचे आहे. सध्याच्या अनियमित पुनर्विकरणीय ऊर्जा स्त्रोतांच्या अत्यंत अल्प प्रमाणापासून वाढवत नेऊन २०३० सालापर्यंत पुरेशा जास्त प्रमाणातल्या वापरापर्यंत पोहोचण्यासाठी भविष्यातल्या विजेच्या मांगणीचा प्रकार लक्षात घेऊन योग्य मागणी आणि पुरवठा जुळणाऱ्या बहुगुणी पध्दतीने नियोजन करणे तसेच पुनर्विकरणीय ऊर्जा स्त्रोतांचे अनियमित स्वरूप लक्षात घेऊन योग्य वीजनिर्मिती आणि साठवणुकीसाठी नियोजन करणे अत्यंत आवश्यक आहे.११

४) द्विवेदी धीप्रज्ञ यांनी 'भारत में गैर परंपरागत ऊर्जा : अतित, वर्तमान व भविष्य' या लेखाची सुरवात करताना त्यांनी म्हटले आहे की, औद्योगिक विकासाचा आधार हा ऊर्जा राहिला आहे. आणि ऊर्जेची गरज ही प्रामुख्याने कोळसा आणि पेट्रोलियम पदार्थ ज्याला आपण पारंपारिक ऊर्जा म्हणून ओळखतो. जसजसा कोळसा आणि पेट्रोलियम पदार्थांचा उपयोग वाढत गेला तसतसा यांच्यापासून निर्माण होणाऱ्या समस्यावर लोकांचे लक्ष केंद्रित झाले. एक म्हणजे प्रदुषण आणि दुसरी म्हणजे यांची मर्यादीत उपलब्धता यामुळे भविष्यात निरंतर ऊर्जा मिळवायची असेल तर त्यासाठी परंपरागत ऊर्जेचा वापर हा जपून करावा लागेल आणि गैर परंपरागत ऊर्जेचा वापर हा सातत्याने वाढविण्यासाठी संशोधन व त्याचा उपयोग हा वाढविला पाहिजे त्यांच्या लेखात दिलेल्या आकडेवारी वरून हे स्पष्ट करून दिले आहे की भविष्यात कोणत्याही अटीशिवाय मुबलक ऊर्जा वापरायची असेल तर ती गैर परंपरागत ऊर्जा ही असेल. गैरपरंपरागत ऊर्जेमध्ये त्यांनी सौरव पवनऊर्जा यावर अधिक भर दिल्याचे आपल्या सहजच लक्षात येईल.१२

५) अरविंद गुप्ता यांनी 'सौरपुराण' हे पुस्तक लिहले असून त्यांनी त्यांच्या पुस्तकात सुरवातीपासून ते शेवटपर्यंत सूर्याची सचित्र माहिती दिली आहे. दिलेली माहिती ती वस्तूनिष्ठ स्वरूपाची असल्यामुळे व सोबत चित्राची जोड असल्यामुळे ती समजण्यास सरळ सोपी अशी आहे. लेखक सौरऊर्जाविषयी लिहताना म्हणतात की, सौरऊर्जा हे फक्त फुकटचे इंधन नाही. तर ती पर्यावरणस्नेहींची जगण्याची सुरूवात आहे. जे बोलण्यात आहे. ते आचारणात आणू. भारतात भरपूर सूर्यप्रकाश आहे आणि म्हणनु ह्या शाश्वत आणि स्वच्छ ऊर्जास्त्रोताचा आपण पुरेपूर वापर करायला हवा. खरं तर अजूनही सौरऊर्जेवर म्हणावे तेवढे संशोधन होत नाही. भारतात आजही ३० कोटी लोक विजेपासून वंचित आहेत, म्हणून तरी आपण चांगले व स्वस्त सौरघट (पार्क) बनवायला हवे आहेत आणि कार्यक्षम सूर्यचुलीही बाजारात आणायला हव्या आहेत. सौरऊर्जा वापरून छोट्यातल्या छोट्या गावात वीज नेणे शक्य होईल. त्याने सत्तेच्या विकेंद्रिकरणाचे व सामान्य लोकांच्या सबलीकरणाचे महात्मा गांधीजीचे स्वप्न साकार होईल.१३

समस्या :

१) ग्रामीण भागात शेतीकरिता लागणाऱ्या विजेवर मोठ्या प्रमाणावर विज लोडशेडिंग आहे.

२) सौरऊर्जा साठी सुरुवातीला करावी लागणारी गुंतवणूक अतिशय जास्त आहे.

३) ग्रामीण भागातील लोक नवीन तंत्रज्ञान सहज स्वीकारत नाही.

उपायोजना :

१) ग्रामीण भागातील गरिबी दूर करण्यासाठी 5kw एवढया क्षमतेचा (अंदाजे किंमत रू. ३,५० ८०० चौ.फुट) (ग्रामीण भागात जागेचा प्रश्न नसतो) प्रकल्प दिला तर त्यातून त्यांची स्वत:ची विजेची शिवाय राहिलेली वीज विकून पैसे कमवता येईल. हे सगळं जास्तीतजास्त एक महिन्याचा प्रशिक्षण (देखभाल प्रशिक्षण) (उमेदवार कमीतकमी १२ वी पास) रू. ३,५०,००० एवढे शासनाने अनुदान दिल्य वर्षेहा प्रकल्प व्यवस्थित काम करू शकतो. या सौरविज प्रकल्पातून ७५० युनिट वीज निर्माण होईल. युनिट ठेवल्यावर तो विकू शकतो. ६५० युनिट म्हणून ६५० २.७५ = १७८७.५० एवढे निश्चित शकते. (सामान्य माणसाला ५०% सबसिडी मिळू शकते तर दारिद्र्य रेषेखालील लोकांना १००% यावी.)

२) ग्रामीण भागाला लक्ष केंद्रीत करावे : सौरऊर्जा प्रकल्प लावण्यासाठी १ज्ञु साठी २०० फुट ७०० चौरस फुट ते ८०० चौरस फुट जागा लागते. तर एक किलोमीटर चौरस फुट जागेमध्ये ५५ मेगावॅट प्रकल्प स्थापित करता येतो. ग्रामीण भागात जागा मुबलक असल्यामुळे सौरविज उत्पादनासाठी भागाला लक्ष करावे.

३) पंचायतराज व्यवस्थेच्या योजना राबविताना सहभागी करून घ्यावे : सौरऊर्जेचा प्रसार होण्या व्यवस्थेचा उपयोग करून घ्यावा. (ग्रामपंचायत, नगर परिषद, जिल्हा परिषद) या संस्थांची लाभार्थी होईल. लाभार्थ्यांना लाभ घेण्याची प्रक्रिया, तांत्रिक ज्ञान, इत्यादी संबंधी मार्गदर्शन करावे त्यासाठी

४) ग्रामीण भागात फारशी पक्की घरे नसतात, पण जागेची भरपूर उपलब्धता असते, ही बाब ५०,७५,१०० घरांचा एक समूह बनविण्यात यावा. यांचाही एक सोसायटी बनविण्यात यावी यांच्या सौरविद्युत प्रकल्प यांना द्यावा. त्याकरिता खाली जागी सौरविद्युत पार्क बनविण्यात यावे.

५) शेतकऱ्यांना व्यक्तीगत सौरऊर्जा पंप देण्यापेक्षा गावातील सर्व शेतकऱ्यांना लागणाऱ्या लोडचा हिशोब ५ पट सौरविद्युत प्रकल्प उभारावा. त्यातून सौरविज शेतकऱ्यांना द्यावी. कारण शेतकऱ्यांना दिवसा दिवसाच सूर्यप्रकाश असतो.

निष्कर्ष :

१) सौरऊर्जा प्रदुषणमुक्त आणि अक्षय आहे. नि:शुल्क आहे. सौरऊर्जा गॅस किंवा कोळशासारखे वायू, कोळसा काढण्यासाठी ३६०० फुट खोल खड्डा, वैश्विक तापमान वाढ, आम्लधर्मी पाऊस किंवा तयार करीत नाही.

२) वीज प्रकल्पांपासून लांब असलेल्या दुर्गम गावांमध्येही सौरऊर्जा यंत्र बसविता येते. विजेचे लांबचे लांब तारा उभ्या करणे, प्रदूषणाचा मानवी कल्याणावर होणारा परिणाम लक्षात घेता सोलर पॅनल व स्वस्थ पडते.

३) भारतात एकूण विद्युत मागणीही रात्री पेक्षा दिवसा जास्त असते. सौरविद्युत दिवसा सूर्य असल्यामुळे जास्त वीज पाहिजे असल्यामुळे सौरविद्युत अधिक उपयोगी आहे.

४) सन २०११-१२ दरम्यान कृषि क्षेत्रातील वीज वापराचा वृद्धी दर हा १.२८% एवढाच आहे. कृषि क्षेत्रात वीज वापराच्या वृद्धी दरातील घट ही चिंतेची बाब आहे. कारण सिंचनासाठी विजेची आवश्यकता असते. वीज वापरात घट म्हणजे सिंचनावर त्याचा विपरीत परिणाम होऊन शेतकऱ्याची आर्थिक स्थिती खालावत आहे. शेतकऱ्यांचे उत्पादन, उत्पन्न कमी होत आहे. पर्यायाने तो आत्महत्याकडे प्रवृत्त होत आहे.

संदर्भसूची:-

१) गोटफोडे सुभाष, सौर ऊर्जेच्या गरजेचे आर्थिक अध्ययन, एम. फील. शोधनिबंध अमरावती २०१७

२) दत्त, गौरव व महाजन, अश्विनी : भारतीय अर्थव्यवस्था, एस. चन्द्र एण्ड कंपनी लिमिटेड, नई दिल्ली, २०१६

३) भांडारकर, पु.ल. : सामाजिक संशोधन पद्धती, अ. अं. कुलकर्णी, नियंत्रक प्रकाशन, समिती महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर.

४) गोटफोडे सुभाष, सौर ऊर्जेच्या गरजेचे आर्थिक अध्ययन, एम. फील. शोधनिबंध अमरावती २०१७

५) उपरोक्त

६) देशमुख, रजनीर : हवामानशास्त्र व सागरशास्त्र, वसुंधरा प्रकाशन, नागपूर, २००६

७) गोटफोडे सुभाष, सौर ऊर्जेच्या गरजेचे आर्थिक अध्ययन, एम. फील. शोधनिबंध अमरावती २०१७

८) महाराष्ट्र शासन उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक: सौरप्र -२०१९/ प्र. क्र. २५४ /ऊर्जा - ७ दिनांक १ जून २०२२

९) देशपांडे, अ. पा. (अनुवाद) : 'ऊर्जा आणि स्वावलंबन', मनोविकास प्रकाशन, फ्लैट कं. ३ए, ४ था मजला, शक्ती टॉवर, ६७२, नारायण पेठ, पुणे, प्रथमावृत्ती, डिसेंबर २००७.

१०) बॅनर्जी एस, योजना मासिक, (मराठी) ऑगस्ट, २०१६, बेलापूर, नवी मुंबई, पृ.क्र. ३६

११) माथूर रितू, योजना मासिक, (मराठी) ऑगस्ट, २०१६, बेलापूर, नवी मुंबई, पृ.क्र. ४१

१२) द्विवेदी धीप्रज्ञ, योजना मासिक, (हिंदी) ऑगस्ट, २०१६, लोधी रोड, नई दिल्ली, पृ.क्र. ५५, ५८

१३) गुप्ता अरविंद, सौरपुराण, ऊर्जा प्रकाशन, बी-४, संकुल, एरंडवणे, पुणे-४११००४, प्रथम आवृत्ती-२०१३

मासिके :-

१) योजना मासिक (मराठी) ऑगस्ट, २०१६, बेलापूर, नवी मुंबई, २०.

२) लोकराज्य, प्रकाशन विभाग, महाराष्ट्र सरकार, मुंबई.

वर्तमानपत्र :-

१) लोकसत्ता२) सकाळ ३) लोकमत

वेबसाईट,

1) https://www.india.gov.in/website-ministry-new-and-renewable-energy

2) https://www.mahaurja.com/meda/

*****

RNI NO. MAHMUL 03498

ISSN 2456-9504

RESEARCH AWAKENING

National Multi-Disciplinary Peer Reviewed & Refereed Journal
(Bi-Annual Journal)

Volume : 04

ISSUE: Oct. 2020
to
March. 2021



-: Published by :-
Principal: Dr. Smita R. Deshmukh
Shri Shivaji Arts & Commerce College,
Morshi Road, Amravati. (M.S.) India

(Page No 72-76)

राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांच्या विचारातील ग्रामविकास

संशोधन अभ्यासक : निलेश म. मोहकार मार्गदर्शक : प्रा. डॉ.जे.व्ही.गायकवाड
पीएच.डी.संशोधन केंद्र : 102 - श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय,अमरावती

प्रस्तावना :

विसाव्या शतकातील महान कर्मयोगी, मानवतेचे पुजारी, युगप्रवर्तक या विशेषणांनी ज्यांना ओळखले जाते ते संत म्हणजे वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज होय. त्यांचा जन्म ३० एप्रिल १९०९ रोजी विदर्भातील अमरावती जिल्ह्यातील यावली (शहीद) या गावी झाला. स्वतंत्र भारताचे पहिले राष्ट्रपती डॉक्टर राजेंद्र प्रसाद यांनी राष्ट्रसंत या उपाधीने तुकडोजी महाराज यांचा गौरव केला. कारण की त्यांनी समाजासाठी, देशासाठी उद्धारक कार्य केले. वंदनीय तुकडोजी महाराजांनी १९०९ ते १९६८ या काळामध्ये भजन,कीर्तन तसेच साहित्य लेखनाच्या माध्यमातून समाज प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला. यामध्ये धर्मनिरपेक्षता, अंधश्रद्धा निर्मूलन, महिला सक्षमीकरण, सामाजिक समता,आर्थिक समता प्रस्थापित करण्याच्या हेतूने मोलाचे योगदान दिले आहे.

भारत देशाच्या आर्थिक विकासासाठी कौटिल्य, महात्मा गांधी, महात्मा फुले यांनी आर्थिक विचार मांडले आहे. देशाला विकासाच्या मार्गावर नेण्यास हे आर्थिक विचार अतिशय महत्त्वाचे आहे. याच पावलावर पाऊल ठेवून राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून ग्रामीण विकासाबाबत आर्थिक विचार मांडलेले आहे.भारत देशामध्ये आजही बहुसंख्य लोक शेती व्यवसाय करतात. भारतीय अर्थव्यस्थेत शेती चा समावेश प्राथमिक क्षेत्रात प्रामुख्याने केला जातो. पहिल्या पंचवार्षिक योजनेचा मुख्य भर हा शेती व्यवसायावर होता. शेती क्षेत्रात झालेल्या प्रगतीमुळे देशाचा विकास होऊ शकतो हाच विचार राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी स्वातंत्र्यपूर्व काळात व स्वातंत्र्योत्तर काळात आपल्या आर्थिक विचारांच्या माध्यमातून समाजापर्यंत ठेवला. आज ही मोठ्या प्रमाणात अन्नधान्याचा पुरवठा ग्रामीण भागातूनच केला जातो.आजही शिक्षित वर्ग मोठ्या प्रमाणात शेती हा व्यवसाय करून आपला उदरनिर्वाह करत आहे. राष्ट्रसंत संत तुकडोजी महाराज यांनी आपल्या ग्रामगीतेमध्ये ग्रामरक्षण, ग्रामशुद्धी, ग्रामनिर्माणकला, ग्राम-आरोग्य, गोवंश-सुधार, गरीब-श्रीमंती, श्रम-संपत्ती, ग्राम-कुटुंब या विशेष अध्यायातून राष्ट्रसंतांनी गाव कशी स्वयंपूर्ण व स्वावलंबी होतील यावर भर दिला. प्रत्येक व्यक्तीने श्रम करून स्वतःच्या उपजिविकेचे साधन निर्माण करावे. कोणीही मागासला राहू नये. तेव्हाच ग्रामसमृद्धी होईल असे त्यांचे मत आहे. आजच्या या कोरोना काळातील महाभयंकर परिस्थितीमध्ये सुद्धा ग्रामीण क्षेत्रात कृषी व कृषी संबंधित व्यवसायातून मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागामध्ये रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहे. म्हणूनच राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांनी आपल्या विचारातून ग्रामोद्योगातून ग्रामविकास हा आर्थिक विचार मांडला आहे.

गृहितके :

१) तुकडोजी महाराजांच्या आर्थिक विचारांमुळे ग्रामीण भागात बदल घडून आलेला आहे.

२) तुकडोजी महाराजांच्या सामाजिक विचारांमुळे ग्रामीण भागात परिवर्तन घडून आलेले आहे.

तुकडोजी महाराज यांचे आर्थिक विचार:

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या लेखनातून ठाई ठाई राष्ट्रवाद, राष्ट्रीय एकात्मता, स्वातंत्र्य, समता व बंधुता या संबंधीचे त्यांचे चिंतन प्रगट होते. हिंदुस्थान हा खेड्यांचा बनलेला देश आहे. तेव्हा खेड्याची सुधारणा झाली तरच देशाची प्रगती होईल हे ओळखून त्यांनी ग्राम सुधारण्याची मोहीम हाती घेतली. राष्ट्रसंतांनी ग्रामाचा अतिशय सूक्ष्म अभ्यास केला होता. त्यांनी महात्मा गांधी यांच्या स्वराज्य संकल्पनेला सुराज्यात परिवर्तन करण्यासाठी हयातभर प्रयत्न केला आहे. ग्रामगीता या ग्रंथामध्ये तुकडोजी महाराज.असे म्हणतात की,

गाव हा विश्वाचा नकाशा ।
गावावरून देशाची परीक्षा।
गावची भंगता अवदशा ।
येईल देशा।।

खेडी समृद्ध करण्याच्या योजना भरपूर आहे परंतु त्यातील भ्रष्टाचार थांबवणारी व्यवस्था नाही. गावागावात राज्यकर्त्यांनी घातलेला धुमाकूळ अतिशय गंभीर आहे. सामान्य जनतेची दिशाभूल करून चोर मुजोरा सारखे कुरण खात आहे. ही स्थिती बदलण्याची नितांत गरज आहे. राष्ट्रसंतांनी ग्रामविकासाचा दिलेला मूलमंत्र सज्जनांनी स्वीकारला पाहिजे. जो जाणत नाही त्याला सांगायचे, जेथे समजत आहे त्यांनी सोबती करणे, प्रत्येकाच्या कलेचा, भक्तीचा, ज्ञानाचा फायदा घ्यायचा आहे. गावाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी जे विचार ग्रामीण लोकांनी व अनुभवी सज्जनांनी करावयाचे आहे ते विचार दृढ करून आचरणाला सुरुवात करावयाची आहे. गावातील सुशिक्षित, विद्वान, पंडित, श्रीमंत, अभ्यासू मंडळींनी एकत्र येऊन आपल्या गावाच्या समस्येवर अभ्यास करण्याची आवश्यकता आहे. राष्ट्रसंतांनी ग्रामगीतेत तसेच त्यांच्या रचनात्मक कार्यक्रमात ग्रामविकासाचे सूत्र दिले आहे. त्या सर्व बाबीवर कार्य करण्याची गरज आहे. ग्रामसभा या अस्त्राचा योग्य वापर करून योजना राबविल्या गेल्या तरच विकास साध्य करता येतो. ग्रामगीता ही ग्रामीण योजनांचा खजाना आहे त्याचे अध्ययन करून कार्य केले जावे. देशात अनेक खेडी राष्ट्रसंतांच्या विचारातून 'आदर्श गाव' होत आहे. या सत्कार्यात सर्व ग्रामवासियांनी पुढाकार घेऊन कार्य केल्यास महात्मा गांधीजींचे स्वराज्याचे सुराज्य हे स्वप्न साध्य करता येऊ शकते.

गरीबी श्रीमंती यांच्यातल्या वर्गीय भेदाबाबत सुद्धा राष्ट्रसंतांची भूमिका एका उच्चतर पातळीवरील समन्वयाची राहिली आहे. उपेक्षित-पिडीत श्रमजीवींना समान दर्जाचे मानवप्राणी म्हणून न्याय्य वाटा मिळावा ही आकांक्षा त्यांना ग्राम निर्माणाच्या सुत्रापर्यंत घेऊन गेली असती तरी कम्युनिस्टांच्या धारणेप्रमाणे प्रचलित राज्यव्यवस्था नष्ट करून श्रमिकांचे राज्य यावे व त्यासाठी रक्तरंजित क्रांती करावी लागली तरी बेहतर अशी एकांगी धारणा राष्ट्रसंतांची नव्हती. "नांदोत सुखे गरीब-अमिर एक मताने" एकाचे धन दुसऱ्याचे श्रम यांच्या संयोगाने मानवहितैशी उद्योजकता भरभराटीस यावी आणि सारी मानवजात सुखी व समृद्ध होत जावी अशी त्यांची भूमिका आहे.याचा पुरावा देताना राष्ट्रसंत असे म्हणतात की,

धन हे गरिबांचे रक्त ।
समजुनी वागोत श्रीमंत।
श्रम ही गावाची दौलत ।
म्हणोनि व्हावा मान तिचा।।

विनोबा भावे यांनी १९५१ पासून भूदान चळवळ सुरू केली होती. ' सब भूमी

गोपाल की ' हा मंत्र विनोबा लोकांना सांगत. भूदान चळवळीस सहकार्य करण्याच्या भूमिकेतून १ मे १९५३ रोजी तुकडोजी महाराजांनी यवतमाळ जिल्ह्यातील पारवा या गावापासून सुरुवात केली. केवळ दहा दिवसात महाराजांनी ११४१० एकर जमीन भूदानास मिळवून दिली. वैयक्तिक मालकी कायम ठेवून सर्व ग्रामजीवनातील शेती सामूहिक पद्धतीने करण्याच्या आवश्यकतेवर त्यांनी भर दिला होता. त्यामुळे उत्पादन खर्चात काटकसर होऊन उत्पादनाचा वेग वाढेल असे ते म्हणत.

शिक्षण, उद्योग, शिस्त, चारित्र्य या सर्वच बाबतीत आज जीवनात घातक उणिवा निर्माण झाल्या आहेत. त्या दूर करण्यासाठी सतत फिरून तुकडोजी महाराज भजन, भाषणाद्वारे खेडी व शहरे उज्वल केली आहे. ग्रामनिर्माणकला या अध्यायात गावाच्या दारिद्याचे कारण व स्वावलंबन महत्त्व, उपयुक्त स्वावलंबी कला व तिचा विकास, कलात्मक आदर्श ग्रामरचना हा विचार तर श्रम संपत्ती या अध्यायातून ग्रामोद्योगातून ग्रामराज्य हा आर्थिक विचार मांडला आहे.

भारत हा खेड्यांचा देश आहे, हे लक्षात घेऊन ग्रामविकास झाला की राष्ट्राचा विकास होईल, अशी तुकडोजी महाराजांची श्रद्धा व विचारसरणी होती. तुकडोजी महाराजांनी ग्रामजीवनाचे विशालात्व अनुभवले व त्यावर प्रयोग करून पाहीले. आधी केले मग त्यांनी ग्रामगीतेत सांगितले. खेड्याचा प्रश्न विशाल आहे. तो सुटला की आपोआपच शहराचा प्रश्न सुटेल. असे गांधीजी म्हणत. तोच विचार तुकडोजी महाराजांनी ग्रामगीता ग्रामासाठी, खेड्यासाठी आहे. खेड्याबरोबर शहरांचाही विचार यात आहे. ग्रामोन्नती व ग्रामविकास हा त्यांच्या विचारसरणीचा जणू केंद्रबिंदूच. खेडेगाव कसे स्वयंपूर्ण होईल, याविषयीची जी उपाय योजना तुकडोजी महाराजांनी सुचविली होती, ती अतिशय परिणामकारक ठरली आहे.

सामाजिक विचार :

महाराजांना देशातील ग्रामीण जनतेचे दुःख स्वस्त बसू देत नव्हते. गावच्या गाव उध्वस्त होत आहे तेथील जनतेला दळण वळणाचे रस्ते नाही, पिण्याचे शुद्ध पाणी नाही, शिक्षणाच्या सुविधा नाही, व्यवसायाची सोय नाही, उद्योग, आरोग्य, निरक्षरता, अंधश्रद्धा, शेतकरी बांधवांच्या समस्या, ग्रामीण भागात वाढलेली व्यसनाधीनता, भ्रष्टाचार अशा अनेक समस्यांनी जनता हवालदिल झालेली आहे. यांचा विकास झाला नाही तर देशाच्या विकासाचे स्वप्न पाहू शकत नाही म्हणून त्यांनी ग्रामविकासाचा ध्यास घेतला होता. देशाचा विकास करायचा असेल तर गावाचा विकास झाला पाहिजे असे त्यांचे ठाम मत होते.

वंदनीय राष्ट्रसंतांनी आपल्या जन्मदिवसाला ग्रामजयंती म्हटले. याचा अर्थ सरळ, साधा, सोपा आहे. भारत देशातील ५ लाख ग्रामाचा उद्धार करण्यासाठी प्रत्येक ग्रामवासीयांनी पुढाकार घेऊन गावात सुख, समृद्धी, शांतता नांदावी याकरिता ग्रामजयंती प्रत्येक गावात साजरी व्हावी. हा कोण्या व्यक्तीच्या जयंतीचा कार्यक्रम नाही तर गावाच्या उत्कर्षाचा उत्सव आहे. गाव हेच देऊळ आहे आणि त्या देवळातील देव म्हणजे गावातील लोक हे प्रतिपादित करताना तुकडोजी महाराज ग्रामगीतेमध्ये असे म्हणतात की,

जाणावे ग्राम हेची मंदिर। ग्राम आतील जन सर्वेश्वर।
सेवा हेचि पूजा समग्र। हाची विचार निवेदावा।।

सद्यस्थितीत संपूर्ण विश्वात अशांतता पसरलेली आहे. विज्ञानाच्या परमोच्च संशोधनामुळे मानव उन्नतीकडे जाण्या

ऐवजी तो विनाशाकडे वाटचाल करीत आहे. विज्ञानाने प्रगती दिसत आहे परंतु माणसातील माणुसकी नष्ट होत आहे. मनावर होणारे अध्यात्मिक संस्कार ऱ्हास होणे हे विज्ञानाही घातक ठरणार आहे. ग्रामगीता ही फक्त वाचण्यासाठी नसून "वाचता वाट दावी जनाशी" ती आचरणात आणून त्यातील सुसंस्कार समाज मनावर बिंबवायचे आहे. अध्यात्म आणि विज्ञान यांचा संगम असलेल्या या ग्रंथातील विचाराने समाजमन घडवायचे आहे.

राष्ट्रसंतांनी ६५ वर्षापूर्वी केलेले भाष्य आज आपण अनुभवतो आहे. देशाच्या स्वातंत्र्याच्या ७२ वर्षानंतरचे चित्र अतिशय विदारक आहे. खेडीच्या खेडी ओस पडत आहे. खेड्यातील जनतेचे जीवन कठीण झाले आहे. आजही आमच्या देशातील ग्रामीण जनतेला शुद्ध पिण्याचे पाणी नाही, उद्योगाचे साधन नाही, रोजगार नाही, आरोग्याच्या सुविधा नाही, चांगल्या शिक्षणाची सोय नाही अशा अनेक समस्या आहे. त्यात प्रामुख्याने शेतकऱ्यांचा प्रश्न प्रचंड मोठा आहे. शेतकरी बांधव मोठ्या प्रमाणात आत्महत्या करीत आहे, शेतकऱ्याच्या मालाला भाव नाही, त्यांच्या समस्या सोडविण्यापेक्षा त्यांच्या भावनांशी खेडण्याचे राजकारण सर्वत्र पाहायला मिळत आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी हे शिक्षणतज्ञ होते. शिक्षणाद्वारे माणसाच्या मनातील न्यूनगंड दूर झाला पाहिजेत, पुस्तकी शिक्षणातून समाजाचा विकास होणार नाही, खेड्यातून वर्ग सुरू केले होते. विज्ञान शिक्षण शेतीसाठी आवश्यक आहे असे म्हणत. शिक्षणासोबतच श्रप्रतिष्ठा महत्वाची आहे. स्वच्छता हाच आनंदी जीवनाचा झरा आहे असे म्हणत. स्त्रियांनीच महापुरुष, लढवय्ये, थोर संत, समाजसुधारक यांना जन्म दिला आहे.राष्ट्रसंत स्त्री-पुरुष विषमतेवर प्रहार करतात.उलट स्त्रीयांच्या तेजावरीच मोठेपण आहे असा स्त्रियांविषयीचा आत्मविश्वास व्यक्त करतात.

आजच्या आधुनिक काळात तुकडोजी महाराजांच्या विचाराचा लोकांच्या मनावर चांगला प्रभाव पडलेला दिसून येतो. संत तुकडोजी महाराज द्वारा संस्थापित अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवा मंडळ गुरुकुंज आश्रम, मोझरी जि.अमरावती र.न.एफ/१६२ या सेवेच्या वटवृक्षाखाली चिरंतर लोकसेवा सुरु आहे. प्रत्येक गावात श्रीगुरुदेव सेवा मंडळाच्या माध्यमातून समाजपयोगी कार्य, ग्रामगीताप्रणित जीवन शिक्षणाचे धडे, शेती व्यवसायाबरोबरच लघु-कुटीर उद्योग सुरु करून शेती क्षेत्रातून निघालेल्या कच्या मालावर प्रक्रिया करून पक्का माल आज मोठ्या प्रमाणात शहरात विक्रीसाठी जात आहे. ते आपल्या शिक्षणाचा उपयोग शेती शेत्रात करत असल्याचे चित्र दिसत आहे. संत तुकडोजी महाराजांच्या विचारामुळे ग्रामीण भाग मोठ्याप्रमाणात विकसित होत आहे. ग्रामीण भागातील महिला सुद्धा आज लघु उद्योग करून आपल्या संसाराचास गाडा योग्य पद्धतीने चालवत आहे. एकंदरीत ह्या सर्व विचारामुळे समाजाचे जीवनमान उंचावलेले अनुभवास येते आहे. हे विषद करतांना तुकडोजी महाराज असे म्हणतात की,

गावागावासी जागवा ।
भेदभाव हा समुळ मिटवा ।
उजळा ग्रामोन्नतीचा दिवा ।
तुकड्या म्हणे ।।

ही व्यापक समन्वयाची भुमिका लोकांना अहं केंद्रीतता-कुटुंब केंद्रीतता-समुह केंद्रीतता यांच्या मर्यादामधून मुक्त करीत ग्राम केंद्रीततेशी जोडून देते.

निष्कर्ष :

१) तुकडोजी महाराज यांच्या आर्थिक विचारामुळे ग्रामीण विकास झालेला आहे.

२) ग्रामीण भागामध्ये आर्थिक समता प्राप्त झाली आहे.

३) ग्रामीण भागात लघु-कुटिर उद्योगांचा विकास होत आहे.

४) ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माण झालेल्या आहेत.

५) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या आर्थिक विचारांमुळे गावे स्वावलंबी व आदर्श झालेली आहे.

६) ग्रामीण भाग विकसित झाला तर राष्ट्र विकसित होईल असे विचार संत तुकडोजी महारजांनी आपल्या ग्रामगीता ग्रंथात मांडले आहे.

६) ग्रामीण भागातील लोकांचा राहणीमानाचा दर्जा उंचावलेला आहे.

७) तुकडोजी महाराज यांच्या प्रबोधनाचा लोकांच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक जीवनावर चांगला प्रभाव पडलेला आहे.

संदर्भ :

१. कन्हाडे डॉ.बी.एम., सामाजिक संशोधन पद्धती, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर, २०१८.

२. राष्ट्रसंत श्री तुकडोजी महारज, ग्रामगीता, श्रीगुरुदेव प्रकाशन, नागपूर, २०१०.

३. गाठाळ डॉ. एस. एस., महाराष्ट्रातील समाजसुधारक, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, २०१७.

४. पुनसे डॉ.दिपक बा. श्रीगुरुदेव मासिक, श्रीगुरुदेव प्रकाशन, गुरुकुंज आश्रम, एप्रिल २०२१.

५

. https://en.m.wikipedia.org/wiki/Tukdoji_Maharaj


** ** **

RESEARCH HUB

International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal

ISSN : 2582-9173
Impact Factor : 5.307 (SJIF)

Refereed & Indexed Journal



Volume-3 : Issue-2 (April-2022)

Published by
Skylark International Publication
38, Mitranagar, Manewada, Nagpur-27
www.researchhub.org.in/research-hub

कृषी वित्तपुरवठा आणि कर्जमाफी

डॉ. गजानन गंगा भारती
(सहा. प्राध्या. - पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग)
श्री. शिवाजी कला व वाणिज्य महा, अमरावती
मो. ९७६४९९१५९७
Email Id :- ggbharati६७@gmail.com

गोषवारा -

भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असलेली शेती, कृषिप्रधान अर्थव्यवस्था, आणि जगाचा पोशिंदा असलेला शेतकरी असे अनेक बिरुद असलेली आपली शेती, मात्र येथील शेतकरी व शेतीची वास्तविकता भयावह आहे. आर्थिक सुधारणांचा लाभ शेतकरी सोडल्यास कमी आधिक प्रमाणात सर्वांनाच मिळाला. शेतकऱ्यांसाठी अतिशय खडतर व कडवट ठरलेल्या याच काळात शेतकऱ्यांची सहनशीलता व विचार क्षमता लयास गेली म्हणून कित्येक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. यांची अनेक कारणे असू शकतात पण मुख्य कारण होते ते वित्ताचे, मग ते उत्पन्न रुपी असो किंवा कर्ज रुपी योग्य वेळी व योग्य प्रमाणात मिळाले नाही.

कल्याणकारी राज्य आणि कल्याणकारी अर्थशास्त्राचा अभ्यास आपण करतो, पण त्यात शेतकऱ्यांचे कल्याण अभ्यासता येत नाही. महाराष्ट्रासारख्या प्रगतशील व उद्योगप्रधान राज्यात आपण राहतो. येथेच शेतकऱ्यांची दैनावस्था का ? महासत्तेचे स्वप्न पाहणाऱ्या देशात शेती वित्त किंवा उत्पादनाच्या माध्यमातून शेतकरी आणि शेतीचे गंभीर प्रश्न सोडवता येतात. गरज आहे, ती विकसित देशाप्रमाणे आपले शासकीय धोरण निश्चितीची व त्यांच्या अंमलबजावणीची. व्यापार-उद्योग क्षेत्राप्रमाणेच शेतीक्षेत्राला वित्तपुरवठ्याची गरज असते. मात्र ती वेळेत मिळत नाही, तारणाच्या अभावी बँका देत नाहीत. म्हणून शेतकरी अव्वाच्या सव्वा व्याजदर लावून सहज कर्ज देणाऱ्या सावकाराकडे जातात आणि कायम कर्जबाजारी होतात. कर्जाच्या सापळ्यातून शेतकरी बाहेर पडावा म्हणून शासन कर्जमाफीची घोषणा करते, मात्र कर्जमाफीच्या अटी-शर्ती व गुंतागुंत पाहता सर्व शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळेलच याची कुठेच शाश्वती नाही किंवा तशी तसदी शासन घेत नाही. महाराष्ट्रातील ८३ % शेती निसर्गाच्या भरवशावर अवलंबून आहे. आणि दर दोन वर्षानंतर दुष्काळ व निसर्गाच्या प्रकोपाला ती बळी पडते. म्हणून योग्यवेळी योग्य कृषी कर्जाची तसेच कर्जमाफीची शिदोरी शेतकऱ्यांच्या पदरी पडली पाहिजे हीच अपेक्षा आहे.

महाराष्ट्रातील बहुसंख्य शेतकरी अल्पभूधारक व सिमांत शेतकरी आहे. याची जाणीव ठेवून कोणतिही आडकाठी न ठेवता शासनाने उदार मणाने आणि स्वहीत बाजूला ठेवून वित्तपुरवठा किंवा कर्जमाफी करावी. असे न केल्यास केवळ मलमपट्टी ठरेल यात दुमत असण्याचे कारण नाही.

प्रस्तावना –

भारतीय शेतकरी, जगाचा पोशिंदा, भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असलेली शेती म्हणजेच कृषिप्रधान अर्थव्यवस्था हे कायम बिरुद असलेली आपली शेती.पण या शेतकऱ्यांची कर्म कहाणी म्हणजे करूण कहाणीच म्हणावी लागेल. अर्थात उदारीकरणाचा कालखंड आणि १९९१ च्या आर्थिक सुधारणाचा लाभ शेतकरी सोडल्यास सर्वांनाच कमी-अधिक प्रमाणात मिळाला आणि मिळत आहे. आजवर न पाहिलेले किंवा अनुभवलेले वेगळे पण या आर्थिक सुधारणाच्या काळात महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी अनुभवलेले आहे. हा काळ इतका खडतर आणि

कडवट होता की कित्येक शेतकऱ्यांची विचारक्षमता व सहनशीलता लयास गेली आणि त्यांनी आत्महत्या पत्करली. या मागची अनेक कारणेही असू शकतात पण महत्त्वाचे व प्रमुख कारण होते ते म्हणजे वित्त किंवा भांडवल, मग ते उत्पन्नाच्या माध्यमाने असो, की ऋणाच्या माध्यमाने परंतु आवश्यकते प्रमाणे आणि गरजेच्या वेळी ते मिळाले नाही हे महत्त्वाचे.

परिवाराच्या भरणपोषणासाठी आणि अस्तित्वासाठी आत्महत्ये सारखे टोकाचे पाऊल उचलणारा एकमेव व्यावसायीक म्हणजे शेतकरी, कारण जगाच्या पाठीवर आपल्या अस्तित्वासाठी टोकाचे पाऊल उचलणारा इतर कोणताही उद्योगपती, व्यापारी किंवा नोकरदार वर्ग शोधूनही सापडत नाही. मग शेतकरीच का ? हा कळीचा मुद्दा ठरतो. कारण कित्येक दशकांपासून आपण कल्याणकारी अर्थशास्त्राचा अभ्यास करतोय पण या अर्थशास्त्रात शेतकरी कल्यान आढळत नाही. मग कल्याणकारी राज्याची संकल्पना कुठे आहे.? (निसर्गवादी-मुठभर पेरलेतर पोतभर मिळणे पण केव्हा व कसे उत्पन्न मिळेल.)

आज महासत्तेची स्वप्न आपण पाहत आहोत मग महाराष्ट्रासारख्या प्रगतशील आणि उद्योगप्रधान राज्यात गावोगावी शेतकऱ्यांची दैनावस्था का ? भारतीय शेती व्यवस्था जुगार मानल्या जातो. ज्यामुळे नवनवीन प्रश्न शेतकऱ्यांपुढे उभे असतात त्याची सोडवणूक शेती वित्त किंवा उत्पादनाच्या माध्यमातून होऊ शकते पण त्यासाठी विकसित देशाप्रमाणे आपले शासकीय धोरण तितके उदार आणि कार्यक्षम असायला हवे.

कृषी वित्ताची आवश्यकता -

व्यापार, उद्योग क्षेत्राप्रमाणे शेतीक्षेत्राला वित्तपुरवठाची आणि विविध कामांमध्ये गुंतवणुकीची गरज असते. बी-बियाणे, खते, जंतुनाशके, जनावरे, अवजारे, ट्रॅक्टर, विहीर किंवा बोअर घेणे, कुंपण, बाधबंधिस्त इत्यादी कार्याकरिता शेतीला पतपुरवठ्याची आवश्यकता असते. बहुतांश वेळा कर्ज घेऊनच शेतीची लागवड करावी लागते, पुढे पाऊस आला नाही किंवा अतिवृष्टी झाली तर पिकांचे नुकसान होते, उत्पन्न मिळत नाही. मग गुंतवणूक वाया जाते व शेतकरी कर्ज फेड तर दूरच तोच कर्जबाजारी होतो. अर्थात शेतीच्या गुंतवणुकीतून उत्पन्नाची निश्चित हमी कधीच देता येत नाही. म्हणून शेतीला पतपुरवठा करण्यास बहुतांश बँका नाखूष असतात त्याचा विपरीत परिणाम शेती गुंतवणूक व उत्पादनावर होऊन शेतकरी दरिद्र्यावस्थेत ढकलला जातो.

शेती लागवडीसाठी भांडवलाची नितांत गरज असते म्हणून सहज, सुलभ किंवा कोणत्याही अटी शिवाय कर्ज उपलब्ध होणाऱ्या सावकाराकडे शेतकरी कर्ज काढतो, पण त्या कर्जाचा व्याजदर आव्वाच्या सव्वा असतो व शेतकरी कर्जाच्या जाळ्यात अडकतो म्हणूनच शेतीला योग्यवेळी, योग्य प्रमाणात, माफक दरात पुरेसा कर्जपुरवठा होणे नितांत गरजेचे आहे.

नियोजन काळात इतर क्षेत्रांच्या तुलनेत कृषी क्षेत्राचा विकास फारच कमी राहिला, मुख्यतः इतर क्षेत्रांप्रमाणे शेतीक्षेत्रातील भांडवलात अपेक्षित वाढ झाली नाही.

कृषी वित्तपुरवठ्याचे दोन गटात वर्गीकरण केले जाते -

अ) उद्देशानुसार कर्ज, ब) कालावधीनुसार कर्ज

अ) उद्देशानुसार कर्जाची दोन भागात विभागणी केली जाते.

१) **उत्पादक कर्ज** - ज्या कर्जामुळे शेती उत्पादन वाढ होते त्याला उत्पादक कर्ज असे म्हणतात.

२) **अनुत्पादक कर्ज** - ज्या कर्जामुळे उत्पादनात काहीच वाढ होत नाही त्याला अनुत्पादक कर्ज म्हणतात. शेती लागवड ते माल विक्रीतून हाती पैसे येईपर्यंत आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी ह्या कर्जाची गरज

शेतकऱ्याला असते. उदा.सनवार साजरे करणे,वाढदिवस, लग्नकार्य,जन्ममृत्यु,धार्मिक विधी, अशा कार्यासाठी घेतलेल्या कर्जामुळे शेती उत्पादनात कोणतीच भर पडत नाही म्हणून अशा कर्जाला अनुत्पादक कर्ज असे म्हणतात.

कालावधीनुसार वर्गीकरण -

विविध वित्तीय संस्था शेतकऱ्यांना विशिष्ट मुदतीसाठी कर्ज पुरवठा करीत असतात. कर्ज कोणत्या कारणासाठी हवे आहे. यावरून कर्ज देण्याचा काळ ठरत असतो.

१) **अल्पकालीन कर्ज** - पीक लागवडीपासून विक्रीपर्यंत येणारा खर्च भागविण्यासाठी अल्पकालीन कर्ज देण्यात येते. याची मुदत ६ ते १५ महिने असते हे कर्ज मुख्यता बी-बियाणे, खते, कीटकनाशके खरेदी करणे, आंतरमशागत, कापणी, मळणी, मजुरी, मालाची साठवणूक किंवा वाहतूक इत्यादी कारणासाठी उपयोगात आणले जाते.

२) **मध्यम कालीन कर्ज** - शेतीच्या तात्पुरत्या सुधारणा जसे बांधबंदिस्त, कुपनलीका, शेतात चर खोदणे, बैल जोडी, दुभती जनावरे खरेदी करणे, इत्यादी साठी मध्यम कालीन कर्जे घेतली जातात. या कर्जाचा कालावधी सामान्यता १५ महिने ते ५ वर्षांपर्यंत असतो.

३) **दीर्घकालीन कर्ज** - शेतीत उपयोगी अशी महागडी ट्रॅक्टर, मळणीयंत्र, पावर ट्रिलर, फवारणी यंत्रे, अवजारे, तसेच नवी जमीन खरेदी, पॉलिहाऊस, शीतगृहाची निर्मिती, विहीर खोदणे, सिंचन व्यवस्था इत्यादीवर मोठा खर्च करावा लागतो, जो शेती उत्पन्नातून होऊ शकत नाही आणि कर्जाची परतफेड अल्पकाळात शक्य नाही म्हणून दीर्घकालीन कर्ज घेतली जातात. या कर्जाची मुदत किमान ५ वर्षे ते १५ वर्षापर्यंत असते.

शेती वित्त पुरवठ्याचे स्वरूप -

शेती व्यवसायासाठी घेण्यात येणारे कर्जाचे स्वरूप हे उद्योग व्यवसायात घेण्यात येणाऱ्या कर्जाच्या स्वरूपापेक्षा अनेक बाबतीत भिन्न असते. उद्योगाला होणारा कर्जपुरवठा व त्याची वसुली सोपी बाब आहे परंतु शेतीबाबत हीच बाब मैलाचा दगड आहे. ते वाटते तितके सोपे नाही.

१) **शेतीचे हंगामी स्वरूप** - हंगामाच्या सुरुवातीलाच कर्जाची गरज भासते, शेती पूर्णतः निसर्गावर अवलंबून असल्याने या कर्जाची गरज असते, जेव्हा अनुकूल पाऊस मान असल्यास कर्जाची कमी गरज भासते.

२) **धोका व अनिश्चितता** - पूर्णतहा शेती निसर्गाच्या भरवशावर असल्याने शेती कर्जात धोका व अनिश्चितता अधिक असते, दुष्काळ, अतिवृष्टी,टोळघांड, पुर, शेतमालाच्या किमती, शासकीय धोरण, लागवडीपासून पीक विक्रीपर्यंत अनेक धोके असतात.

३) **पर्याप्त तारणाचा अभाव** - भारतात अल्प व सीमांत शेतकऱ्याचे प्रमाण सर्वाधिक असल्याने व त्यांची तारण क्षमता अतिअल्प असल्याने कर्जाचा कर्जाचा समस्या वाढतात.

४) **कर्जाचा दैनंदिन खर्चासाठी वापर** - गरिबीमुळे शेतकरी कर्जाचा वापर दैनंदिन कारणांसाठी करतात. शेतक-यांच्या घरी १८ विश्व दारिद्र्य कायम असते.

कृषी वित्तपुरवठा चे स्त्रोत -

शेतीला कर्जपुरवठा दोन मार्गांनी होतो.

१) **बिगर संस्थात्मक स्त्रोत -** बिगर संस्थात्मक स्त्रोतांमध्ये - सावकार, व्यापारी, नातलग, व्यावसायिक, कमिशन एजंट आणि एतदेशीय बँका , इत्यादी.

२) **संस्थात्मक स्त्रोत -** संस्थात्मक स्त्रोतांमध्ये – सरकार, सहकारी पतसंस्था, भूविकास बँका, व्यापारी बँका, नाबार्ड, RBI, इत्यादी.

शेतीला कर्जपुरवठा करणाऱ्या बिगर संस्थात्मक स्त्रोतांच्या गैरप्रकारामुळे आज त्यांचे महत्त्व व प्रमाण ग्रामीण भागात कमी-कमी होत आहे, परंतु या संस्थांची पकड अपेक्षित प्रमाणात कमी झालेली नाही असे दिसते. अलीकडे संस्थात्मक कर्जाचा पुरवठा वाढत आहे हे मात्र निश्चित. ग्रामीण भागात शेतकऱ्यांना अनधिकृतपणे कर्जाऊ रक्कमा देऊन नियमितपणे उत्पन्न मिळवतो. अशा व्यक्तीला सावकार असे म्हणतात. सावकारांकडून १९९१ ला ७० टक्के कर्ज पुरवठा होत होता, तो कमी होऊन २०१५ मध्ये १९ टक्के झाला आहे. अर्थात आजही ग्रामीण भागामध्ये सावकाराचे महत्त्व टिकुन आहे.

त्याची कारणे -

१) उत्पादक किंवा अनुत्पादक व तात्काळ कर्ज पुरवठा होतो.

२) सावकार ग्रामीण भागात सुपरिचित व सोयीस्कर वाटतो.

३) वेळ प्रसंगी विणातारण,वेळीअवेळी कर्जपुरवठा करू शकतो.

४) सावकारांकडे वारंवार चकरा मारण्याची गरज पडत नाही.

वरवर पाहता सावकारी कर्ज सोयीस्कर वाटत असले तरी शेतकरी या कर्जाच्या विळख्यात अडकतो आणि मग शेतकऱ्यांचे शोषण सुरू होते. वारेमाप व्याज वसूल करणे, जमीन हडपणे, तयार माल लवकर विकण्याची सक्ती करणे, या गैरप्रकारामुळे शेतकरी उध्वस्त होतो.

तक्ता क्रं.1

बिगर संस्थात्मक कृषी वित्त पुरवठ्याचा तपशील (शेकडा प्रमाणे)

अ.क्र.	स्त्रोत	१९५१	१९७१	१९९५	२०१५
१	सावकार	६९.७	३६.१	७.०	०६
२	व्यापारी	५.५	८.४	५.०	०३
३	मित्र व नातेवाईक	१४.२	१३.१	३.०	०३
४	जमीनदार व इतर	३.३	१०.७	१०.०	०७
	एकुण (हिस्सा)	९२.७	६८.३	२५.०	१९%

वरील तक्ता विचारात घेता बिगरसंस्थात्मक कृषीवित्त पुरवठा १९५१ मध्ये ९२.७ प्रतिशत होता तो २०१५ मध्ये घटत जाऊन १९ प्रतिशत वर आला. हे कृषीवित्त पुरवठ्यातील क्रांतीकारक बदल आहे असे म्हणता येते.

बिगर संस्थात्मक कर्जपुरवठा करण्याचे गुण -

१) कोणत्याही प्रकारचे कर्जाची पुर्तता, २) अटीविना कर्ज प्राप्तीची सुलभता

३) वैयक्तिक मार्गदर्शन ४) वेळ प्रसंगी कर्जाच्या परतफेडीची सुलभता.

बिगर संस्थात्मक कर्ज पुरवठ्यातील दोष -

१) अयोग्य कार्यपद्धती (व्याज-३५%-७२% पर्यंत) धाक, दडपशाही, फसवणूक नफा,

२) तारणा संबंधी गैरप्रकार

३) धान्य विक्रीची सक्ती

४) शेतकऱ्यांची अडवणूक

संस्थात्मक स्त्रोत -

१) **सरकार** - केंद्र व राज्य सरकार अल्प व मध्यम मुदतीचे कर्ज कमी व्याजाने देते, मात्र या कर्जात अपेक्षित वाढ झाली नाही.

२) **सहकारी पतपुरवठा -**

अ) सहकारी पतसंस्था (१९६०) पासून कार्यक्षम पतपुरवठा करण्यावर भर.

आ) भूविकास बँका - प्रगतीशील शेतकऱ्यांना अल्पकालीन व दीर्घकालीन कर्जपुरवठा.

इ) व्यापारी बँका - राष्ट्रियीकरणानंतर मोठ्या शेतकऱ्यांना शेतीच्या आधुनिकीकरणासाठी कर्जपुरवठा.

संस्थात्मक वित्तपुरवठाचे फायदे -

१) नफ्याचा उद्देश नाही. (उत्पादक कार्य)
२) दुर्बल घटकांना प्राधान्य
३) आर्थिक विकासात योगदान
४) कर्जाच्या विनियोगावर लक्ष
५) इतर सुविधा व मार्गदर्शन
६) शहरी भांडवल कृषी क्षेत्राकडे वळते करणे.

प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्था -

सहकारी बँक रचनेतील सर्वात महत्त्वाचा व केंद्रीभूत घटक म्हणून या संस्थांचा उल्लेख करता येतो. या संस्थांचा शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष व जवळून संबंध असतो. गावातील किमान दहा व्यक्ती एकत्र येऊन संस्थेची स्थापना करतात व लोकशाही पद्धतीने कार्य चालते.

प्रगती -

भारतात या संस्थांची स्थापना १९०४ मध्ये झाली, पण खरी प्रगती स्वातंत्र्योत्तर काळात झाली. १९५०-५१ मध्ये या संस्थांची संख्या १.०५ लाख होती. ती वाढून १९७०-७१ मध्ये १.६१ लाखावर गेली व २०१०-११ मध्ये ९४६४७ झाली.

या संस्थांनी १९५०-५१ मध्ये २३ कोटी कर्ज पुरवठा केला होता. १९६०-६१ मध्ये २०० कोटी रुपये पतपुरवठा केला होता. २००९-१० मध्ये वाढून पतपुरवठा ७४९३८ कोटी वर गेला. ह्या संस्था अल्पभूधारक,सीमांत शेतकरी व दुर्बल घटकांना प्राधान्याने पतपुरवठा करतात. मात्र ग्रामीण गरजेच्या तुलनेत हा पुरवठा अपुराच आहे.

तक्ता क्रं. १.२

विविध संस्थांचे कृषी पतपुरवठ्यातील योगदान. (प्रतिशत)

अ.क्र.	संख्या	१९८०-८१	२०००-०१	२०१२-१३
१	सहकारी पतसंस्था	६१.६	३९.४	१८.३
२	व्यापारी बँका (अनुसुचीत)	३८.४	५२.६	७१.२
३	क्षेत्रीय ग्रामीण बँक	-	८.०	१०.५
४	एकुण पतपुरवठा (कोटी रू.)	३२९२	५२८२७	६०७३७५

वरील तक्ता क्रं.१.२ नुसार १९८०-८१ मध्ये शेती साठी सहकारी क्षेत्रातुन पतपुरवठा ६१.६ प्रतिशत झाला होता, तो २०१२-१३ मध्ये कमी हौउन १८.३ प्रतिशत वर आला. मात्र एकुण संस्थात्मक पतपुरवठा १९८०-८१

मध्ये ३२९२ कोटी रु. वरुन वाढून २०१२-१३ मध्ये ६०७३७५ कोती रु. एवढा वाढला, हे या संस्थांचे महत्वाचे भरीव योगदान आहे.

शासकीय कर्जमाफीचा आढावा -

शेती कर्जमाफीतून शेतकऱ्यांचा उद्धार होऊ शकतो असे सत्ताधारी व विरोधी पक्षांना वाटते. याबाबत त्यांच्यात एकमत आहे. मात्र इतर मुद्द्यावरून ते भांडत असतात. कृषी कर्जाबाबत मतभेद असतो तो सरसकट कर्जमाफी करावी की नाही अथवा कशा पद्धतीने सातबारा कोरा करायचा कर्जमाफीच्या धांदली मध्ये यापूर्वीच्या कर्जमाफीचे फलीत काय ? याकडे डोळेझाक केली जाते.

देशात वाढत्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या पाहता केंद्रसरकारने २००८ मध्ये कर्जमाफी केली होती, मात्र आत्महत्या थांबल्या नाहीत. तेव्हा अनेक शेतकरी थकबाकीदार होते. मनमोहन सिंह यांच्या काळात वित्तीय संस्थांकडून शेतकऱ्यांना होणारा पतपुरवठा बंद झाला होता. कर्जमाफी होण्यापूर्वी पिक कर्जाचा व्याजदर राज्य सरकारच्या अनुदानाने ६% वरून ४% वर आणला गेला. त्यामुळे शेतकऱ्यांना वित्तीय संस्थांकडून कर्ज घेणे व त्याची परतफेड वेळेत करणे शक्य झाले. तत्पुर्वी खाजगी सावकार मनमानी करीत होते. प्रतिवर्ष २० ते ६० प्रतिशत व्याजदर आकरून शेतकरी कायम कर्जबाजारी कसा राहील याची तजबीज करीत असत. मात्र शासनाने कर्जमाफी आणि व्याजदर कमी केल्याने, सावकारी मनमानीला मोठा पायबंद बसला. पण या कर्जमाफीने नियमित कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांच्या पदरात घोर निराशाच पडली. वेळेत कर्जाची परतफेड करून आपण चूक केल्याची त्यांची भावना झाली. कर्जमाफी नेहमी होत नाही. व्याजदर कमी झाले म्हणून कर्जाची परतफेड करण्यास टाळाटाळ करायची नाही अशी त्यांची धारणा होती ती आता बदलली.

स.न. २०१७ मध्ये उत्तर प्रदेश सरकारने कर्जमाफी केल्यानंतर सर्व राज्यांनीच एकापाठोपाठ कर्जमाफीचा सपाटा लावला. त्यामुळे कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना आपली फसवणूक होत असल्याची भावना दृढ झाली.

महाराष्ट्रामध्ये २०१४ व २०१५ च्या दुष्काळामुळे शेतकऱ्यांच्या अडचणी वाढल्या. त्यांना २०१६ च्या मान्सूनने साथ दिली मात्र पीक काढणीच्या वेळी मोदी सरकारने नोटा बंदीचा निर्णय घेतल्याने शेतमालाचे भाव घसरले आणि शेतकऱ्यांच्या अडचणीत वाढ झाली. त्यामुळे शेतकऱ्यांचे संप, मोर्चे व कर्जमाफीसाठी राज्यात जोर धरला. पूर्वीच्या कर्जमाफीमुळे वित्तीय संस्था शेतकऱ्यांना कर्ज देण्यास टाळाटाळ करू लागल्या. राष्ट्रीयीकृत बँकांतर शेतकऱ्यांना उभ्या ही करीत नव्हत्या म्हणून शेतकरी पुन्हा सावकाराकडे जाऊ लागले. याच पार्श्वभूमीवर सध्या च्या कर्जमाफीकडे पहावे लागेल.

राज्यात २०१७ ला फडणवीस सरकारने कर्जमाफी केली परंतु अनेक नियम आणि निकषाचे अडथळे पार करत पदरात पाडून घेताना शेतकरी घायाळ झाले. कर्जमाफीची प्रत्यक्ष अंमलबजावणी करायला २०१८ उजाडले. त्यामुळे बऱ्याच कर्जथकीत शेतकऱ्यांना २०१९ मध्ये नवीन कर्ज घेण्यास वाव मिळाला व कर्जाची रक्कम वाढत गेली. अशा स्थितीत २०१९ च्या विधानसभा निवडणुकीला सामोरे जाताना काँग्रेस, शिवसेना व राष्ट्रवादी सरकारने कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. सत्तेवर येताच मा. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सरसकट दोन लाखांपर्यंत थकीत पीक कर्ज व्याजासह माफ करण्याचा निर्णय घेतला. यापूर्वी फडणवीस सरकारने ३४ हजार कोटी रुपये कर्जमाफीची घोषणा केली पण प्रत्यक्षात २४ हजार कोटीच माफ केले. यावेळी ठाकरे सरकारने राज्यातील लाभार्थी शेतकरी संख्या व कर्जमाफी साठी लागणारी रक्कम याचा तपशील दिला नाही. शिवाय या वेळी कर्जमाफीचे

लाभार्थी केवळ पीक कर्ज थकीत शेतकरी असल्याने त्यासाठी मागील कर्जमाफी पेक्षा कमी रक्कम लागेल. त्यातच पीक कर्जाच्या परतफेडीचा कालावधी १२ महिन्याचा असल्याने बहुतांश शेतकरी सप्टेंबर २०१९ पूर्वी थकबाकीदार होण्याची शक्यता फार कमी होती. म्हणून सरकारी तिजोरीवर कमी भार होता.

कर्जमाफी तात्पुरती मलमपट्टी -

शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी कर्जमाफी आहे, असे सरकार सांगते मात्र ती मदत अपुरी ठरुन कालांतराने पुन्हा कर्जमाफीची मागणी जोर धरू लागते. कारण कर्जमाफीने मूळआजार बराचं होत नाही तर केवळ तात्पुरती मलमपट्टी ठरते. अर्थात कायम उपाय केले जात नाहीय. संधिसाधू व्यवस्था तशीच राहते. यामध्ये सुधारणा करणारी पावले कधीच उचलली जात नाहीत. सर्वच सरकारचे उथळ प्रसिद्धीस प्राधान्य असते. मतांचे राजकारण केले जाते. वास्तविक लहान-मोठ्या बदलाने शेतकऱ्यांचा नफा वाढविणे, त्यांच्या उत्पन्न वाढीला प्राधान्य देणे, याकडे साफ दुर्लक्ष करून कर्जमाफीला प्राधान्य दिले जाते. दुर्दैवाने त्यातून जटील समस्या उभ्या राहून कर्जमाफीचा उद्देश अपयशी ठरतो. यातच शेतकरी भरडला जातो.

२०१९ च्या आरंभी दुष्काळाने, त्यानंतर बिगरमोसमी पावसाने शेतकरी निश्चितच अडचणीत आले. मात्र यावर कर्जमाफी हा उपाय होऊ शकत नाही. कारण त्यामुळे वेळेत कर्जाची परतफेड करणाऱ्यांना आपण परतफेड करून मूर्खपणा करत आहोत अशी धारणा होते आणि उत्पन्न वाढीची प्रेरणा अजिबातच मिळत नाही. कर्जमाफी बाबत सरकारचे वेळ काढू धोरण व कोरोना चा काळ विचारात घेता २०२४ निवडणुकीपूर्वी बहुतांश शेतकऱ्यांनी कर्जाची परतफेड टाळल्यास नवल वाटू नये. कर्जमाफीचे घोंगावणारा चक्र पाहता खाजगी व राष्ट्रीयकृत बँकांनी शेतकऱ्यांना कर्जपुरवठ्यात मोठ्या प्रमाणात घट केलेली आहे. त्याचा फटका वेळेत कर्जाची परतफेड करणाऱ्यावर, कर्ज घेऊन नवतंत्रज्ञान व पायाभूत सुविधा उभ्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या खर्चावर होत आहे.

अनुदानासह उपलब्ध होणारे पीककर्ज मर्यादित असते त्याआधारे विहीर खोदणे, ठिबक सिंचन किंवा पाईपलाईन व्यवस्था ,ग्रींहाऊस बांधणे किंवा फळप्रक्रिया उद्योग सुरू करणे शक्य नाही. प्रगतिशील शेतकरी १२ ते १६ प्रतिशत दराने कर्ज घेऊन नवतंत्रज्ञानाचे प्रयोग करून यशस्वी होतात. त्यांची अनुकरण लहान शेतकरी करीत असतात. अशा प्रोत्साहन देणाऱ्या मोठ्या शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होत असते. मात्र आज याही शेतकऱ्यांना बँकेचे दरवाजे बंद झाले आहेत. अशा वेळी सरकारने कितीही विनवण्या केल्या तरी शेतकऱ्यांसाठी बँका दरवाजे उघडण्याची शक्यता नाही.

राज्यात सध्या महाआघाडी सरकारचे मुख्यमंत्री मा. उद्धवजी ठाकरे यांनी महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ ची घोषणा केली. या योजने अंतर्गत शेतकऱ्यांसाठी २ लाख रु. पर्यंतची कर्जमाफी जाहीर केली. जी केवळ २ लाख पर्यंत कर्ज असेल अशाच शेतकऱ्यांना कर्जमाफी योजनेचा लाभ मिळणार आहे. विशेष म्हणजे २ लाख रु. पेक्षा १ रु. जरी अधिक कर्ज असेल तर अशा शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ घेता येणार नाही किंवा या योजनेस पात्र ठरणार नाही. या योजनेअंतर्गत ज्या शेतकऱ्यांनी १ एप्रिल २०१५ ते ३० सप्टेंबर २०१९ या कालावधीत कर्ज घेतले आहे. ते व्याजासह थकबाकी २ लाखापर्यंत असावी अशी अट आहे. अटी शिवाय कर्जमाफी नाही मात्र यावेळी शेतकऱ्यांचे अल्प/अत्यल्प भूधारक याप्रमाणे जमीन धारणेचे क्षेत्र विचारात न घेता कर्जमाफीचा आदेश जारी केला आहे.

एप्रिल २०१५ पूर्वीचे कर्ज असलेला शेतकरी या योजनेस पात्र असणार नाही. तसेच ३० सप्टेंबर २०१९ पर्यंत ज्या शेतकऱ्यांच्या कर्जखात्यात व्याजासह मुद्दत २ लाखापेक्षा + असेल अश्यांनाही या योजनेचा लाभ घेता

येणार नाही. शेतकरी आहात व सरकारी निमसरकारी किंवा खाजगी, सहकारी संस्थांमध्ये कार्यरत २५ हजार रु. वेतन/निवृत्तीवेतन माजी लोकप्रतिनिधी किंवा मंत्री, आमदार, खासदार असल्यास त्यांना महात्मा फुले कर्ज मुक्ती चा लाभ मिळणार नाही. केवळ चतुर्थश्रेणी कर्मचारी व माजी सैनिकांना या योजनेतून वगळण्यात आलेले आहे.

राज्यात १ कोटी ५३ लाख शेतकरी आहेत. त्यांना शेतीसाठी सहकारी व व्यापारी बँकाकडून कर्ज घ्यावे लागते. या योजनेत सहकार विभागाकडे नोंदणीकृत सावकारांकडून घेतलेल्या कर्जाबाबत कोणताही उल्लेख नाही. मात्र राष्ट्रीयीकृत बँका, व्यापारी बँका, जिल्हा मध्यवर्ती बँक व विविध कार्यकारी सेवा संस्था मधून घेतलेले पीककर्ज ग्राह्य धरण्यात येईल. अशा पद्धतीने कृषी कर्जमाफी विविध अटी व शर्तींच्या निकषावर आधारित असून अस्पष्ट व गुंतागुंत वाढविणारी ठरते त्यामुळे अनेक शेतकरी कर्जमाफी पासून वंचित राहतात हेच या योजनेचे अपयश आहे.

तक्ता क्रं. १.३

राज्यात पीक व कृषी मुदती कर्ज कोटी रु. मध्ये (आर्थिक पाहणी अहवाल २०१८-१९)

वर्ष	२००४-०५	२०१३-१४	२०१४-१५	२०१५-१६	२०१६-१७	२०१७-१८	२०१८-१९
कर्ज पुरवठा	६७४८	५०१२८	५७२९२	७२८६५	९६७७७	५१०१७	६७९१४

राज्यात २००४-०५ ते २०१६-१७ पर्यंत पिक आणि कृषी कर्जात वाढ अर्थात ६७४८ वरून ९६७७७ कोटी रु. वर गेले परंतु मागील दोन वर्षात कर्जात वाढ न होता घट झाली याच काळात देशपातळीवर कर्जात वाढ झालेली आहे.

शेतकऱ्यांना कर्ज बाजारी बनविणारी वितरण व्यवस्था व कायदे यांमध्ये योग्य बदल न करता त्यांना होणाऱ्या पतपुरवठ्यात घट झाल्यास कृषिक्षेत्र कधीच उभारी घेऊ शकणार नाही शिवाय जमीन धारणा व इतर जाचक कायद्यामुळे खाजगी क्षेत्राकडून शेतीमध्ये गुंतवणूक होत नाही. जी काही होते ती मुख्यतः मोठ्या शेतकऱ्यांकडून होते तीही आकसली तर शेती आणि शेतकऱ्यां पुढील प्रश्न गंभीर होतील आणि ग्रामीण रोजगाराच्या संधीही घटतील याची चिंता कुणीही करीत नाही, हे विशेष.

मागील ५ वर्षांमध्ये (फडणवीस सरकार) कृषीविकासाचा दर जवळपास शून्य राहिला आहे. त्यामध्ये वाढ होऊन तो टिकू शकला नाही तर कर्जमाफीच्या स्वरूपात कितीही खर्च केला तरी शेतकरी अडचणीत राहणार आहेत. राज्यात वर्ष २००१ पासून बेभरवशी बाजारभाव निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकरी गंभीर संकटाचा सामना करीत आहे. ज्यावर्षी पिकते त्यावर्षी बाजारभाव नसतो, जेव्हा बाजारभाव असतो तेव्हा दुष्काळ, अवकाळी, गारपीट होऊन नापिकी पदरात पडते. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावून घेतला जातो.

उपाय व निष्कर्ष -

अशा विविध समस्यांवर केंद्र व राज्य सरकारांनी उपाय शोधण्याची गरज आहे.

- रखडलेला बाजार समिती कायद्यात सुधारणा करणे.
- बाजार दलालाची साखळी कमी करणे.
- पिक विमा पद्धतीतील त्रुटी दूर करणे.

